# शब्द रुची

*वाचक तितुका मेळवावा.....*

डिसेंबर २०१८
मूल्य १० रुपये
पृष्ठे ५२




घाल शब्दांचा मेळ
आणि सुरात खेळ
Parle-G
सह-प्रस्तुत
झिंग झिंग झिंगाट
Co-powered by
Schezwan Chutney
VICCO Narayani
sunsilk
Cosmetic Partner
Dazzler ETERNA
Special Partners
FABRIC ROLL-ON
POND'S
बुध-गुरु
रात्री 9.30 वा.
झी मराठी HD वरही पहा
ZEE मराठी
Co-Presenting Sponsor: Parle-G
Co-powered by: Schezwan Chutney
VICCO Narayani
sunsilk
Cosmetic Partner: Dazzler ETERNA
Special Partners: FABRIC ROLL-ON
POND'S
झी मराठी HD पाहण्यासाठी आजच आपल्या केबल ऑपरेटरशी संपर्क करा.
DTH वर झी मराठी HD बघा, ट्यून इन करा : Dish TV (Channel no. 1201), Airtel (Channel no. 517), Tata Sky (Channel no. 1207) आणि Videocon D2H (Channel no. 970)

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

४३ ॥ग्रंथाली॥

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

**डिसेंबर २०१८, वर्ष सहावे**
**अंक आठवा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**

मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

---

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

---

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी २५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

---

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

---

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

---

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

**विशेष**
- लोकशाही म्हणजे काय? / ६
  **डॉ. अपर्णा महाजन**

**स्मरणस्वर**
- भूमिकेचं सोनं करणाऱ्या लालनताई / ९
  **विवेक लागू**
- कार्यकारी विचारवंत प्रा. अविनाश डोळस / १३
  **राम दोतोंडे**

**कलारंग**
- 'दशक्रिया ते दशक्रिया' / १८
  **संजय कृष्णाजी पाटील**
- कोकणातील दशावतार / २८
  **प्रा. पंढरीनाथ रेडकर**

**निमित्त**
- संकल्पना बदलणारा वास्तुरचनाकार : बाळकृष्ण दोशी / ३०
  **अरुण मळेकर**
- # ME Too / ३४
  **धनंजय गांगल**

- अमेरिकेतील एक ज्ञानगंगा / ३९
  **डॉ. अनंत लाभसेटवार**
- **रंग 'झी' मालिकाविश्वाचे** / ४४
- **पुस्तकप्रकाशन वृत्तांत** / ४५
- **मेहता पब्लिशिंग हाऊस ग्रंथपान** / ४६
- ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे** / ४७

## संपादकीय...

डिसेंबर महिन्याला 'ग्रंथाली'च्या दृष्टीने एक समृद्ध परंपरा आहे. याच महिन्यात 'ग्रंथाली' वाचकदिन साजरा करत असते. वाचकांशी असलेले आपले नाते अधिक दृढ करत असते. आपल्या सर्व सांस्कृतिक-वाङ्मयीन व्यवहाराच्या केंद्रस्थानी असलेला घटक म्हणजे वाचक! वाचनसंस्कृती टिकवण्याची-वृद्धिंगत करण्याची फार मोठी जबाबदारी वाचकावर असते. अलीकडच्या माध्यमसंक्रम णकाळात वाचनसंस्कृतीला ओहोटी लागल्याची काळजी वारंवार व्यक्त केली जाते. सार्वजनिक ग्रंथालयातले चित्र काय आहे? युवा वाचकवर्ग किती आहे? हा वर्ग कोणत्या प्रकारची पुस्तके वाचतो? आजचा स्वत:च्या भाषेतले साहित्य किती वाचतो? त्याच्या खरेदीच्या यादीत पुस्तकांना जागा आहे का? असे काही प्रश्न वाचनसंस्कृतीचा विचार करताना समोर उभे राहतात.

हिंदीतील ज्येष्ठ लेखक विष्णू नागर यांचा एक लेख आहे, तिरकस अंगाने लिहिलेला. या लेखातले लेखक महाशय प्रकाशक, समीक्षक, पुरस्कारदाते अशा सर्वांशी कौशल्याने संबंध वाढवतात. एकदा या लेखक महाशयांना प्रश्न पडतो की माझी इतकी पुस्तके आहेत. इतके समीक्षक आहेत. मला इतके पुरस्कार मिळाले आहेत म्हणजे माझे वाचकही जरूर असणारच! लेखक महाशय आपल्या वाचकांचा शोध घेण्याचे ठरवतात. वाचक जर चंद्रावर असले तर तिथूनही त्यांना आणायचे असे ते बोलताना म्हणतात. लेखकाची शोधयात्रा सुरू होते या प्रवासात त्यांना व्यापारी, दलाल, वकील, नेता, मजूर, शेतकरी, मित्र, शत्रू, मंत्री असे अनेक लोक भेटतात पण त्यांचा वाचक काही सापडत नाही. लेखकाला त्याच्या प्रवासात अनेकजण भेटणे पण वाचकच न भेटणे हे वास्तव विष्णू नागर यांनी खुलवत-खुलवत सांगितले आहे.

० ० ०

ज्या मध्यमवर्गातून वाचक उभा राहिला तो बहुतांश वर्ग पार चंगळवादाच्या आहारी गेला. या वर्गाने आपल्या भाषेपासूनही स्वत:ला तोडून टाकले. आपल्या वारसदारांना संस्कृतीसह 'एक्सपोर्ट' करण्यात हा वर्ग धन्यता मानू लागला. डॉ. बाबासाहेबांनी, महात्मा फुले यांनी समाजात शिक्षणाचे खेळते वारे आणले आणि विशिष्ट वर्गाची लेखणीच्या-अक्षरांच्या क्षेत्रातली मक्तेदारी मोडून काढली. त्यानंतर एका नव्या लेखकाचा -नव्या वाचकाचा उदय झाला. हा लेखक भोगवट्यातून आलेल्या अनुभवांना शब्दरूप देऊ लागला. अन्यायाविरुद्धचा ठाम आवाज बनला. मनांची नव्याने मशागत करू लागला. कपोलकल्पित गोष्टींच्या चौकटी तोडून अस्सल वास्तवाला भिडू लागला. खेडोपाड्यातले लेखक आपल्या अनुभवांचे आरसे आमच्या डोळ्यासमोर धरू लागले. जीवनाचे आजवर न पाहिलेले चेहरे दाखवू लागले.

अशोक वाजपेयी त्यांच्या 'मुझे चाहिए' या कवितेत म्हणतात,

मला हवी आहे पूर्ण पृथ्वी  
झाडं, समुद्र आणि लोकांनी भरून गेलेली  
एक छोटंसं घर पुरेसं नाही  
एका खिडकीने माझं काम नाही होणार...  
मला हवं अख्खंच्या अख्खं आकाश  
आपल्या असंख्य नक्षत्रांनी आणि ग्रहांनी भरलेलं  
एका छोट्याशा कंदिलाने  
नाही मिटणार माझा अंधार  
मला हवा...  
एक धगधगणारा ज्वलंत सूर्य!  
थोड्याशा शब्दांनी नाही लिहू शकत मी कविता  
मला हवी सबंध भाषा  
सगळी हिरवाई पृथ्वीची  
सगळी निळाई आकाशाची  
सगळी लालिमा सूर्योदयाची...

काळाच्या प्रत्येक टप्प्यावर माणूस एका नव्या सूर्योदयाची वाट पाहात असतो. त्याच्याविषयीचा विश्वास लेखक जिवंत ठेवतो. या विश्वासाची बोली त्याला आपल्या भाषेतून सापडते. आपल्या भाषेवरची श्रद्धा आज शहरातल्या हवेत वाफेसारखी जिरून गेलीय. ग्रामीण पट्ट्यामध्ये मात्र आजही आपल्या बोलीचा गंध दरवळताना दिसतो.

आजही गावागावातली लेकरंबाळं मायबोलीत धुळाक्षरं गिरवतात. अनेक आदिवासी शाळांमध्ये आज ग्रंथालयं नाहीत. ती असली तरी पुरेशी पुस्तकं नाहीत, पण वाचनाची असोशी मात्र कायम आहे. ज्यांच्या शळांना अनुदान नाही असे मराठी शाळांसाठी झटणारे अनेक कार्यकर्ते त्यांच्या मुलांना-शिक्षकांना वाचायला हवीत म्हणून ठिकठिकाणी फिरून पुस्तकं गोळा करतात. अशा शाळा दत्तक घेऊन तिथे केवढं तरी काम उभारता येऊ शकतं. मध्यंतरी पुलंचा एक लेख वाचत होते. त्यात ते म्हणतात, ''म्युन्सिपालिटीच्या शाळा नागरिकांनी दत्तक घ्यायला काय हरकत आहे?'' पुलं या लेखात पुढे लिहितात, ''प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणाची विद्यालये एकमेकांपासून

अलिप्त राहून चालणार नाही. तो एकच प्रवाह आहे. ती निरनिराळी तळी होऊ नयेत. प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, महाविद्यालयातील प्राध्यापक ह्या एकाच वृक्षाच्या शाखा व्हायला हव्यात. अशी एकसंधता आल्याखेरीज परस्परसंवाद सुरू होणार नाहीत.'' आज विद्यापीठीय प्राध्यापक त्यांच्या-त्यांच्या मखरात बसतात. ज्येष्ठ-कनिष्ठ महाविद्यालयांमधल्या सीमा वाढत राहतात. आणि मराठी शाळा त्यांचे लढे एकाकीपणे लढतात. परस्परसंवाद आहे कुठे?

परस्परसंवाद असतो तिथे दीर्घकाळ टिकणारे काम उभे राहते. 'ग्रंथाली'ने नेहमीच अशा संवादावर विश्वास ठेवला आहे. येणाऱ्या काळात अशा संवादाच्या पाऊलखुणा अधिक ठळक होत जातील नि वाचकहो, तुम्ही याचे साक्षीदार असाल.

**– डॉ. वीणा सानेकर**
सी-१२, सुयोग सोसायटी,
संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar2018@gmail.com

**सुजाण आणि सलग पालकत्वासाठी**

## मराठीप्रेमी पालक महासंमेलन २०१८

**महाराष्ट्र विद्यालय, गोरेगाव (प), मुंबई**

शनिवार, दि. ८ डिसेंबर, स. ९ वा.
**फक्त विद्यार्थी आणि शिक्षकांची मराठी शाळा जागर फेरी**
अ. भि. गोरेगांवकर शाळा ते महाराष्ट्र विद्यालय
उद्घाटक : श्री. विश्वनाथ महाडेश्वर महापौर, मुंबई

१०.३० ते १२.००
उद्घाटक : प्रमुख पाहुणे :
मा. लक्ष्मीकांत देशमुख (अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलन)
मा. सुभाष देसाई (उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य)
मा. चिन्मयी सुमीत (अभिनेत्री आणि मराठी शाळांच्या सदिच्छात)

६.०० ते ७.३०
**लाभले आम्हास भाग्य**
सादरकर्ते : संगीतकार कौशल इनामदार आणि अस्मिता पांडे

रविवार, दि. ९ डिसेंबर, स. १०.३० ते १२.००
**मातृभाषेतील शिक्षण आणि यशवंतांशी संवाद**
सहभाग : ॲड. मीनल सुनील श्रृंगारपुरे, डॉ. प्रेरणा महाजन, मिलिंद भागवत (वृत्तनिवेदक, आयबीएन लोकमत)
प्रवीण तरडे (अभिनेते, दिग्दर्शक), ओंकार गिरकर (अभियंता, मुंबई मनपा)
सूत्रसंचालन : रश्मी वारंग (आरजे)

दु. १२.३० ते १.३०
**मातृभाषेतील शिक्षण आणि आई म्हणून माझी भूमिका**
अध्यक्ष : संपदा जोगळेकर (अभिनेत्री)
सहभाग : मुक्ता दाभोलकर (अंनिस कार्यकर्ती), सई तांबे, डॉ. चंदा बिराजदार (आयुर्वेदतज्ज्ञ)
संवादक : नामदेव अंजना (पत्रकार)

दु. १.३० ते २.३० : जेवण

दु. २.३० ते ४.३०
**मराठी शाळांपुढील आव्हाने आणि नावीन्यपूर्ण उपाय**
अध्यक्ष : रमेश पानसे (ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ)
सहभाग : अर्जुन कोळी (मुख्याध्यापक, कराड), गोविंद पाटील (केंद्रप्रमुख बेळगाव), शिवाजी अंबुलगेकर (शिक्षक, नांदेड)
सूत्रसंचालन : रसिका मुळ्ये (पत्रकार)

दु. ४.०० ते ४.३० : चहापान

दुपारी ४.३० ते ६.००
**मराठी शाळांसाठी आम्ही काय करणार आहोत?**
सहभाग : खासदार अरविंद सावंत (शिवसेना), आमदार अतुल भातखळकर (भाजप), आमदार विद्या चव्हाण (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष), अनिल शिदोरे (महाराष्ट्र नवनिर्माण सेना), स्वप्निल पिंगुळकर (आर.एम.भट शाळा, माजी विद्यार्थी संघ)
संवादक : नितीन चव्हाण (पत्रकार)

सायं. ६.०० ते ७.३०
**समारोप**
अध्यक्ष : युवराज मोहिते (ज्येष्ठ पत्रकार)
प्रमुख पाहुणे : मंदार भारदे (उद्योजक, लेखक)

संपर्क :
पल्लवी ८३५६९६९९०२,
नयन ८३५६०४३१५२,
साधना ९९८७७७३८०२

# लोकशाही म्हणजे काय?

डॉ. अपर्णा महाजन

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या लेखनातून त्यांच्या प्रखर सामाजिक-राजकीय जाणिवेचा प्रत्यय येतो. भारताच्या सामाजिक वास्तवाविषयीचे त्यांचे आकलन किती सखोल आणि डोळस होते याची चर्चा करणारा हा लेख...**

**१४** एप्रिल किंवा ६ डिसेंबर या दिवसांच्या मागेपुढे अनेक माध्यमांतून बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आपल्याला माहीत होतात, त्यावर आपण विचार करू लागतो. असाच एक लेख माझ्या वाचनात आला आणि योगायोगाने तो माझ्या महाविद्यालयात एका वर्गाला शिकवण्याची संधी मला मिळाली.

एका द्रष्ट्या, विचारशील माणसाची दूरदृष्टी, स्तिमित करून टाकणारा, समाजमनाचा खोलवर अभ्यास करणारा 'Prospects of Democracy in India' हा लेख. 'भारतातल्या लोकशाहीचं भवितव्य!' १९५६ मध्ये लिहिलेला हा लेख, ६२ वर्षांनंतरसुद्धा आजच्या अगदी तंत्रज्ञानात प्रगत असलेल्या परिस्थितीतही किती तंतोतंत लागू पडतो, हे वाचून सखेद आश्चर्य वाटले.

कोणत्याही प्रकारच्या कल्पनाशक्तीमध्ये न रमता, सभोवतालची परिस्थिती, आजूबाजूचं वास्तव नेमकं काय आहे, या प्रश्नाला थेट भिडणारे त्यांचे विचार या लेखातून वाचायला मिळाले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, लगेचच राज्यघटना लिहिली गेली आणि २६ जानेवारी १९५० ला प्रजासत्ताक आले. तेव्हापासून तीच राज्यघटना प्रस्थापित आहे; ही विलक्षण कौतुकाचीच गोष्ट समजली जाते. मग प्रजासत्ताक असणं म्हणजे लोकशाही का? लोकशाहीचं मूळ कशात आहे? या मध्ये असणारी साशंकता; या प्रश्नावर सडेतोड चर्चा करणारा हा लेख.

अनेक विचारवंत, तत्त्ववेत्ते, लेखक आणि राजकीय तज्ज्ञ यांनी लोकशाहीबद्दलची आपली मते मांडली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही मानवी अधिकार आणि लोकशाही याविषयी निरतिशय कळवळा होता. लोकशाही ही एक सामाजिक संस्था आहे असं ते मानतात. सामाजिक नातेसंबंधात लोकशाही आहे यावर त्यांचा विश्वास होता.भारतामध्ये लोकशाही आहे का? अशा प्रश्नावर शाळेतल्या मुलांपासून, पंतप्रधानांपर्यंत सारे जोरदार उत्तर देतील, 'हो!'. आणि पोपटासारखी पाठ केलेली, इंग्रजीतल्या alliteration या अलंकाराचं उदाहरण वाटावी, त्याला असलेली लय आवडल्यामुळे पाठ झालेली व्याख्या म्हणजे, 'लोकांनी, लोकांसाठी केलेलं लोकांचं राज्य म्हणजे लोकशाही' असे सांगतील. बहुतेक साऱ्या भारतीयांना अभिमान असावा, अशी ही घटना. आपल्या लेखात आंबेडकर म्हणतात, 'परकीय राष्ट्रांमध्ये सुद्धा आंतरराष्ट्रीय वैचारिक देवाणघेवाणीच्या वेळी होणाऱ्या चर्चेमध्ये हे परदेशी नेते भारतीय पंतप्रधान आणि भारतातली लोकशाही यांची मोठी भलावण करत असतात. अत्यंत सन्मानाने त्याचा उल्लेख केला जातो. कदाचित साऱ्यांचाच असा संभ्रम असावा की जिथे प्रजासत्ताक आहे तिथे लोकशाही असणारच. लोकशाही असण्यासाठी आवश्यक गोष्टींची जर यादी केली तर भारतात सगळं आहे.

- *राज्यकारभाराची प्रणाली,*
- *न्याय व्यवस्था,*
- *प्रौढ मतदानाने होणारी निवडणूक पद्धत आणि*
- *मतदानाचा अधिकार*

लोकशाहीचे हे चार आधारस्तंभ, पण प्रत्यक्षात आपल्याला मान्य करण्याखेरीज गत्यंतर नाही की या संकल्पनेला किती तडे गेले आहेत आणि त्यात किती उणिवा आहेत.


आपल्याकडील प्रचलित प्रौढ मतदान पद्धतीने, आपल्या प्रतिनिधीला निवडून दिल्यानंतर, हे सारे सरकारचे प्रतिनिधी कायदेकानून तयार करतात. आंबेडकर विचारतात, 'याला लोकशाही म्हणायचे का?' म्हणजे 'लोकशाही हे जर राजकीय शस्त्र मानलं तर हे शस्त्र जिथे, तिथे लोकशाही' अशा समीकरणामध्ये सारे गुरफटले गेलेले दिसतात. मग डॉ. आंबेडकरांनी विचारलेल्या प्रश्नाचं खरं उत्तर काय? भारतात लोकशाही आहे का? सरकारचे लोकसभेचे कामकाज वगळले तर लोकशाही आहे असे म्हणता येईल का? किंवा प्रजासत्ताक असणं म्हणजे लोकशाही आहे असं म्हणता येईल का? या दोन्हीचंही विचारांती होकारात्मक उत्तर देता येणार नाही.


लोकशाहीची पाळंमुळं शासन, लोकसभा एवढ्यापुरती मर्यादित नाहीत, तर याच्यापेक्षा अधिक व्यापक अर्थ त्याला आहे. आंबेडकर लिहितात, 'लोकशाहीची मुळं सामाजिक


नातेसंबंधात आहेत.' समाज आणि नातेसंबंध. या दोन शब्दांकडे ते आपलं लक्ष वेधून घेतात, अन्यथा हे किती गुळगुळीत झालेले शब्द आहेत! समाज म्हणजे समुदायाने एकत्र राहणारे लोक. जिव्हाळ्याने, आपलेपणाने, निष्ठेने, आपल्याबरोबर इतरांचही चांगलं व्हावं, त्यांना मदत व्हावी; या सहकाराला नातेसंबंध म्हणतात. आणि पुन्हा ते प्रश्न विचारतात, 'भारतीय समाजामध्ये असे नातेसंबंध आहेत का?' सॉक्रेटीस या तत्त्ववेत्त्यासारखे उत्तर मिळेपर्यंत प्रश्नातून ते प्रश्न निर्माण करत जातात. जसं-जसं उत्तर मिळत जाईल, तसे पुन्हा प्रश्न; प्रश्नाची नक्की उकल होईपर्यंत. तर भारतीय समाज कसा बनला आहे? अनेक व्यक्तींचा समुदाय असा आहे का? तर त्याचं उत्तर नकारार्थी आहे. बाबासाहेब उत्तर देतात, 'It consists of innumerable collection of castes which are exclusive in their life and have no common experience to share and have no bond of sympathy.' असंख्य जातींचा समुदाय, ज्यांचे जीवनानुभव इतर कोणाचबरोबर छेदले जात नाहीत. एकमेकांच्यातले अनुभव समजून घेणे नाही. एकमेकांच्या अनुभवांबद्दल सहानुभूती नाही, असा एकत्र असलेला आपला भारतीय समुदाय, भारतीय समाज. अशा जातींवर आधारलेल्या आणि समाजाच्या एकतानतेला धिक्कारणाऱ्या समाजात लोकशाही कशी असणार?

माझे एक वृक्षप्रेमी मित्र मला म्हणाले की एकाच जातीची झाडं एकत्र असली की ती जोमानं वाढतात, पण ही झाडं, दुसऱ्या झाडांना अपाय करत नाहीत. सगळी झाडे आपल्याला हवे तसे वाढतात, त्यांचा आवडता शब्द आहे, 'क्लस्टर'. हे माणसांनाही लागू आहेच की! पुस्तकांच्या दुकानात जाणारी माणसं, संगीताच्या कार्यक्रमाला जाणारी माणसं, एखाद्या खाण्याच्या टपरीवर जाणारी माणसं, या सगळ्यामध्ये एक समानशीलतेची भावना असते, यामुळे आवडीच्या लोकांमध्ये जाणं होतं, प्रत्यक्ष बोलणं आणि चर्चा केली जाते, त्यामुळे एकत्रित वाढ होऊ शकते. असेच व्हायला हवे. दुसऱ्यांना छाटून आपण मोठे होत नाही.

आंबेडकर म्हणतात, ''अशा सामाजिक




संबंधात लोकशाही आहे. लोकशाही प्रस्थापित करायची असेल तर आर्थिक आणि त्यामुळे घडणाऱ्या सामाजिक क्रांतीमध्ये आमूलाग्र बदल घडण्यासाठी काही गोष्टींची आवश्यकता आहे. त्या म्हणजे- जातिभेद नसावा, एकमेकांमध्ये विरोध नसावा, कायदा आणि सुव्यवस्थेमध्ये समता असावी, बहुसंख्यांकांचा जुलुम नसावा, समाजात नैतिक मूल्यांची जपणूक व्हावी आणि समाजातील व्यक्तीव्यक्तींमध्ये सदसद्‌विवेकाचे भान असावे.''

बाबासाहेबांच्या मते हे सहजीवन आहे. ते म्हणतात, 'Democracy is not merely a form of government. It is primarily a mode of associate living, of conjoint communicated experience. It is essentially an attitude of respect and reverence towards our fellow men.' ते आपल्यापुढे प्रश्न उभा करतात; की संविधान, शिक्षणाची अंमलबजावणी, किंवा इतर बाबी, आपण नेमके कशात आणि कुठे कमी पडलो? ते लिहितात, 'भारतीय समाजात प्रत्येक क्षेत्राचा पाया 'जात' आहे. कोणत्याही कोपऱ्यातल्या भारतीय समाजाकडे पहा, तिथे माणसांपेक्षा ठळक, त्याची जात आधी नजरेत भरते; मनात येते. एक भारतीय माणूस दुसऱ्या भारतीय माणसाबरोबर खाऊपिऊ शकत नाही, लग्न करू शकत नाही. केवळ आणि केवळ तो किंवा ती त्या जातीची नाही म्हणून! जातीजातींमुळे भारतीय समाजरचनेमध्ये अदृश्य वाटणारे पण स्पष्टपणे समाजाचे तुकडे आपल्याला जाणवतात. .. आजही; ६२ वर्षानंतरसुद्धा!

शिक्षणक्षेत्र असो, कारखाने असोत, कल्याणकारी संस्था असोत, इथपासून अगदी छोट्या वाटणाऱ्या परीक्षा तपासणीच्या लॉबी असोत, जेवणखाण्याच्या पद्धती असोत, सगळेजण एकमेकांना सामावून घेण्याऐवजी, एकमेकात मिसळून जाण्याऐवजी एकमेकांपासून खंडित झालेले दिसतात. जातींच्या लोखंडी भिंतींनी माणसाला विभक्त केलं आहे. माध्यमे आणि राजकारणी जात विसरायला लावू देत नाहीत; उलट जातभिन्नता ठसवत रहातात; प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे!

विरोध तर जनमानसाचा कणा आहे. विरोधाशिवाय शक्तिप्रदर्शनाचं सुख मिळत

नाही. राजकारणाचा वापर व्यक्तिगत स्वार्थासाठी, सतत, सगळेच राजकारणी करत राहिल्यामुळे भ्रष्टाचार फोफावला. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था कोलमडली. कोणी नगरसेवक झालं किंवा कोणी राजकारणात आला की आधी त्याचा बंगला होतो, परदेशी गाड्या येतात, त्याचे नातेवाईक श्रीमंत होतात, शेकडो एकर जमिनी स्वत:च्या मालकीच्या होतात. अशा व्यक्तिगत स्वार्थाच्या नेतृत्वामुळे खरी लोकशाही कशी निर्माण होणार? या सगळ्याचा पाया जातिभिन्नता हाच. अशा जातिव्यवस्थेबद्दल आपले परखड मत व्यक्त करताना डॉ. आंबेडकर म्हणतात, ''जातींमध्ये थर आहेत, असमानता आहे. विविध जातींचा 'स्टेटस'सारखा नाही, समान नाही. त्यांच्यामध्ये उतरंड आहे. उच्चनीचता आहे, एकमेकांबद्दल असूया आहे.चढता तिरस्कार आहे आणि उतरती तुच्छता आहे. यामुळे प्रेम, सहकार, परोपकार याला जागाच शिल्लक राहत नाही. असा जातीयवाद लोकशाही या संकल्पनेची मुळे छाटून टाकतो. या जातीयवादामुळे व्यक्तीची वाढ खुंटते, समुदायाची वाढ खुंटते. पर्यायाने समाजाची खुंटते. खुंटलेल्या समाजात लोकशाही कधीच प्रस्थापित होऊ शकणार नाही.''

आंबेडकरांना समाजातील जातीविषमता नष्ट व्हायला हवी यासाठी कळवळा होता. ते म्हणतात, ''भारतीय समाजात एक भारतीय दुसऱ्या भारतीयाबरोबर सहजपणे जेवू शकत नाही, लग्न करू शकत नाही कारण तो त्या जातीचा नसतो. राजकारणामध्येही याचेच प्रतिबिंब दिसते.'' कसे होते आपल्याकडे मतदान? माणसाची कुवत बघून नाही तर तो आपल्या जातीचा आहे का यावर मत ठरते. परंपरेने कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातींमध्येसुद्धा उच्चनीचतेची उतरंड असते. प्रत्येक जातीत वरच्यांना आपल्यामध्ये खालच्यांना सामावून घ्यायचे नसते, कारण आपली प्रत आणि प्रतिष्ठा डागाळण्याची त्यांना भीती असते. आंबेडकर ठरावीक जातीत जन्माला आलेल्यांबद्दल नव्हे तर समाजातून वेगवेगळ्या संधी, शिक्षण यापासून वंचित झालेल्या लोकांबद्दल बोलतात. ज्या लोकशाही समाजामध्ये कोणत्याही व्यक्तीच्या आपसूक अभिव्यक्तीला मुरड घातली जाते आणि याचे कारण जर 'जात' असेल, त्यावरून ठरणाऱ्या भिन्नतेमुळे जर समाजाची प्रगती खुंटणार असेल, तर लोकशाहीच्या मूल्यांची पण गती आपोआपच खुंटणार नाही का?

मग ते पुन्हा प्रश्न विचारतात की या जाती व्यवस्थेचा अंत कसा करायचा? वरच्या दर्जाचे आणि खालच्या दर्जाचे ही विभागणी नाहीशी कशी होणार? शिक्षणव्यवस्था याला मदत करू शकते का? याचे उत्तर ते म्हणतात, 'हो'ही आहे आणि 'नाही'ही आहे. आपण पहातो की ब्राह्मण समाजातील जवळ-जवळ शंभर टक्के लोक शिक्षित आहेत, पण ते तरी जातिव्यवस्थेच्या विरोधी आहेत का? उलट त्यांना आपली प्रगती रोखणारा दुसरा अडसर नकोच; म्हणून ते जातिव्यवस्थेला अप्रत्यक्षरित्या पाठिंबाच देत असतात आणि हीच शिक्षण व्यवस्थेची नाचक्की आहे. म्हणून शिक्षणव्यवस्थेचा उपयोग नाही, पण उलटपक्षी खालच्या समजल्या वर्गांना जर शिक्षण मिळाले, जर त्यांच्यातील अस्मिता जागृत झाली, तर या संधी मिळवण्यासाठी ते हिरिरीने प्रयत्न करतील. जातीच्या आवरणाखाली घुसमटून बसणार नाहीत. जातिव्यवस्था संपुष्टात येईल म्हणून शिक्षण मदत करू शकेल. असे न झाल्यास, जातिभेदांना पाठिंबा देणाऱ्यांना, शिक्षण देण्यामुळे लोकशाहीचे भवितव्य बदलण्याची आशा तर दूरच पण ते लोकशाही मूल्यांसाठी अधिक धोकादायक ठरेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या विचारांमागे असलेली भावना, कळकळ आणि आशा समजून घेऊन प्रत्येकाने, किमान आपल्या स्वत:पासून या बदलाची सुरुवात केली तर न जाणो, कदाचित कधीतरी, येणाऱ्या भविष्यात, निदान येणाऱ्या नव्या पिढ्यांसाठी आपण लोकशाहीची खरी मूल्यं पेरू, या आश्वासक बदलाच्या प्रतीक्षेत राहू या, आणि त्यांच्या महानिर्वाणदिनी खऱ्या अर्थाने त्यांना आदरांजली देऊया.

– **डॉ. अपर्णा महाजन**
भ्रमणध्वनी : ९८२२०५९६७८
aparnavm@gmail.com

॥ग्रंथाली॥

**ज्ञानराज पाटकर** लिखित

# स्वल्पविराम

राजन पाटकरने लिहिलेले 'किडनी ट्रांसप्लांट' अर्थात किडनी-प्रत्यारोपणबाबतचे हे पुस्तक अशा रंजक आणि ओघवत्या शैलीत लिहिलेले आहे, की तुम्हाला वाटेल राजन आपल्याशी गप्पा मारत त्याच्या किडनीची कहाणी सांगतोय. महानगरी जीवनातील व्यस्त जीवनात जीवघेण्या व्याधींशी सशक्त मनाने मुकाबला करण्याचे बळ देणारे हे पुस्तक.




**मूल्य १२५ रु.**
**सवलतीत ७० रु.**



**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**

**रामचंद्र वरक** लिखित

# धनगरगाथा

'धनगरगाथा' हा कुलाचार आणि कुलधर्म यातून उलगडत जाणारा एका संस्कृतीचा आढावा आहे. जीवनमान आणि कलांच्या माध्यमातून, धनगरांचं अवघं जगणं आविष्कृत करणारी, इतिहासातील एका दुर्लक्षित पानावर प्रकाशझोत टाकणारी आणि धनगर जातीच्या इतिहासाला नवा आयाम देणारी ही गाथा जाणकारांच्या संग्रही हवीच.

# भूमिकेचं सोनं करणाऱ्या लालनताई

विवेक लागू

अभिनयाच्या क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या लालन सारंग, त्यांच्या वाट्याला आलेली प्रत्येक भूमिका अक्षरश: जगल्या. रंगभूमीवरील त्यांची निष्ठा नव्या रंगकर्मींना सदोदित प्रेरणा देत राहील!

**१९** नोव्हेंबर २०१८ रोजी यशवंत नाट्य संकुलात लालन सारंग यांच्या स्मरणार्थ कार्यक्रम झाला. नुसतं लालनताईंबद्दल मला बोलता येत नाही, सोबत कमलाकर सारंग असणारच.

गेल्या वर्षी असाच एक कार्यक्रम रीमाच्या साठाव्या वाढदिवशी तिच्या स्मरणार्थ आम्ही केला. त्यात लालनताईंची एक छोटी मुलाखत शूट करण्याच्या निमित्ताने पुण्याच्या त्यांच्या घरी जाऊन त्यांना भेटलो. तेव्हा स्वत:च्या शारीरिक व्याधी सहन करत, प्रसंगी त्याकडे दुर्लक्ष करत त्या रीमाविषयी आस्थेने नेमकं बोलल्या. एक अभिनेत्री दुसऱ्या अभिनेत्रीबद्दल कळकळीने आस्थेने इतकं चांगलं बोलते?याचं कारण त्या दोघींचे संबंध गहिरे जिव्हाळ्याचे होते, पण तेव्हाच लालनताईंना होणारा त्रास माझ्या लक्षात आला होता.

अगदी अलीकडे या वर्षी जूनच्या शेवटी मी आणि माझी मुलगी त्यांना पुण्यात साठे हॉस्पिटलमध्ये भेटलो. रीमाच्या स्मरणार्थ माझ्या मुलीने त्यांना लिहिलेलं पत्रं आणि पत्रासोबत एक छोटीशी भेट द्यायला गेलो होतो.त्या पत्राचा थोडक्यात मजकूर असा..

प्रिय लालनताई,

गेल्या वर्षी २१ जूनला मम्माच्या आठवणी जागवण्यासाठी तुम्ही वेळात वेळ काढून आम्हा सर्वांसाठी तुमच्या मम्मासंबंधी असलेल्या आठवणी पुण्याहून पाठवल्यात. मला हे खूप भावलं. या वर्षी तिच्या वाढदिवसाला मी आपल्या काही आठवणींना उजळा देते.

अशी खूप मोजकी माणसं आहेत की ज्यांनी मम्माला जाणून घेतलं आणि तिला आहे तशी स्वीकारलं. त्यापैकी तुम्ही एक. तुम्ही तिच्या माहेरच्या माणसांपैकीच एक होतात जणू! त्यामुळेच तुम्ही तिचे केलेले लाड मनसोक्त उपभोगणं तिला फार आवडायचं. मी कायमच तिच्याकडून तुमच्याबद्दलच्या मन प्रसन्न करणाऱ्या गोष्टी ऐकल्यात. ती मला कायम सांगायची की तिला तिच्या आवडीचे पदार्थ खाऊ घालायची एकही संधी तुम्ही सोडली नाहीत. ती कधीही कुठेही पुण्यात असली की तुम्ही तिला तिच्या आवडीची कर्ली वेळात वेळ काढून पाठवायचात. एकदा मला आठवतय, ती पुण्याहून मुंबईला येत होती. तुम्ही तिला कर्ली आणि कोलंबी दिली होती. मी तिला सांगितलं होतं की माझ्यासाठी पण थोडं ठेव कारण मासे मलाही आवडतात, पण ती मुंबईला पोचल्यावर तिनं मला अतिशय अवघडून सांगितलं की सगळा डबा तिने चाटून-पुसून फस्त केलाय. तेव्हा आम्ही दोघी खळखळून हसलो होतो. तिला तुमच्या सोबत खूप उबदार, आरामदायक आणि सुरक्षित वाटत असेल. त्यामुळेच ती तुमच्याशी लहान मुलासारखी वागायची. तुम्हा दोघीत ग्रह आणि पूर्वग्रहांना स्थान नव्हतं असं तिने मला एकदा सांगितलं होतं आणि बहुधा म्हणूनच तिचं तुमच्यावर निखळ प्रेम होतं.

तुम्ही तिच्याविषयी बोलताना तुमचंही तिच्याबद्दलचं हे असं निखळ प्रेम मला जाणवलेलं आहे.

हे पत्रं स्वीकारल्यावर आयुष्यभर स्वीकारलेल्या,अंगिकारलेल्या भूमिका समरसून सादर करण्याचा अभिनय करणाऱ्या आणि साठे हॉस्पिटलमध्ये उपचार घेणाऱ्या लालनताई कसनुशा होत म्हणाल्या, ''हे लोक मला काय झालंय हे सांगतच नाहीत.कंटाळले रे.''

पण मग पटकन चेहऱ्यावर काळजीपूर्वक कुतूहल जागवीत आपण नाटकवाले कशी सहकलाकाराची चौकशी करतो तशी त्यांनी माझ्याकडे रमेशची भाटकरची चौकशी केली. म्हणाल्या, ''काल त्याला कळलं मी इथे आहे, तशी आला मला भेटायला. खूप गप्पा मारत होता. पण इथे कशाला आलाय काही बोलला नाही.''

मी म्हणालो, ''तो इथे आलाय हे मला हॉस्पिटलच्या दाराशी कळलंय. मी आत शिरल्यावर एकानी मला विचारलं कुणाला भेटायला आलात? मी विचारलं कोणकोण आहेत इथे? तेव्हा त्यांनी तुमचं आणि रम्याचं नाव घेतलं. आता जाताना त्याला भेटतो.''

आम्ही लालनताईचा निरोप घेऊन निघालो.

लालनताई वारल्या ही बातमी समजल्यावर मनात आलं, 'जंगली कबुतर' नाटकात काम करणारे नारायण पै, निळूभाऊ









फुले, कमलाकर सारंग आणि आता लालनताई गेले. राहिलो मी, माझ्या आधी काम करणारा अच्युत देशिंगकर, लीलाधर मयेकर आणि कबुतरं!''

१९७४ साली जूनमध्ये विजयाबाईंच्या शिबिराच्या निमित्ताने मी कायमचा मुंबईला आलो. कानात संगीत आणि मनात दिग्दर्शक व्हायचे विचार असताना बाईंनी अभिनयाचे धडे गिरवून घेतले. सुलभा देशपांडे शिबिराला यायची. तिनं 'अविष्कार'मध्ये दाखल व्हायचं सुचवलं. त्यानंतर कमलाकर आणि लालन सारंग यांची भेट व्हायची होती.

शिबिरार्थींना तेव्हा व्यावसायिक नाटकाचे प्रयोग दाखवले जात. तेव्हा मी 'जंगली कबुतर' या नाटकाचा प्रयोग पहिला. भारावून गेलो. हे असं कधी पाहिलं नव्हतं. वेश्या असतात असं वाचलं होत पण मनाविरुद्ध एकच व्यवसाय करणाऱ्या मायलेकींची शोकांतिका पहिली आणि थक्क झालो.या नाटकाच्या नेपथ्यात भिंती काळ्या होत्या. त्यात लालनताईचा सॉरी पहुडलेल्या 'गुल'चा एक भव्य फोटो लावलेला होता. केनची हॅंगिंग चेअर मधोमध अप स्टेजला लटकवलेली. अपस्टेजला उजवीकडे बाहेरून आत यायचा दरवाजा, डावीकडे आत जाणारे एका खाली एक असे दोन मार्ग. आणि त्या बाजूला बांबूचं पिंजऱ्यासारखं स्ट्रक्चर! कमलाकर सारंग यांनी दिलेल्या हालचाली आणि लालनताई साकारत असलेली गुल सगळा रंगमंच व्यापून टाकत असे. त्यात तिसऱ्या अंकातली निळू भाऊंची चिरून टाकणारी एन्ट्री. कमलाकर आणि लालन सारंग ही जोडी माझ्या मनात घर करून राहिली.

तेव्हा कुठे मला माहीत होतं की मी या नाटकात काम काम करणाराय? पण शिबिरांनी माझी थोडी हवा झाली आणि सारंगांनी मला साहित्य संघाच्या बाहेर काम करण्या विषयी विचारलं. सारंग तेव्हा गिरगावात कसे? बहुधा लॅमिंग्टन रोडवर राहणाऱ्या राकेशला भेटायला आले असतील असा आज उलगडा होतो. कमलाकरना नाही म्हणायचा प्रश्नच नव्हता. शिवाय मी बेकार पदवीधर तर होतो. माझ्या जागी काम करणाऱ्या अच्युत देशिंगकरची रजा संपली होती आणि सरला येवलेकरच्या जागी संजीवनी बिडकर अशी दोघांची तालीम सुरू झाली. सारंग तालीम सुरू करायचे, पण तालीम घ्यायच्या लालनताई. कौतुकाने माझ्याकडे पहायच्या. संजीवनीला हातचं काही न राखता बारकावे सांगायच्या, शिवाय भूमिका समजावताना मोकळीकही द्यायच्या.

यात एक आणखी गंमत होती. सुलभा देशपांडेची एक बहीण जी माझ्या स्मरणाप्रमाणे ऑस्ट्रेलियात स्थायिक होती, पण या तालमीच्या वेळेस मुंबईत होती, तिला काही करून एका प्रयोगात कबुतराचं काम करायचं होतं. झालं या सारंग आडनावाच्या हौशी जोडप्यानं तिची तालीमही संजीवनीबरोबरच घेतली. तिनं आणि मी पहिला प्रयोग पालघरला केला, बांबूच्या मंचावर लेवल विरहीत सेटवर. तो बांबूचा मंच हलता होता. अप स्टेजला लालनताई हलल्या की डाऊन स्टेजवर मी वर खाली होत असे. पहिल्याच प्रयोगात मी आणि कबुतर जोडीनं मॅट्रिक पास झालो. दुसऱ्या

दिवशी संजीवनीसोबत माझं शिवाजी मंदिर, दुपारला पोस्ट ग्रॅज्युएशन झालं. इथेच सांगतो मला अच्युत इतकीच नाईट दिली गेली. मी नवीन म्हणून एक पैसा कमी नाही. इथे सारंग वेगळे ठरतात. तसंच अच्युतसारखं काम कर असं कमलाकर किवा लालनताईनी एक पैशानी सुद्धा सुचवलं नाही.

दौऱ्यात बसमध्ये रात्रीच्या प्रवासात पहिल्या तीन सीटरवर लालनताई निजायच्या. त्यांच्या पायाशी टेपरेकॉर्डरचा खोका. बाजूला दोन सीटरवर मी पाय मुडपून. कैची मारून निजायला मला लालन ताईनी शिकवलं. बाहेरगावी रात्रीच्या प्रयोगानंतर कमलाकर, निळूभाऊ, नारायण ड्रिंक घ्यायचे. मी लांब कुठेतरी बसायचो. कमलाकरनी मला सांगितलं वेगळं बसायचं नाही. आमच्यात बस. लालनही बसते.काही आम्ही गॉसिपिंग करत नाही. कुणी काय चांगलं वाचलं, पाहिलं, कुणाला काही चांगलं करायचंय ह्याविषयीच आम्ही बोलतो. नाटकात काम करणारं हे असं जोडपं विरळा.

लालनताई उत्तम स्वयंपाक करायच्या याची माहिती झाली.या दांपत्याने मला मासे खायला शिकवलं. गोव्याला गेलो तर आता मी २४/७ भात आणि फिश करी खात आनंदाने जगू शकतो. तोच आनंद पुण्यात लालनताईंनी सुरू केलेल्या मासेमारीतही मला मिळतो. जे काटे चावता येतील ते चाव. बाकीचे मुन्सिपाल्टीत टाक असं दिग्दर्शन कमलाकरनी मला केलं. मुन्सिपाल्टी म्हणजे एक छोटी थाळी काटे टाकण्यासाठी ठेवलेली.

'जंगली कबुतर'च्या महोत्सवी प्रयोगाला दिलीपकुमार प्रमुख पाहुणा म्हणून आले होते. मध्यंतरानंतर त्यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देण्याचा कार्यक्रम होता. विंगेतून मी तो पहात होतो. स्टेजवर कमलाकर, लालनताई आणि निळूभाऊ, दिलीपकुमार सोबत होते.नाटकावर बोलताना मधेच दिलीपकुमार यांनी माझी चौकशी करून मला स्टेजवर बोलवून घेतलं. म्हणाले, नाटकातली सगळ्यात अवघड भूमिका यानं उत्तम केली. लेखकांनी याला काही दिलंच नाही. लेखकांनी जे दिलं नाही ते मला सारंग दांपत्याने दिलं म्हणूनच माझं काम चांगलं होत असेल. कारण मंचावरच्या माझ्या अबोल हालचाली आणि माझी घडवलेली देहबोली, बॉडी लँग्वेज खूप काही बोलत असे.

लालन आणि कमलाकर सारंग हे मुंबईतल्या माझ्या पालकांपैकी एक! या नाटकामुळे मला नोकरी लागली. माझ्या जागी सारंगांना दुसरा कलाकार घ्यावा लागला. काही प्रयोगांनंतर जेव्हा त्यांच्या ध्यानात आलं की विवेक नसताना प्रयोगाचा परिणाम पूर्वी सारखा होत नाही तेव्हा त्यांनी मला पत्र पाठवलं की किमान मुंबई पुण्याचे प्रयोग कर आणि मला खात्री आहे की बँकेतल्या माझ्या वरिष्ठांना सुद्धा त्यांनीच पटवलं असणार, मग मी सगळेच प्रयोग करू लागलो. या सगळ्या मागे लालनताईंचं धोरण असणार. कमलाकर खूप संवेदनाशील..पण लालनताई व्यवहारी, संतुलित.

सतत दौरे करून लालनताईंना हवा असलेला आहार मिळायचा नाही. सतत तडजोड करावी लागायची, पण कमलाकर त्यातल्या त्यात त्यांची आवड पुरवायचा प्रयत्न करत असायचे.

लालनताईंना भेटायला येणाऱ्या माणसांची चट्कन पारख करता यायची. भेटणाऱ्या माणसांशी कसं वागायचं, किती वेळ द्यायचा हे त्या अचूक ठरवत असत, तुलनेने कमलाकर किवा प्रसंगी निळूभाऊ कधी हळवे किवा गोंधळ झाल्यासारखे होत. पत्ते खेळताना असं कुणी भेटायला आलं आणि या दोघांपैकी कुणी भेटीत अडकलं की लालनताई म्हणायच्या, ''आयुष्याचा किती मौल्यवान वेळ हे वाया घालवतात.''

त्या उत्तम सुगरण होत्या, निर्भीड कलावंत होत्या पण याच बरोबर स्वत:सकट अवतीभवती अलिप्तपणे पहाण्याची दृष्टी त्यांना लाभलेली होती. हा अनुभव त्यांच्यासोबत दौरे करताना मला आणि इतर सहकलाकारांना आला. आवडीचं करायचं पण त्याचा व्यवसाय करताना त्याला वाणिज्य शाखेची जोड द्यायची मग ते किचन असो की रंगमंच अथवा ब्युटिक!

असचं बालगंधर्व रंग मंदिरात आमचा रात्रीचा प्रयोग असताना संध्याकाळी सखाराम बाईंडरचा प्रयोग पहिला. केवळ अविस्मरणीय! एक नंबर!

स्वत:चं सोफिस्टिकेटेड व्यक्तिमत्त्व पूर्ण बदलून एक गावरान, रांगडी, बिनधास्त चंपा उभी करताना लालनताईंनी काय केलं असेलं? चंपाची गावंढळ भाषा, आठवारी साडी, केळं काढून सहावारी नेसणं, केशरचना, कपाळावर मोठ्ठं लाल कुंकू, चेहऱ्यावर गोंदण, डोक्यावरून घेतलेला पदर वारंवार डोक्यावरून घसरल्यावर, वारंवार डाव्या हाताने सावरून पुन्हा डोक्यावर घेणं, चंपाचं स्वत:च्या डौलात रंगमंचावर येणं, तिचं सखारामच्या घरात निरिच्छपणाने प्रवेश करणं हे सगळं दाखवत, दुसऱ्या अंकात सखारामच्या घरात प्रवेश केल्यावर प्रेक्षकांची एक दाद यायची. कालांतराने ध्यानात आलं लालनताई मंचावर असताना लालनताई नसतात, 'बाईंडर'मध्ये त्या चंपा असतात, 'जंगली कबुतर'मध्ये त्या गुल असतात, 'आक्रोश'मध्ये वनिता, 'कमला'मध्ये सरिता, 'गिधाडे'मध्ये माणिक, 'जोडीदार'मध्ये शरयू, 'धंदेवाईक'मध्ये चंदा, 'बेबी'मध्ये अचला, 'सहज जिंकी मना'मध्ये मुक्ता आणि 'सूर्यास्त'मध्ये जनाई...लालनताईंनी विविध प्रकृतीच्या आणि वृत्तीच्या भूमिका जाणीवपूर्वक साकारल्या. कमलाकरचं म्हणणं होतं की, ''लालन ज्या भूमिकेत असते तशीच ती दिसते.'' त्या एका वाक्यात सगळं काही आलं.

प्रश्न पडतो 'बाईंडर'सारखं नाटक, त्यातली चंपाची चाकोरी पार धुळीस मिळवणारी भूमिका, सेन्सॉर बोर्ड, लिंग निर्मूलन समितीची आंदोलनं, समाजात होत असलेली चर्चा हे यांनी कसं सोसलं असेल, कसं पचवलं असेल? कारण नंतर 'जंगली कबुतर' करताना 'बाईंडर'च्या अनुभवाचा कडवटपणा मला त्यांच्या वागण्या-बोलण्यात कधीच जाणवला नाही. उलट एक हिंमत जाणवली की, 'तुम्ही मला वेगळी भूमिका द्याच पहा मी तिचं सोनं करते की नाही..'

श्री. ना. पेंडसेंचं 'रथचक्र' हे नाटक, नाटकातली 'ती' साकारणं हे फार मोठं दिव्य होतं. कोकणातल्या एका ब्राह्मण

घराण्यातल्या सगळीकडून अव्हेरल्या गेलेल्या मातेची कहाणी होती ती. नवऱ्यानं लग्न करून पदरात दोन मुलं टाकून घरातून पळून जाऊन संन्यास घेतलेला. त्यामुळे तो दोष तिच्यावर टाकणारे तिचे दीर-जावा. मोठ्या मुलाला घरगड्यासारखं वापरलं जाणं आणि धाकटा मुलगा अभ्यासात हुशार, पण कष्ट करणाऱ्या आईपेक्षा पळून जाऊन संन्यास घेतलेल्या बापाबद्दल ओढ. मोठ्या मुलानं काही तरी पोटापाण्याचं काम करावं आणि धाकटय़ानं शिक्षण पूर्ण करून खूप मोठं अधिकारपद प्राप्त करावं म्हणून अहोरात्र झपाटलेली 'ती'! त्यासाठी सगळ्यांचा विरोध पत्करून तालुक्यात जाऊन काबाडकष्ट करणाऱ्या तिच्या पदरात शेवटी काय पडतं? मोठा परत गावाकडे जाऊन शेणगोठाच करतो व एका लंगडय़ा मुलीशी लग्न करून संसार थाटतो. धाकटा मुलगा मुंबईला पळून जाऊन शिक्षण पूर्ण करतो, पण पुन्हा आईलाच दोष देतो. निराश झालेल्या 'ती'पुढे आत्महत्येशिवाय दुसरा पर्यायच राहत नाही.

तिचं ते सगळं सोसणं, भोगणं वाचतानासुद्धा अंगावर काटा येतो. लालनताईनी 'ती' रंगमंचावर जिवंत उभी केली. काही प्रयोगानंतर 'ती'चं भोगणं लालनताईना त्रास देऊ लागलं. एका प्रसंगात मोठ्याला, 'पुंड्याला' थांबवून ती कनवटीचा एक आणा त्याच्या हातावर ठेवते आणि केविलवाणी होऊन म्हणते, 'विड्या ओढ, पण कमी ओढ हं!' हे वाक्य उच्चारत असताना 'राकेश' त्यांच्या समोर उभा रहायला लागला. त्यालाच उद्देशून त्या बोलतायत असा भास त्यांना होऊ लागला. स्वत:च्या आईकडे राकेशला सोपवून त्यांना प्रयोग करायला लागायचे. शेवटी काही दिवस प्रयोग बंद ठेवून मन:स्थिती ठीक झाल्यावर लालन ताईनी पुन्हा प्रयोग सुरू केले..

कलावंताने 'स्विच ऑफ, स्विच ऑन' पद्धतीने काम करायचं असतं हे कितीही मान्य केलं तरी प्रत्येक वेळी तसं करायला जमतच असं नाही. भूमिकाही तुमच्या कळत-नकळत तुम्हाला घडवत असते, तुमच्यावर परिणाम करत असते. ती भूमिका व्यक्तिगत आयुष्यात डोकावू लागते, तुमच्याजवळ येऊ पाहते.अशा काही भूमिकांचे चांगले-वाईट ओरखडे कलाकाराला सहन करायला लागतात एका बाजूनी असंही म्हणता येईल, यातूनच कलाकार घडतो.

असंच कमला नाटकाचे प्रयोग चालू असताना लालनताईंना हळूहळू एकंदर भारतीय स्त्रीची व्यथा जाणवू लागली. हे सामजिक भान फार कमी कलाकारांना असत. कॉलेज जीवनात अचानक रंगमंचावर प्रवेश करणाऱ्या लालनताईंना या वाटेवर एक वळण मिळालं. ज्यामुळे त्यांच्यात खूप सकारात्मक बदल झाले. साहजिकच पुढे त्यांच्या हातून लेखन झालं ('नाटकामागील नाट्य', 'मी आणि माझ्या भूमिका') एकपात्री सादरीकरणं झाली. हॉटेल व्यावसायिक, उद्योजिका व्हायची मनीषाही पूर्ण झाली.

शेवटी 'सूर्यास्त' या नाटकाची तालीम मुंबईत चालू असताना निळूभाऊ कोल्हापुरात. कमलाकर आणि लालनताई यांनी निळूभाऊशी पत्र व्यवहार करत त्यांना नेपथ्य, रंगमंचावरच्या त्यांच्या हालचाली याची कल्पना देत नाटक सादर केलं, तेव्हा शुभारंभाच्या प्रयोगाआधी फक्त पाच दिवस मी आणि निळूभाऊ तालमीत होतो. अर्थात निळूभाऊ शुटींगमध्ये व्यस्त असल्यामुळे आणि मी योगायोगामुळे. नाटकात काम करणाऱ्या एका नटावरचा विश्वास उडाला तशी सारंगांनी मला फोन केला, बोलावून घेतलं आणि सांगितलं, ''भूमिका अगदी नगण्य म्हणावी अशी आहे पण तू त्यात काही रंग भरशील, माझा हा असा असा प्रॉब्लेम झालाय.'' कुटुंबातल्या माणसाला हक्काने बोलवावं तसं होतं ते. मी तयार झालो, पण एक विनंती केली की दोन महिने मी काम करेन. दोन महिने लीलाधर मयेकर काम करेल. आम्ही दोघांनीही घरं घेतली होती. दोघांनाही घराचे हप्ते फेडायचे होते. सारंग लगेच तयार झाले,इतकच नाही तर आम्हाला गृह कर्ज मिळवून देण्यातही सहभागी झाले.हे असं कौटुंबिक वातावरण नाट्यक्षेत्रात अभावानेच वाट्याला येतं.

कमलाकर, लालनताई आणि त्यांचा मुलगा राकेश.. तिघांबरोबर मला नाटकात काम करायची संधी मिळाली. ऑथेल्लो नाटकात काम करण्याचा माझ्यावर इतका ताण होता की नंतर कितीदा तरी मी आणि राकेश विंगेत एन्ट्रीला तयार असल्याचं मला स्वप्न पडलेलं आहे.

गुगलवर मी पाहिलं, लालन सारंग यांना ग.दि. माडगूळकर प्रतिष्ठानचा विद्याताई माडगूळकरांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणाऱ्या 'गृहिणी सखी सचिव' या पुरस्काराने सन्मानित केलं गेलं. पिंपरी-चिंचवडच्या 'कलारंग' सांस्कृतिक संस्थेतर्फे कलागौरव पुरस्कार प्राप्त झाला. (२२-१-२०१५) २००६ साली कणकवली येथे झालेल्या ८७व्या मराठी नाट्यसंमेलनाच्या त्या अध्यक्षा होत्या. अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेच्या कोथरूड शाखेतर्फे जीवनगौरव पुरस्कार (२४ जानेवारी, २०१७) पण सुमारे तीस नाटकांत विविध भूमिका करूनही, मराठी, हिंदी, गुजराथी रंगभूमीवर कारकीर्द करूनही त्यांना एकही शासकीय पुरस्कार मिळू नये याचा खेद वाटला.

अगदी शेवटी एक दृष्टांत सांगून थांबतो. १९७२ साली, सुमारे ४६ वर्षांपूर्वी संध्याकाळी मी पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिराच्या आवारात असताना एक गाडी येऊन थांबली. गाडीतून सारंग पती पत्नी झोकात उतरले. आणि मोठ्या उत्साहाने नाटक करायला मेकअप रूमकडे गेले. या दृश्याचा माझ्या भावी जीवनावर खूप परिणाम झाला. त्या दोघांना त्या दिवशी जसं पाहिलं, तेच दृश्य मी कायमचं स्मरणात ठेवणार आहे.

(लालन सारंग यांच्या यशवंत नाट्यसंकुलात आयोजित स्मरणसभेत व्यक्त केलेले मनोगत)

**- विवेक लागू**
vickylagoo@gmail.com

कार्यकर्ता विचारवंत

# प्रा. अविनाश डोळस

राम दोतोंडे

**दलित साहित्य व दलित चळवळीचा इतिहास नि:पक्षपातीपणे मांडला जावा याकरता आग्रही असणारे आणि आपल्या विद्यार्थ्यांमध्ये समाजाविषयी जबाबदारीची जाणीव पेरत जाणारे प्रा. अविनाश डोळस यांची प्रतिमा आठवणींमध्ये कायम कोरलेली आहे...**



**११** नोव्हेंबरला सकाळी ७.३० वाजता अचानक महेंद्र भवरेने प्रा. अविनाश डोळस सर आपल्यात राहिले नसल्याची बातमी फोनवरुन सांगितली आणि मी स्तब्ध झालो. मृत्यू अनाहूतच असतो, हे त्रिकाल सत्य असले तरी ते स्वीकारणे असह्य होऊन जाते. ती बातमी समजली तेव्हा मी पुण्यात होतो. सुरुवातीच्या धक्क्यातून सावरत औरंगाबादला निघालो. त्याचवेळी संपूर्ण महाराष्ट्रातून सर्वदूर पसरलेले सरांचे अनेक विद्यार्थी, चाहते, कार्यकर्ते मिळेल त्या वाहनाने औरंगाबादच्या दिशेने निघालेले होते.

गाडीत एकटाच होतो. नि:शब्द! काही सुचत नव्हतं. सर आता आपल्यात नाहीत हे वास्तव पचवणं खूप जड जात होतं. आज उभा महाराष्ट्र सरांना विचारवंत, राजकीय कार्यकर्ता, दलित चळवळीचा समर्थ भाष्यकार, कथाकार, नाटककार, दिग्दर्शक, समीक्षक म्हणून ओळखतो. परंतु, माझ्या सारखे अनेकजण सरांना आपले 'भाग्यविधाते' म्हणून ओळखतात. सर १९७४मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या मिलिंद कला महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. मीही त्याच वर्षी मॅट्रिकनंतर 'प्री युनिव्हर्सिटी कोर्स' म्हणजेच 'पीयुसी' करण्यासाठी मिलिंदमध्ये आलो होतो.

प्रा. अविनाश डोळस सरांचा पारंपरिक अर्थाने मी विद्यार्थी नाही. सरांचा अध्यापनाचा विषय मराठी. 'मराठी' माझा मुख्य विषयही नव्हता आणि 'सेकंड लँग्वेज'ही. डोळस सर तरी कुठे पारंपरिक अर्थाने केवळ विषयाच्या मर्यादेत बसणारे प्राध्यापक होते!

मला 'मिलिंद'ला शिक्षणासाठी आणले श्री. प्रल्हाद सोनुने यांनी! सोनुने यांचे शिक्षण 'मिलिंद'मध्येच झालेले होते. ते डोळस सरांच्या व्यक्तिमत्वाने खूप प्रभावित झालेले होते. त्यांना सरांबद्दल खूप आदर होता. मी प्रत्यक्ष महाविद्यालयात येण्यापूर्वीच त्यांनी मला डोळस सरांविषयी खूप काही सांगितलेलं होतं. ''ते खूप छान कथा लिहितात. बोलतात. डोळस सरांच खरं नाव रमेश डोळस आहे. लेखक म्हणून अविनाश हे त्यांचे टोपण नाव आहे. वगैरे. तुझं मराठी नसलं तरी काहीही करुन डोळस सरांना भेट. खूप हुशार माणूस आहे. तुला मदतही होईल;'' असंही सोनुने दादांनी आवर्जून सांगितलेलं. शिक्षणासाठी 'मिलिंद'च्या परिसरात पोहोचण्यापूर्वी डोळस सरांची अशी एक वेगळी प्रतिमा माझ्या मनात तयार झाली हाती.

प्रत्यक्ष मिलिंदला आल्यानंतर बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने सर्व वातावरण भारलेले होते. मिलिंदचे ते दीडशे-दीडशे विद्यार्थ्यांना सामावून घेणारे प्रचंड वर्ग. त्यातच १९७४ ला नुकतेच मराठवाडा विकासाचे, त्यासोबत शिष्यवृत्ती वाढीचे आंदोलन झालेले! परिणामी एरव्ही मार्च-एप्रिल मध्ये होणाऱ्या विद्यापीठाच्या परीक्षा लांबल्या. त्यावर्षी त्या जून-जुलैमध्ये झाल्या. संपूर्ण मराठवाड्यात दिवसा परीक्षा आणि रात्री 'पीयुसी'चे वर्ग होत होते. या गडबडीत एक दिवस भित्तिपत्रकासाठी साहित्य पाठविण्याची नोटीस स्वतः नोटीसबोर्डसमोर उभे राहून डोळस सर लावून घेत होते. कुठल्या तरी सिनियरने कुणाला तरी सांगितले; ''चल, डोळस सरांना भेटू.'' माझे कान टवकारले गेले. मीही त्या गर्दीत त्यांना 'जयभिम' केला. राजेश खन्ना स्टाईल केस. अर्ध्या बाह्यांचा झब्बा, कुणालाही आपलंसं करणारी, आश्वासक वाटणारी बोलण्याची लकब. सहजपणे तेथे हजर असलेल्या मुलांशी ते संवाद साधत होते. पहिल्या अप्रत्यक्ष भेटीतच सरांबरोबर जिव्हाळा निर्माण झाला.

भित्तिपत्रकात सरांनी मजकुरासाठी आवाहन केले होते. याच भित्तिपत्रकामुळे यशवंत मनोहर, योगीराज बाघमारे, स्वतः डोळस सर आणि इतर अनेक लिहिते झाले, हे नंतर कळले. या भित्तिपत्रकात मीही एक अनुभव लिहून दिला आणि सरांशी प्रत्यक्ष

भेटीगाठी व्हायला सुरुवात झाली.

सर सुरुवातीला मिलिंद वसतिगृहाचे रेक्टर होते. रात्री उशिरा वसतिगृहा-समोरच्या पटांगणात खुर्ची टाकून, मशेरी लावत, विद्यार्थ्यांशी गप्पा मारणे हा सरांचा आवडता कार्यक्रम होता. मी वसतिगृहात राहत नव्हतो, परंतु वसतिगृहात राहणाऱ्या काही मित्रांच्यामुळे हा सरांचा 'मशेरी क्लब' बघायला मिळाला. यात अनेक विषयांवर चर्चा व्हायची. सर सहजपणे अनेक गोष्टी सांगायचे. भोवताली घडणाऱ्या बदलाचे विश्लेषण करायचे. एकदा असाच फॅशनचा विषय निघाला. सध्या 'मिलिंद'ची मुलं गावाकडे जाताना टापटीप जातात. केसांचे, कपड्यांचे वेगवेगळे प्रयोग ती करतात. त्यामुळे गावात फॅशन ही दलित मुलं नेतात. हा मुद्दा सरांनी सहजपणे पटवून दिल्याचे आजही आठवते. ७४-७५ च्या काळातील एकूण पेहेरावातील गबाळेपणा लक्षात घेता याचे वेगळे महत्व आज लक्षात येते.




भित्तिपत्रकातील अनुभवामुळे सरांशी जवळीक वाढायला सुरुवात झाली. मुळात तेव्हा 'मिलिंद' आणि इतर महाविद्यालये यात खूप फरक होता. 'मिलिंद'मध्ये बाबासाहेबांच्या नावामुळे महाविद्यालयीन शिक्षणासाठी जरी मुले मोठ्या प्रमाणात येत असली तरी प्रचंड हलाखीतून ती येत असल्याने फाटकी असत. औरंगाबादच्या शहागंज भागात जुन्या वापरलेल्या 'आयताळ' कपड्यांचा बाजार भरत असे. या शहागंजच्या बाजारातून आणलेले 'आयताळ' कपडे माझ्यासह 'मिलिंद'मधल्या अनेक विद्यार्थ्यांनी घातलेले असत. अनेकांचे कपडे कुठे-कुठे फाटलेले असे. पायातल्या चपला-बुटांबद्दलही फारशी वेगळी स्थिती नसायची. अशा स्थितीतून आलेल्या मुलांना 'मिलिंद'चा फार मोठा आधार होता. दरमहा मिळणाऱ्या शिष्यवृत्तीमुळे स्वतःला जगवता यायचे. शिकवता यायचे. शिकताही यायचे. अनेक मुले शिक्षण घेत असताना हॉटेलात कपबशा विसळणे, वेटर, स्टीवर्ड म्हणून काम करीत होते. काही चिखलठाणा भागात नव्याने सुरु झालेल्या कारखान्यात मजूर म्हणूनही काम करीत होते. सामाजिकदृष्ट्या तो खूप संक्रमणाचा काळ होता. बाबासाहेबांच्यामुळे शिकलेल्यांची एक पिढी नुकतीच उभी राहिली होती. तरी अनेकांच्या घरातली पहिली पिढी शिक्षण घ्यायला लागली होती.

या परिस्थितीत ह्या मुलांचे भावविश्व समजून न घेता त्यांच्याकडून नुसत्याच भरमसाट अपेक्षा व्यक्त व्हायच्या. केवळ बाबासाहेबांच्या नावाची ढाल करुन उपदेशाचे डोस पाजले की आपले कर्तव्य संपले, अशी काही प्राध्यापकांची एक मानसिकता तेव्हा होती. मुलांच्या वाटेला यातून केवळ हताश होणे, एवढेच यायचे कारण फक्त विधानं केली जायची. प्रत्यक्षात मदतीच्या नावाने बोंब होती परंतु प्रा. अविनाश डोळस याला अपवाद होते. 'काय बेटे' या आश्वासक हाकेसह ते खांद्यावर हात ठेवून अनेकांना दिलासा द्यायचे. ''तुझीच परिस्थिती वाईट नाही. आपण सर्वजण यातून जात आहोत. येथे शिकायला येणे शक्य व्हावे यासाठी काहींनी बकऱ्या विकल्या, घरावरची पत्रे विकली, आईवडिलांनी पोट मारुन तुम्हाला येथे शिकायला पाठवलयं याची जाणीव ठेवा, बाबासाहेबांमुळे आपण आता शिष्यवृत्ती घेऊन शिकू शकतो. याचा फायदा घ्या. राबा. प्रयत्न करा;'' असं सांगून अनेकांना दिशा देण्याचे काम डोळस सर सहजपणे करायचे. 'शिवाय काही मदत लागली तर सांगा,' असं सहजपणे म्हणत आधारही द्यायचे. हे आश्वासन कधीच तोंड देखले नसायचे. प्रत्यक्षात मुलांना वाटेल ती मदत करायला सर नेहमीच उपलब्ध असायचे, तत्पर असायचे. यात डोळस सरांसोबत प्राचार्य ल.बा. रायमाने, प्रा. डॉ. मनोहर झिल्ठे हेही आघाडीवर असायचे. खरे तर माझ्यासह अनेकांसाठी हे तिघेही आई झालेले होते.

आपल्या मुलांनी पुस्तकी होऊ नये. प्रत्यक्ष समाज, त्याचे प्रश्न त्याला समजायला हवे असा त्यांचा आग्रह होता. त्या काळात एकूणच दलित चळवळीचे, दलित साहित्याचे जोमदार वातावरण होते. पँथर जोरात होते. पँथरचा सर्वत्र बोलबाला होता. ढसाळ-ढालेंच्या सभा, भाषणे. त्यांचे समाजमन ढवळून काढणारे लेख! पोलीस बंदोबस्त. सारेच अद्भुत होते. या धुमश्चक्रीत सरही सक्रिय होते. 'दलित युवक आघाडी' (दयुआ) ही संघटना इतर दलित संघटनांपेक्षा खूपच वेगळी होती. प्रतिकात्मक, भावनिक, सांकेतिक लढे लढायचे दिवस संपले अशी या संघटनेची भूमिका होती. त्यासाठी आर्थिक प्रश्न घेऊन वस्त्याच्या वस्त्या कशा उभ्या करता येतील? यासाठी या संघटनेचा आटापिटा चालला होता. त्याच भूमिकेमुळे प्रारंभी विद्यापीठ नामांतराला विरोध करण्याची 'दयुआ'ची भूमिका होती. परंतु, विधानसभेत नामांतराची घोषणा होताच मराठवाड्यात उसळलेल्या दंगलीमुळे 'दयुआ'ने आपली भूमिका बदलून नामांतराच्या लढ्यात सक्रिय होण्याचा निर्णय घेतला. त्या दंगलीच्या काळात 'दयुआ'ने विशेषतः प्रकाश शिरसाठने गावोगावी भटकून आपल्या लोकांना मदत करण्याचे, दिलासा देण्याचे खूप मोठे काम केले. त्या भटकंतीतून छावणीतील डोळस सरांच्या घरी आलेल्या प्रकाश शिरसाठच्या पायातून खूप काटे काढले होते, हे आजही प्रकर्षाने आठवते. यातूनच प्रा. माधव मोरे, प्रा. एस. के. जोगदंड, प्रकाश शिरसाठ आणि सर अशा अनेक कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांमुळे 'गायरान'ची चळवळ उभी करण्यात ही

संघटना यशस्वी झाली.

निजामाच्या काळात निजामाने दलितांना गायरानाच्या जमिनी इनाम दिल्या होत्या. मराठवाडा स्वतंत्र झाल्यानंतरही हे इनामनामे रद्द झालेले नसल्याने त्याचा आधार घेण्यात आला. या संघटनेच्या माध्यमातून मराठवाड्यात अशी सुमारे साडेसात हजार एकरापेक्षा जास्त 'गायरान'ची शेतजमीन ताब्यात घेण्यात आली. त्या-त्या गावातील स्थानिक कुटुंबात या जमिनीचे वाटप झाले. काही ठिकाणी भूमिहिन सवर्ण या लढ्यात सहभागी झाले. त्यांनाही जमीन वाटपात सहभागी करून घेण्यात आले, हे विशेष. नागापूर आणि इतर काही गावांत सामूहिक शेतीचे प्रयोग करण्यात आले. 'गायराना'सोबतच देवस्थानाची जमीन, पडिक जमीन भूमिहीनांना देण्यात, यावी यासाठी आग्रह धरला. सारेच अद्भुत होते. सर या लढ्यात सहभागी होत असतानाच लढ्याची वैचारिक आघाडीही समर्थपणे सांभाळायचे.




जातीय संघर्षातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांकडेही ही संघटना अतिशय वेगळ्या पद्धतीने पाहत होती. गायरान ताब्यात घेतले, लग्नाची वरात काढली, बाबासाहेबांची जयंती साजरी केली, सार्वजनिक स्मशानभूमीत दलिताचे प्रेत नेले, चांगले कपडे घातले. अशा कुठल्याही कारणाने दलितांना मारहाण, बहिष्कार असे प्रकार मोठ्या प्रमाणात सुरु झाले होते. बीड जिल्ह्यातील मांग-वडगाव येथे माजी मंत्री सुंदरराव सोळुंकेच्या नातेवाईकाने अशाच एका प्रकारात केलेल्या अत्याचाराविरुद्ध दलित अत्याचार प्रतिबंध कायद्याखाली खटला दाखल करण्यास 'दयुआ'ने भाग पाडले होते. यात त्या नातेवाईकाला शिक्षा झाली. शिक्षा होईपर्यंत नेटाने लढवलेला आणि शिक्षा झालेला हा त्या काळातला पहिलाच खटला होता. केस झाली तर शिक्षा होते, हे स्पष्ट झाल्याने दलित चळवळीला वेगळी धार आली होती.


अर्थात, हे लढे लढण्यासाठी या संघटनेत पदाधिकाऱ्यांची उतरंड नव्हती. निर्माण होणाऱ्या प्रश्नांच्या अनुषंगाने सर्वमान्य असा एक संयोजक नेमला जायचा. त्याच्या नेतृत्वाखाली, सर्व संमतीने आंदोलनाची दिशा ठरवली जायची. आंदोलन केले जायचे. संयोजक शक्यतो वेगळ्या जातीतला राहील याची काळजी घेतली जायची. म्हणजे बौध्दावर अन्याय झालेला असेल तर संयोजक मांग, चांभार किंवा इतर जमातींपैकी असायचा. सरांसोबत काम करता-करता मी कधी या संघटनेत सक्रिय झालो, हे मलाही कळले नाही.

'मिलिंद'ची मुलं आयुष्यात समर्थपणे उभी राहायला हवी. बाबासाहेबांचा वारसा सांगतांना केवळ भावनिकता नको असा डोळस सरांचा नेहमीच आग्रह असायचा. 'केवळ बाबासाहेबांच्या जातीत जन्माला आलो म्हणून मी आंबेडकरवादी' ही भूमिका त्यांना मान्य नव्हती. त्या काळात अशी प्रमाणपत्रे वाटण्याचे प्रकार खूप मोठ्या प्रमाणात होत होते. मुळात असे शिक्के मारणे त्यांना मान्य नसायचे. मी चर्मकार समाजातील असल्याने मला अनेकदा या प्रश्नाला सामोरे जावे लागायचे. एकदा या विषयावरून मी 'आंबेडकरवादी आहे किंवा नाही, हे ठरविण्याचा अधिकार मी कुणालाही दिलेला नाही.' अशी जाहीर भूमिका घेतली. त्यांनी माझी बाजू समजून घेऊन या प्रकारची 'मिलिंद' आणि भोवतालच्या परिसरात चालणारी चर्चा कशी घातक आहे, हे अनेकदा जाहीरपणे तेव्हा मांडले होते. तेव्हाच नाही तर आयुष्यभर ठामपणे सर माझ्या मागे उभे राहिले. सर तोंडदेखलेपणा कधी करायचे नाही. स्वतःला जे पटले ते-ते स्पष्टपणे बोलून मोकळे व्हायचे. अनेक विषयांवर त्यांच्याशी प्रचंड वाद घालता यायचा, भांडता यायचं. या चर्चेतून कधीही कटुता निर्माण झाली नाही. आपली भूमिका सोडू नका. भांडा, परंतु कुणाशीही संवाद पुन्हा प्रस्थापित होऊ शकेल, अशी जागा ठेवा. असा त्यांचा आग्रह असायचा. मूल्यांसाठी कुणाशीही संघर्ष करायची सरांची तयारी असायची.

मी बी.ए. फायनलला असताना विद्यार्थी संसदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी उभा होतो. महेंद्र ढोले, सुभाष सूर्यवंशी, रमेश शेगोकार, वसंत धवसे या मित्रांसोबत प्रचार जोरात सुरु होता. अचानक काही प्राध्यापकांनी आजपर्यंत मिलिंदचा अध्यक्ष बौद्धाशिवाय कुणी झाला नाही. मग या चांभाराला आता कसे होऊ द्यायचे असे वर्गातून सांगून वातावरण कलुषित करायला सुरुवात केली. हे मला कळताच मी स्तब्ध झालो. काही मित्रांसोबत सरांकडे गेलो आणि जे घडले होते ते सांगितले. तेव्हा सर म्हणाले, ''तू आता सरळ रुमवर जा आणि निवडणूक होईपर्यंत फिरकूही नको.'' यथावकाश निवडणुकीचा निकाल लागला आणि मी प्रचंड मतांनी निवडून आलो. अध्यक्ष झालो. त्यानंतर काही दिवसांनी मला कळले की, जातीय पद्धतीने विचार करणे हा बाबासाहेबांच्या विचारांचा, चळवळीचा अपमान आहे, असे डोळस सर आणि झिल्ठे सर यांनी वर्गा-वर्गांमधून सांगितले होते.

'मिलिंद'मध्ये या काळात मराठवाडा, विदर्भ, नाशिक असे गट ढोबळमनाने तयार झालेले होते. ही तटबंदी दुर्दैवाने प्राध्यापकांमध्येही झिरपली होती. परंतु रायमाने, डोळस, झिल्ठे हे त्रिकूट असल्या विचारांना कधीच थारा द्यायचे नाही. उलट नेहमी जाणीवपूर्वक अशा बिनडोकपणा विरुद्ध जाहिरपणे भूमिका घ्यायचे. आम्ही ४०-५० विद्यार्थ्यांचा एक ग्रुप तयार केला होता. त्या ग्रुपमध्ये त्यावेळच्या विविध प्रश्नांवर गंभीरपणे चर्चा केली जायची. विविध वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा, काव्य वाचन अशा विविध कार्यक्रम

त या ग्रुपमधील विद्यार्थ्यांचे वर्चस्व असायचे. यात हेतुत: नाही परंतु नकळत विविध जातींचे, प्रांतांचे विद्यार्थी होते. यामुळे अनेकांना आमच्यातले कोण, कुठले, हे अनेकदा कळायचे नाही. काही प्राध्यापक तर मला नाशिकचा समजायचे. बी. ए. झाल्यानंतर म हाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याची सत्यप्रत प्रमाणित करुन घेण्यासाठी एका गुरुवर्यांकडे गेलो होतो. तेव्हा त्यांनी त्यावरील पत्ता बघून ''अरे, तुम्ही बुलढाण्याचे म्हणजे विदर्भाचे आहात, इतके दिवस का नाही सांगितले? असा प्रश्न विचारला होता.'' त्यामागील मानसिकता आजही त्रास देते.




''आपल्याला समर्थपणे उभे रहायचे असेल तर आपल्या मनातून जात काढा. न्यूनगंड काढा. प्रचंड वाचा. काय उध्वस्त करायचं हे बाबासाहेबांनी 'nnihilation of Caste' मध्ये खूप सविस्तरपणे सांगितलंय. काय उभारायचे 'Buddha and His Dhamma' मध्ये आहे.'' मग यात मध्येच बाबासाहेबांची इतर पुस्तकं कुठल्या क्रमाने वाचायची, हेही सर सांगायचे. अख्खे भालचंद्र नेमाडे वाचा. ब्लॅक लिटरेचर वाचत असताना रिचर्ड राईट सोबत राल्फ एलिसन वाचणे कसे आवश्यक आहे? जेम्स बाल्डवीन का वाचायला हवा? वाचन बहुअंगी, बहुआयामी कसे राहील. त्यात एकारलेपणा येणार नाही. एकूण जगण्यातही विविध क्षेत्रातील लोकांशी आपला संवाद व्हायला हवा. यासाठी ते आग्रही असायचे. बाबुराव बागुल, रावसाहेब कसबे वाचत असताना हे सर्व वाचणेही आवश्यक आहे. साच्यात अडकू नका, एकेरी होऊ नका. भोवतालच्या प्रश्नांना भिडण्यासाठी स्वतःला कायम अद्ययावत ठेवा. यासाठी ते विद्यार्थ्यांना नेहमीच प्रोत्साहित करायचे.


औरंगाबादमध्ये प्रत्येक जातीचे महाविद्यालय आहे. त्यामुळे तेव्हा महाविद्यालयीन स्तरावर जातीय भावनांची तीव्रता असणे स्वाभाविक होते. मात्र आपल्या मुलांनी त्यापलीकडे जाऊन माणूस म्हणून अधिक व्यापक व्हावे यासाठी डोळस सरांनी विशेष प्रयत्न केले, याचे महत्व आज पटते. कारण त्या काळात दलित समाजास समाजवादी / साम्यवादी विचारांच्या कुणाशीही संबंध ठेवणे म्हणजे महापातक मानले जायचे. त्यावेळी 'दयुआ' आणि अप्रत्यक्षपणे सर अनेक लढ्यांच्या निमित्ताने डॉ. बाबा आढाव यांच्याशी नियमितपणे संपर्कात होते. शिवाय आणीबाणीनंतर झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी डॉ. बापूसाहेब काळदातेंचा झोपडपट्ट्यांमधून केलेला प्रचार महत्त्वाचा होता. बापूंसाठी असं कुणी फिरायचं हे त्यांना माहीत नसावे, असे वाटते. याशिवाय औरंगाबादेत तेव्हा विविध महाविद्यालयातील वादविवाद स्पर्धेतून भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांची 'यंग डिबेटर्स असोसिएशन' स्थापन झाली होती. मीही त्यात सहभागी होतो कारण त्यामुळेच त्या काळात विविध जाती धर्मातील मुलांशी ओळख झाली. मैत्री झाली. सरांनी यात सहभागी होण्यासाठी दिलेले प्रोत्साहन किती महत्त्वाचे होते, हे आता कळते.

सरांच्या व्यापक आणि संवादक भूमिकेच्या अनुषंगाने आज सर्वत्र आवर्जून बोलले जाते. या अनुषंगाने पन्नालाल सुराणा यांनी अच्युतराव पटवर्धन यांच्या निधनानिमित्ताने लिहिलेला मराठवाडा दैनिकाच्या अग्रलेखातील उल्लेख अत्यंत महत्त्वाचा आहे. अच्युतराव पटवर्धन यांना अविनाश डोळस सरांच्या सोबत बौद्ध धर्माच्या अनुषंगाने काम करायचे होते. तशी तयारीही झाली होती. परंतु दुर्दैवाने अच्युतराव पटवर्धनांच्या अकाली निधनामुळे ते होऊ शकले नाही.

दलित साहित्य, दलित चळवळीचा इतिहास निःपक्षपातीपणे आणि व्यवस्थितपणे मांडला जावा, यासाठी डोळस सर आग्रही असायचे. 'मिलिंद' ही दलित साहित्य व सामाजिक चळवळीची क्रांतीभूमी. येथे अनेक बाबी आकाराला आल्या आणि त्या समाजात सर्वत्र गेल्या. 'मिलिंद'चा हा इतिहास लोकांसमोर जायचा असेल, तर प्राचार्य ल. बा. रायमाने यांनी तो लिहायला हवा, असा सरांचा आग्रह होता. कारण प्रा. रायमाने सर १९६३ ते १९९५ अशा घडत्या वर्षांचे ते केवळ साक्षीदार नव्हते, तर ते स्वतः त्या एकूण प्रक्रियेत सक्रिय सहभागी होते. डोळस सरांच्या पुढाकाराने रायमाने सरांच्या पंच्याहत्तरी निमित्त आम्ही 'आधारस्तंभ' हा रायमाने सरांचा गौरवग्रंथ संपादित केला. हा गौरवग्रंथ सर्वंकष व्हावा, यासाठी सरांनी घेतलेले श्रम खूप मोलाचे आहे.

आज माझ्यासारखे डोळस सरांचे अनेक विद्यार्थी आहेत, जे सरांमुळे खरे डोळस झाले आणि जीवनात थोडेफार यशस्वी झाले. हे विद्यार्थी आजही केवळ स्वतःच्या कुटुंबापुरते मर्यादित नाहीत. त्यांना समाजाविषयीच्या आपल्या जबाबदारीची जाणीव आहे. यातून ते आपल्या कुवतीनुसार, कुठल्याही चर्चेशिवाय जमेल तशी मदत करीत असतात. हे भान सरांनी आमच्यात निर्माण केलेले आहे. असे सजग भान निर्माण करणाऱ्या सरांच्या स्मृतींना वंदन!

**– राम दुतोंडे**
ramdotonde@gmail.com



विल्यम शेक्सपिअर च्या
कुमारांसाठी २२ बहु विख्यात कथा..
अनुवाद : मंजूषा आमडेकर
अ मिडसमर नाइट्स ड्रीम
ऑल इज वेल दॅट एन्ड्स वेल
अँटोनी आणि क्लिओपात्रा । अॅज यू लाइक इट
सिंबलिन, किंग ऑफ ब्रिटन
हॅम्लेट, प्रिन्स ऑफ डेन्मार्क
हेन्री फाइव्ह । ज्यूलियस सीझर
किंग लिअर । मच अॅडो अबाउट नथिंग
ऑथेल्लो, द मूर ऑफ व्हेनिस
रिचर्ड ३रा । रोमियो अँड ज्युलिएट
द कॉमेडी ऑफ एरर्स । द मर्चंट ऑफ व्हेनिस
द टेमिंग ऑफ द श्रू । द टेम्पेस्ट
द ट्रॅजेडी ऑफ मॅकबेथ
द टू जंटलमेन ऑफ व्हेरोना । द विंटर्स टेल
टिमॉन ऑफ अथेन्स । ट्वेल्थ नाइट
२२ पुस्तकांच्या संचाची किंमत ₹१५००
Book Available
मेहता पब्लिशिंग हाऊस
Email: sales@mehtapublishinghouse.com
www.mehtapublishinghouse.com
Follow us on
http://www.facebook.com/mehta.publishinghouse
Mehta Books
950+ Marathi books Available as e-Book
WhatsApp us on 9420594665
Available on :
Printed book - Flipkart and amazon
E-book - play.google.com/store/books
www.amazon.in/b?node=15513892031

# 'दशक्रिया ते दशक्रिया'

संजय कृष्णाजी पाटील

**साहित्याचा, चित्रपटाचा आणि माणसांचा संवेदनशीलपणे विचार करणारा माणूस कायम चौकटीपलीकडची अभिव्यक्ती करतो. अशी सशक्त अभिव्यक्ती करणाऱ्या पटकथा-लेखकाने रेखाटलेला हा अनुभवांचा आगळावेगळा प्रवास...**

**३०** सप्टेंबर २०१३ या तारखेला सोमवार होता. दुपारी दोनच्या सुमारास मला अमित सावंत (संगीतकार अमितराज) यांचा अत्यंत घाबऱ्याघुबऱ्या आवाजामधला फोन आला की, ''दादा जरा शांतपणे ऐका. एक अत्यंत वाईट आणि धक्कादायक बातमी घडलीय इकडे. आपले दिग्दर्शक राजीव पाटील सकाळपासून फोनही उचलत नव्हते आणि दरवाजाही उघडत नव्हते म्हणून मग राजूचा भाऊ प्रशांत आणि इतरांनी दरवाजा तोडला तर राजीव आत निपचितपणे पडून होता. लगबगीने त्याला जवळच्या एका दवाखान्यात नेलं तर डॉक्टर म्हणाले की पहाटेच कधीतरी त्यांनी हे जग सोडलंय. बहुधा हार्ट अ‍ॅटॅक असावा. त्यांचं शरीर लाकडासारखं ताठ झालंय. आम्ही ही डेड बॉडी घेऊन आता बोरिवलीच्या भगवती रुग्णालयात चाललोय. पोस्टमार्टम करावं लागेल. नाशिकच्या आई आणि सुवर्णाला (राजीवची पत्नी) यांना कळवावं लागेल. प्रशांत तर पिसाटल्यासारखा करायला लागलाय. दादाऽऽ तुम्ही प्लीज लवकरात लवकर या.'' असे म्हणून अमित फोनवर ढसाढसा रडायला लागला. त्याचा आवाज ऐकता-ऐकता मी बधिर झालो आणि भोवंडल्यासारखा खुर्चीत कोसळलो. मला जरासे वास्तवाचे भान आले तेव्हा माझे सहकारी भालचंद्र विनायक कुलकर्णी आणि शिपाई बंदरकर माझ्या तोंडावर पाणी मारून मला पाणी पाजण्याचा प्रयत्न करत होते. अर्धांगवायू झाल्यासारखा मी गाडीत बसलो आणि मग संगीतकार अजय-अतुल, मुक्ता बर्वे, उपेंद्र लिमयेच्या पत्नी, (उपेंद्र तेव्हा एका आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी महेश मांजरेकरांसोबत मकाऊ येथे गेला होता.) राम कोंडीलकर, संदीप पाटील, चंद्रशेखर सांडवे, विजय नारायण गावंडे, संतोष भिंगार्डे, सौमित्र मोटे यांचे मला अव्याहतपणे फोन येऊ लागले. मग मी बोरिवलीला पोहोचलो की नाही? पोस्टमार्टेम कधी होणार? तुला काही मदत हवी आहे काय? तू शांतपणे सगळं सांभाळ असे सांगणारे महेश मांजरेकरांचे मकाऊवरून दर पंधरा मिनिटाला मला फोन येऊ लागले.

सोमवारी दुपारी बोरिवलीच्या भगवती हॉस्पिटलपासून ते मंगळवारी सकाळी अकरा वाजता राजूच्या पार्थिवावरती अंत्यसंस्कार होईपर्यंतचा कालखंड म्हणजे असंख्य आक्रोश, हंबरडे आणि वेदनेच्या आगडोंबाचे हलवून टाकणारे दर्शन होते. त्या भयाण मानसिक स्थितीचे वर्णन करण्याचे धाडस मला पाच वर्ष उलटल्यानंतर अजूनही धाडस होत नाही. त्याबद्दल पुन्हा कधीतरी लिहीनच.

बुधवार ९ ऑक्टोबर २०१३ रोजी नाशिकच्या रामकुंड घाटावर राजूचा दशक्रिया विधी होता. मी कार्यालयात रजा टाकून संगीतकार विजय नारायण गावंडे सोबत नदी घाटावर वेळेत हजर झालो. सगळा घाट आक्रोश करणाऱ्या आणि हंबरडा फोडणाऱ्या असंख्य प्रकारच्या लोकांनी भरलेला होता. शेकडो मृतांचे दशक्रिया विधी तिथे साजरे होत होते. राजूचा एक मोठा रंगीत फोटो लावून त्याच्यासमोर पिठाचे गोळे, हळद, कुंकू, अगरबत्त्या असा आवश्यक साहित्याचा जामानिमा ठेवून त्याचा दशक्रिया विधी सुरू झाला. मी चष्मा काढून रूमालाने डोळे पुसले. राजूच्या फोटोमध्ये त्याच्या डोळ्यांवर गॉगल होता. त्या गॉगलच्या आत नजर घुसवून मी राजूच्या डोळ्यांच्या आत शिरण्याचा प्रयत्न केला. थोडासा बाजूला गेलो. जिवाला बरे वाटत नव्हते. मग गाडीत जाऊन बसलो. वही पेन काढले आणि सुचेल तसे भराभर लिहू लागलो.

जगण्याचे देवा लाभो ऐसे बळ  
दुर्गुणाचा वळ पाहवेना  
सद्गुणाची देवा वाढो ऐसी कळ  
मरणाची झळ साहवेना

तुझ्या दारी दावी पांडुरंगा तळ  
उन्मादाचा मळ झाकवेना  
विठ्ठलाची आस वाढावी सरळ  
विषाचे गरळ टाकवेना  
जगण्याचे देवा लाभो ऐसे बळ  
दुर्गुणाचा वळ पाहवेना

व्यर्थ जिणे झाले मरण अटळ
मोहाची ही नाळ तोडवेना
ओथंबून साचे वासनेचा गाळ
माया ही पातळ सोडवेना
जगण्याचे देवा लाभो ऐसे बळ
दुर्गुणाचा वळ पाहवेना

ऐसा गा मी ब्रह्म जाणितो सकळ
आळवी विठ्ठल आठवेना
कराया सुफळ खेळतो हा खेळ
हरवला मेळ सापडेना
जगण्याचे देवा लाभो ऐसे बळ
दुर्गुणाचा वळ पाहवेना

ऐसा लाभो मान दे गा देवा दान
चरणात ध्यान राहू दे गाऽऽ
अमृताची वेल अमृताचा कुंभ
भक्तीचा मृदुंग वाजू दे गा

विठु तुझ्या दारी भेटला श्रीरंग
मन झाले दंग माऊलीचे
घडो तुझी प्रीत वाढो तुझा संग
जीवनाचा रंग पाहू दे गा

जगण्याचे देवा लाभो ऐसे बळ
दुर्गुणाचा वळ पाहवेना
सद्‌गुणाची देवा वाढो ऐसी कळ
मरणाची झळ साहवेना

मला त्या क्षणी माहीत नव्हते की पुढे-मागे मी हा अभंग माझ्या आगामी 'दशक्रिया' चित्रपटासाठी घेईन, संगीतकार अमितराज त्याला एक सुमधुर चाल लावेल, स्वप्निल बांदोडकर त्यावर आवाजाची जादू चढवेल आणि हा चित्रपट राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या नावाची राजमुद्रा कोरेल.

'जोगवा', 'पांगिरा' आणि '७२ मैल : एक प्रवास' असे तीन चित्रपट मी राजूसोबत केलेले होते. पुढचा चित्रपट करायचा का? कोणता करायचा आणि करायचा झाल्यास तो त्याच्याबरोबर करायचा की नाही? याबाबत काहीच ठरलेले नव्हते. मध्यंतरीच्या काळात एप्रिल २०१३ मध्ये मी माझ्या वरळी येथील शासकीय निवासस्थानी माझा जुना मित्र राम कोंडीलकर हा त्याच्यासोबत मला पूर्णपणे अनोळखी असलेल्या त्याच्या एका मित्राला घेऊन आला. 'वेनिला कबड्डी कोझकु' नावाच्या एका तामिळ फिल्मची सी.डी. माझ्या हातात ठेवून राम म्हणाला की, ''सर, याचा आपल्याला मराठीत रिमेक करायचाय. तुम्ही लिहा, निर्माता तयार आहे.'' ''आणि दिग्दर्शन?'' मी विचारले. ''हा संदीप भालचंद्र पाटील. नवीन आहे पण हा तो चित्रपट दिग्दर्शित करेल. रामच्या स्वरामधला आत्मविश्वास सुखावणारा होता. मी कालांतराने तो सिनेमा पाहिला. यातला नव्वद टक्क्यापेक्षा अधिक भाग काढून टाकावा लागेल आणि त्याला पूर्णपणे इथल्या कोकणच्या मातीत घोळवावा लागेल.'' असे माझे मत असल्याचे मी रामला स्पष्टपणे सांगितले, पण काही दिवसातच एक बातमी कळली की मूळ निर्मात्यांमध्ये बऱ्यापैकी फूट पडलेली असल्याने आणि एकाच वेळी प्रत्येकाने विविध ठिकाणी त्याचे हक्क विकल्याने आता न्यायालयीन तिढा निर्माण झालेला असून हे प्रकरण आता पुढचे एक दशक तरी न्यायालयाच्या उंबरठ्याआडून बाहेर येऊ शकत नाही. धीर सोडणे हे राम कोंडीलकरच्या स्वभावातच बसत नसल्याने पुन्हा पंधरा दिवसांनी राम रात्री दहा वाजता माझ्या घरी हजर झाला. ''सर, ही बाबा भांड यांची 'दशक्रिया' कादंबरी आणि हा या कादंबरीवरच्या चित्रपटाचा दिग्दर्शक, 'संदीप भालचंद्र पाटील'! कालच आम्ही दोघे औरंगाबादहून याचे हक्क घेऊन आलोय.'' ''अरे व्वा. पण लिहितोय कोण तुमचा सिनेमा?'' मी गंमतीने विचारले.

''संजय कृष्णाजी पाटील लिहिणार. तुम्ही काही काळजी करू नका.'' असं ठामपणे सांगून राम निघून गेला. काही दिवसांनी मी तुंगार्ली, लोणावळा येथील माझे गुरुमित्र विलास कोठारी यांच्या सुसज्ज बंगल्यावर जाऊन 'दशक्रिया' कादंबरीसह आठवडाभर



तळ ठोकला. काही महत्त्वाचे लिहायचे, वाचायचे झाले की मी विलासदादांच्या बंगल्यावर जाऊन तळ ठोकतो आणि स्वत:ला पूर्णपणे कोंडून घेतो. हा माझा गेल्या एक तपाचा शिरस्ता आहे.

दशक्रिया कादंबरी मी १९९५ मध्येच वाचली होती. त्याच्या दोन प्रती माझ्या स्वतःच्या लायब्ररीत संग्रही आहेत. पण तेव्हा ती कादंबरी मी 'एक कादंबरी वाङ्मयप्रकार' या नात्याने किंवा सगळीकडे गाजू लागलेली कादंबरी म्हणून वाचलेली होती. आता पुन्हा नव्याने ती लोणावळा मुक्कामी 'चित्रपट माध्यमांतर' या नात्याने अनेकदा वाचली. शेवटच्या दिवशी मी रामला फोन केला की, 'बाबा ही कादंबरी अत्यंत भन्नाट आणि कलात्मक असली तरी तिच्यावरती चित्रपट बनविण्यात मुख्यतः दोन अडथळे आहेत. एक म्हणजे या कादंबरीचा गाभा तसाच ठेवून फार मोठ्या प्रमाणावर मोडतोड करावी लागेल, ज्याला बाबा भांड यांच्यासारखे ज्येष्ठ साहित्यिक कदापिही मान्यता देणार नाहीत. दुसरी गोष्ट म्हणजे हे सगळं जुगाड जरी सुदैवाने जुळलंच तरी यातल्या बहुतेक गोष्टी पैठणच्या नाथ घाटावरती घडत असल्याने चित्रीकरण पैठणला जाऊन करणार का आणि तिथे करायचं नसेल तर इतरत्र कुठे असा घाट मिळेल का? आणि अशा प्रकारच्या चित्रिकरणाला येणारा अवाढव्य खर्च झेलायला कुणी निर्माता असल्या चाकोरीबाह्य चित्रपटासाठी तयार तरी होईल का?

यावर राम कोंडीलकर आणि संदीप पाटील यांचं एकंदरीत असं एकमत झालं की हे संजय पाटील नावाचे गृहस्थ अती चिकित्सक असून त्यांना भविष्यकालीन शंका अगोदरच गिरवून ठेवण्याची सवय आहे. मीही त्यांच्या शंकेशी सहमती दर्शविली. मात्र शंकानिरसन करणं कसं गरजेचं आहे हेही पटवून दिलं. दोघेही पुन्हा कामाला लागले. बाबा भांड यांच्याशी दूरध्वनीद्वारे बोलू लागले. आणि एक दिवस आमचा सगळ्यांचा लवाजमा औरंगाबाद मुक्कामी पोहोचला. आता या बिऱ्हाडामध्ये 'चंद्रशेखर मोरे' नावाचा आमचा हिंदी मराठी जाहिराती आणि हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये कला दिग्दर्शक म्हणून स्थिर स्थावर झालेला अजून एक नवा मित्र सामील झाला होता. आम्ही औरंगाबाद आणि पैठण येथे अनेक मुक्काम केले. घाट आणि नदीकाठ फिरलो. लोकांना भेटलो. मंदिरं आणि जुने वाडे पालथे घातले. नाथ घाटावर क्रियाकर्म करणाऱ्या असंख्य पुरोहितांना भेटलो. नदीपात्रात नाणी, चांदीच्या वस्तू, सोन्याचे अंश चिखल गाळात शोधत फिरणाऱ्या असंख्य लेकरा-बाळांना, माय-माऊलींना भेटलो. हे असलं शोधणाऱ्या लोकांच्या हातात एकतर चाळण असे किंवा मग दोरीला बांधलेलं लोहचुंबक असे आणि डोळ्यात-पोटात असं जगणं साजरं करण्याची भूक.

ही पायपीट करताना मी एकीकडे हे सगळं न्याहाळत होतो. मनामेंदूमध्ये साठवत होतो, तर त्याचवेळी बाबा भांड यांच्याशी थोडं-थोडं बोलून त्यांच्या मनात डोकावण्याचा प्रयत्न करत होतो. मी पहिली फट किलकिली करण्यासाठी बाबांना म्हणालो की, 'दशक्रिया विधीच्या वेळी चाळण घेऊन राखेखाली धरणारी आणि त्या चाळणीतले जमा झालेले पैसे चड्डीच्या खिशात ठेवणारी असंख्य मुलं समोर दिसताहेत. तुमच्या कादंबरीतही असंख्य पोरं असा उल्लेख आहे. मात्र 'भान्या' उर्फ 'भानुदास विठ्ठल घोडके' व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही पोराला नाव नाही, चेहरा नाही आणि म्हणून विशिष्ट अशी तत्सम व्यक्तिरेखा नाही. ते म्हणाले, 'बरोबर आहे तुमचं. कादंबरी वाङ्मयप्रकार म्हणून मला मुलांचा जमाव अभिप्रेत होता. त्यामुळे भान्याव्यतिरिक्त कोणालाही नाव आणि विशिष्ट व्यक्तिरेखा असण्याची मला आवश्यकता नव्हती. मात्र तुमचं म्हणणं काय आहे हे मला ऐकायला आवडेल.'' मी म्हणालो, ''चित्रपटाच्या दृष्टीने मला भान्याला एक जिवलग मित्र असलेला आवडेल. जो त्याच्या इतकाच खट्याळ आणि खोडकर असेल. दोघांच्या अतरंगी वागण्यातून काही विनोदाच्या जागा, भावनोत्कट प्रसंग आणि नाट्यमयता वाढवणे हे करता येईल का, याचा विचार करतोय आणि मला भान्याचा समवयस्क असा 'किरकिऱ्या' नावाचा त्याच्या जिवाभावाचा मित्र व्यक्तिरेखा म्हणून दिसतोय. काय म्हणणं आहे तुमचं?'' यावर बाबा भांड मला, ''बेलाशकपणे तुम्ही पुढे जा. माझी सहमती आहे.'' असं म्हणाले. मी पहिली लढाई जिंकली होती. पुढे चित्रपट लिहिताना मी मूळ कादंबरीतील भान्या शिकलगाराकडे (ही भूमिका अभिजीत झुंजाररावने केली आहे) चाळणीची ऑर्डर द्यायला जातो हा प्रसंग जसाच्या तसा घेतला पण त्याच्यासोबत मी किरकिऱ्यालाही पाठवला. त्या ठिकाणचे संवाद मी असे लिहिले.

शिकलगार : नाम क्या बोले तुम?

भान्या : मै भान्या. और ये किरकिऱ्या.

शिकलगार : किरकिऱ्या? ऐसा क्यू?

भान्या : ह्यो लहान असतानाच त्याची आई मेली. आईच्या दुधासाठी ह्यो लै किरकिर करायचा. तवापास्न इसको किरकिऱ्याच बोलते है।

शिकलगार : सच?

(भान्या आणि किरकिऱ्या एकमेकाला हसून टाळी देतात. 'एकदम सच' असं म्हणतात)

भान्या पत्रे सावकार (दिलीप प्रभावळकर) आणि सावकारीण (उमाताई सरदेशमुख) यांच्या वाड्यावर जातो. गेल्या आठवड्याचे चाळणीच्या भाड्याचे पैसे द्यायचे असतात. तिथेही भान्यासोबत किरकिऱ्या असतो असे मी दाखवले.

भान्या : अहो सावकार. ह्याच्या बापूला ॲडमिट केला हुता ना...

सावकार : काय झालं रे याच्या बापूला

भान्या : अहो दारू जास्त झाली याच्या बापूला. सलाईन-मधनंसुद्धा दारूच लावा असं डॉक्टरास्नी सांगत होता याचा बापू.

(भान्या आणि किरकिऱ्या एकमेकाला टाळी देतात.)

सावकार : (मिश्किलपणे) हसताहेत लेकाचे दात काढून. चला. पळा. पळा.

पुढे 'पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल'ला या सिनेमाचा

कोथरूडच्या 'आयनॉक्स'मध्ये पहिलाच जाहीर खेळ झाला तेव्हा अख्ख्या थिएटरने या संवादानंतर टाळ्यांचा कडकडाट तर केलाच पण अंधारात माझ्या हातावर टाळी देऊन बाबा भांड यांनी माझ्या लेखनाचा खुलेपणाने सत्कार केला.

नवी मुंबईचे प्रख्यात बांधकाम व्यावसायिक आणि माझे गुरूमित्र श्री. विलास कोठारी यांचा मागे संदर्भ आलेलाच आहे. 'नीलग्रुप' नावाची त्यांची सुप्रसिद्ध कंपनी आहे. त्यांच्या पत्नी कल्पना विलास कोठारी या मूळच्या रंगकर्मी. 'रंगनील क्रिएशन्स' ही त्यांची नाट्यसंस्था. अनेक बालनाट्य आणि व्यावसायिक रंगभूमीवर गाजलेल्या नाटकांची त्यांनी निर्मिती केलेली आहे. त्यांनी निर्मिती केलेलं अत्यंत गाजलेलं नाटक म्हणजे 'प्रपोजल'. प्रत्यक्ष रंगमंचावर धावत्या लोकलचा थक्क करणारा अनुभव देणारं त्याचं नेपथ्य आणि प्रकाशयोजना केली होती प्रदीप मुळे मामा यांनी. डॉ. अमोल कोल्हे आणि आदिती सारंगधर या कसलेल्या अभिनेत्यांच्या अभिनयाच्या आविष्कारासह सजलेल्या या नाटकाने त्या वर्षीचे तब्बल ५२ पुरस्कार तर मिळवलेच. वरती सर्वाधिक यशस्वी व्यावसायिक नाटक म्हणूनही नावलौकिक मिळवला होता. साहित्य, नाट्य, चित्रपट, संगीत आणि समाजसेवा यात रमणारं हे एक कलासक्त जोडपं म्हणून त्यांना ओळखलं जातं. त्यांच्याकडे रोज कोणी ना कोणीतरी नवी संहिता घेऊन येत असत आणि विलासदादा मला वाचायला देत असत. मी त्या वाचून माझी मतं मांडत असे. एक दिवस त्यांनी मला मी वारंवार लोणावळ्याला त्यांच्या बंगल्यावर जाऊन हल्ली नवीन काय लिहितोय हे विचारलं, मी त्यांना 'दशक्रिया'चा विषय ऐकवला. विषय त्यांना आवडला. ते म्हणाले, आम्ही याची निर्मिती करतो. त्यावर मी लागलीच त्याच्या कलाकारांची संभाव्य फौज, तंत्रज्ञांची कुशलता आणि त्यांचे मानधन आणि बाह्यचित्रिकरणाचा अवाढव्यपणा याबाबत सांगितले. त्याबरोबरच मी यात रूढी परंपरांमधल्या फोलपणावर भाष्य केले आहे आणि मंगलविधी करणारे विरुद्ध किरवंत कार्य करणारे अशा पुरोहितांमधल्या संघर्षाची याला किनार असल्याचेही स्पष्ट केले. तरीही ते दोघे ठाम राहिले. 'जर कथा एका लहान मुलाची आहे आणि हेतूपुरस्सर कोणालाही न दुखावता तुला जर हे मांडायचे असेल तर आमची याला हरकत नाही', असेही त्यांनी सांगितले. मुळात हा चित्रपट लिहिताना मी 'दशक्रिया' या कादंबरीसोबतच माझे आवडते नाटककार सतीश आळेकर आणि प्रेमानंद गज्वी यांची गाजलेली नाटकं अनुक्रमे 'महानिर्वाण' आणि 'किरवंत' ही रोज उशाशी घेऊन झोपायचो. ही दोन्ही नाटकं मला आजही मुखोद्‌गत आहेत. मृत्यूसारख्या गंभीर घटनेच्या वेळी माणसं किती हास्यास्पद आणि ओंगळवाणी वागतात हे मानवी नातेसंबंधाच्या पार्श्वभूमीवर आळेकरांनी महानिर्वाणमध्ये ब्लॅक कॉमेडीच्या आधारे अप्रतिमपणे मांडलंय आणि 'किरवंत'मध्ये गज्वींनी क्रियाकर्म करणारे वासुदेवशास्त्री आणि त्यांचा बंडखोर भाऊ यांच्यातील संघर्षाबरोबरच एकूणच प्रखर वास्तव आणि तत्कालीन समाजरचनेचे धागेदोरे अत्यंत धगधगीतपणे मांडलेले होते. ही दोन नाटके चिरतरुण आहेत आणि त्यातली आशयस्फोटकता ही कालातीत आहे अशी माझी ठाम धारणा आहे. या बाबतचे आणखी दोन महत्त्वाचे पैलू मला यापुढे विषद करावयाचे आहेत.

पनवेलची 'सूर्याची पिल्ले' ही चंद्रशेखर सोमण यांची त्या काळातली राज्य नाट्य स्पर्धेमध्ये दबदबा असलेली एक बलाढ्य अशी हौशी नाट्य संस्था होती. विजय मोंडकरांचे 'कापूस कोंड्याची गोष्ट' हे नाटक असो की रमेश पवार यांची 'उकिरडा' नावाची एकांकिका असो. चंद्रशेखर सोमण हा अत्यंत प्रभावीपणे आणि प्रतिभावंतपणे त्यांचे सादरीकरण धडाक्यात करत असे. मी, मनोहर लिमये, रत्नू कुलकर्णी, रत्नू खरे, अतुल दिघे, विवेक ताम्हणकर आणि प्रकाश (काका) देशमुख अशा आम्हा टवाळ मित्रमंडळीचीही 'साहित्य परिषद पनवेल' नावाची एक मासिक वर्गणीवर चालणारी जिगरबाज अशी नाट्यसंस्था होती. आमचा कल हा प्रामुख्याने महाराष्ट्रभर एकांकिका स्पर्धा गाजवण्यावर आणि वाजवण्यावर असे. आणि या दोन संस्थांमध्ये मैत्रीपूर्ण, निरोगी स्पर्धा असली तरी चंद्रशेखरच्या नाटकांना एक रंगकर्मी म्हणून मी मदतीला जात असे. 'महानिर्वाण आणि किरवंत' ही दोन्ही नाटके 'सूर्याची पिल्ले'ने राज्य नाट्य स्पर्धेमध्ये धडाक्यात सादर करून खणखणीत यश मिळवले होते. माझाही त्यात खारीचा वाटा होता कारण या दोन्ही नाटकांची प्रकाशयोजना मी रत्नू खरेबरोबर आणि पार्श्वसंगीत नंदू भिडेबरोबर संयुक्तिकपणे केलेले होते. दुसरी अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'कापूस कोंड्याची गोष्ट' या नाटकामधल्या प्रमुख स्त्री व्यक्तिरेखेच्या भूमिकेसाठी कल्पना विलास कोठारी यांना सर्वोत्कृष्ट स्त्री अभिनयाचं राज्य शासनाचं प्रथम पारितोषिक प्राप्त झालं होते. या अशा प्रकारच्या सांस्कृतिक ऋणानुबंधामुळे असेल, सामाजिक जाणिवेच्या विषयाला वाहिलेल्या चित्रपटाची निर्मिती करून आपल्या संस्थेच्या चित्रपट निर्मितीचा श्रीगणेशा करावा ही आंतरिक इच्छा असेल किंवा प्रखर सामाजिक बांधिलकी असेल. कोठारी दांपत्याने 'रंगनील क्रिएशन्स'च्या माध्यमातून या कलाकृतीच्या पाठीशी ठामपणे उभे राहाण्याचा निर्णय घेतला.

'महानिर्वाण आणि किरवंत' यांचे अद्‌भुत रसायन डोक्यात ठेवून मी नव्याने ''दशक्रिया' कादंबरीला भिडलो. मूळ कादंबरीमधले महत्त्वाचे पण चित्रपटासाठी कमी महत्त्वाचे असे प्रसंग मी निवडून बाजूला ठेवले. तेच मापदंड व्यक्तिरेखांबाबतही लावले. एम.आय.डी.सी.मध्ये दारुड्या विठ्ठलचा (कलाकार मिलिंद शिंदे) पाय मशिनमध्ये अडकतो आणि तो पांगळा होतो हे काही मला पटेना. मग मी व्यसनी विठ्ठल दारु पिऊन कामावर जातो आणि त्याचा साहेब त्याला निलंबित करतो अशी योजना करून विठ्ठलच्या पत्नीच्या शांताच्या (आदिती देशपांडे) संसारामधल्या दैनंदिन अडचणी वाढवण्याचे सांस्कृतिक कारस्थान रचले. त्यामुळे भावनाट्याला उठाव येईल असा माझा अंदाज होता जो पुढे तंतोतंत खरा ठरला. जॅकवेलजवळ दारु पिणारी, पत्ते खेळणारी टवाळ

पोरांची गँग, ज्यामध्ये भान्याच्या दृष्टीने सुपर हिरो असलेला परशा (नंदकिशोर चौघुले) तसेच विठ्ठलसहित ही सगळी टवाळ गँग देशी दारुच्या गुत्त्यावर कशी व्यक्त होईल याचाही विचार सुरू झाला. मूळ कादंबरीमध्ये शांता सफाईकाम करत असते, ही बाब मला अत्यंत महत्त्वाची वाटली होती. मग पैठणला असताना मी 'पैठणी'चा कारखाना आणि तिथे लेकराबाळांना सांभाळत, संसार सांभाळत पार्ट टाईम नोकऱ्या करणाऱ्या बायकांचा जथ्था बघितला होता. मला त्या जमावात शांता आणि तिच्या सफाई कामगार मैत्रिणी दिसल्या. ज्यांच्या वापरातून मी बाईपणाच्या दुःखवाटपाची सूत्रे सांगणारे प्रसंग लिहिले. मुकादम म्हणून काम करणाऱ्या कडक शिस्तीच्या आत्याबाई (आशाताई शेलार) यांची योजना केली. प्रत्यक्षात मात्र अशा प्रकारचा पैठणीचा कारखाना चित्रिकरणासाठी उपलब्ध न झाल्याने आम्ही एक पापड लाटण्याचा कारखाना शोधून काढला आणि तशा पद्धतीने ऐन चित्रिकरणाच्या वेळी संवादांमध्ये बदल घडवून आणले. चित्रपटाच्या शेवटी संघर्ष बिंदूच्या ठिकाणी मला या सगळ्या स्त्रीशक्तीचा बेमालूमपणे वापर करायचा होता. नारायण पंत (मिलिंद फाटक) आणि केशव भटजी (मनोज जोशी) यांचा कादंबरीमधला संघर्ष मी अधिक तीव्र केला. विठ्ठलच्या व्यसनामध्ये वाढ केली. भान्याचा किरकिऱ्याचा वात्रटपणा अधिक वाढवला. त्यामुळे चिडलेली शांता भान्याला धोपटते आणि भान्या घरातून पळून गेल्यावर शांता त्याला शोधण्यासाठी आत्याबाईंना घेऊन रात्रीच्या वेळी बाहेर पडते, त्या प्रसंगी कै. राजीव पाटीलच्या दशक्रिया विधीच्या वेळी सुचलेल्या अभंगाची योजना केली. चित्रपटाच्या सुरुवातीलाच भान्याचं खट्याळपण प्रकर्षाने जाणवण्यासाठी लहान मुलांच्या मस्तीखोरपणाचं एक उडत्या चालीचं गाणं आवश्यक होतं. राम, संदीप, शेखर मोरे यांच्यापासून ते चक्क छायाचित्रकार महेशदादा अणे (स्वदेश चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित) या सगळ्यांचं म्हणणं की आयटम साँग वाटावं अशा पद्धतीने हे गाणं आलं पाहिजे. मी रोज एखादा सुचलेला मुखडा अमित सावंतला (संगीतकार अमितराज) फोनवरून ऐकवत असे. त्यावर अमितराज शांतपणे, 'दादा, कुछ अलग ट्राय करो। इसमे कुछ मजा नही।' असे सांगून माझं तोंड बंद करत असे. हे असं कित्येक आठवडे आणि महिने सुरू होतं. मी तब्बल तेवीस मुखडे त्याला ऐकवून थकलो तरी त्याचे समाधान होईना. एका मध्यरात्री त्याला भान्या-किरकिऱ्या यांच्यामधला एक संवादाचा तुकडा ऐकवत होतो. सकाळी सकाळी किरकिऱ्या भान्याला बोलवायला येतो तर शांता चिडून म्हणते की, 'तुला फोडला भाड्या चाबकानं, रामा धर्माच्या पाऱ्यात आलास काय नाथघाटावरचं गिऱ्हाईक घेऊन? तसं किरकिऱ्या म्हणतो, ''अवो काकू तसं न्हवं. त्ये शहाजी भगताचं म्हातारं गचाकलं. भानुदासला पाठवा आणि तुमीबी चला लवकर.'' यावर अमित म्हणाला, ''दादा काय शब्द बोललात तुम्ही? गचाकलं?''

मीही एकदम दचकलो आणि म्हटलं, ''अरे थांब, थांब जरा. फोन ठेव. मी तुला थोड्या वेळाने फोन करतो.'' मी पाच मिनिटांनी अमितला फोन करून ओळी ऐकवल्या-

फळ्यावरती पाढं
तरी पाठांतर थोडं
शाळा सोडून फिरतानं
वाटं फार गोड
सपनात येऊन उसासलं
गुरुजींचं म्हातारं गचाकलं
शाळेत येऊन पचाकलं

गोविंद घ्या कुणी गोपाळ घ्या
भूगोलाच्या तासाला गणिताचं भ्या
इतिहासात जाय विज्ञानाचा पाय
भूमितीला नागरिकांचं पडलंय काय?
भौतिकाची रांग कानामदी सांग
रसायनाच्या नानाची तुटलीय टांग
जीवशास्त्र माझं बघ उबागलं
गुरुजींचं म्हातारं गचाकलं
शाळेत येऊन पचाकलं

पाखरांची रांग
ढगोबाला सांग
आभाळाच्या डोईचा
मोडू नको भांग
हिरवं हिरवं रान
हरवलं भान
म्हशीवरनं बैलाची
ओढू नको टांग
ढिंच्यॅक होवून उधाळलं

फळ्यावरती पाढं
तरी पाठांतर थोडं
शाळा सोडून फिरतानं
वाटं फार गोड
सपनात येऊन उसासलं
गुरुजींचं म्हातारं गचाकलं
शाळेत येऊन पचाकलं

पुढे हे गाणं '९X झकास' या संगीत वाहिनीवर सतत सहा महिने धुमाकूळ घालीत होतं.

बाकी सगळ्या गोष्टी जमत होत्या पण पटकथा पूर्णपणे बांधीव आणि सकस झालीय असं मला स्वतःलाच वाटत नव्हतं. संदीप, मी आणि पालवे गुरुजी, आमच्या सगळ्यांच्या लोणावळ्याच्या फेऱ्या वाढतच होत्या. कधी वरळीला बसायचो. मध्यंतरानंतर खूप गडबड होत होती. सरळसोट दिशा सापडत नव्हती. काहीतरी बिनसत

होतं. नाट्यमयता कमी होत होती. त्यामुळे संघर्ष वाढत नव्हता. काय करावं ते कळत नव्हतं. परत एकदा सगळेजण मिळून पैठणला गेलो. सगळ्यांना भेटलो. गप्पांचा फड जमवला. बाबा भांड यांच्या एका वाक्यामुळे संदीप एकदम चमकला. पैठण ही शालिवाहनांच्या साम्राज्याची राजधानी. इथून रोमला सुद्धा व्यापार व्हायचा आणि आता जरा प्रमाण कमी झालं तरी पैठणमध्ये गुढीपाडवा खूप जोरात साजरा व्हायचा. संदीप मला म्हणाला, ''सर गुढीपाडव्याचं काहीतरी करा. एकाही मराठी चित्रपटात आजपर्यंत गुढीपाडव्याचं गाणं आलेलं नाही. विचारमग्न झालो. गुढीपाडव्याच्या गाण्यामुळं नाट्यमयता आणि संघर्ष वाढणार नव्हता, पण 'गुढीपाडवा' हा शब्द मेंदूतून हलायला तयार नव्हता. कादंबरीमध्ये असा उल्लेख आहे की केशवच्या वर्चस्वामुळे नारायण भटजी आणि हणमंता यांची उपासमार होतेय आणि त्यांना कामं मिळत नाहीत. एकजण दुसऱ्याला म्हणतो की, 'पंच कमिटीचं काय करायचं?' मग माझ्या हातून पंच कमिटीचा एक अफलातून प्रसंग लिहून झाला. पंच कमिटीसमोर नारायण त्याचं दुःख मांडतो आणि आरोप प्रत्यारोपाच्या पार्श्वभूमीवर भान्याचे सभापटुत्व, गदारोळ, शांताच्या भावनांचा उद्रेक अशा गोष्टी जुळत गेल्या. नाट्यही फुललं आणि मग संघर्षही वाढला. मग मी हात धुवून गुढीपाडव्याच्या मागे लागलो. काही पात्रांच्या तोंडून वेगवेगळ्या प्रसंगी गुढीपाडवा तोंडावर आलाय याची पेरणी करून वातावरणनिर्मिती केली. प्रत्यक्ष गुढीपाडव्याच्या मंगल दिनी सन्मानाने गंध अक्षता वाहण्याच्या प्रसंगी पत्रे सावकार केशव भटजींचा सगळ्या गावासमोर जाहीर अपमान करतात अशी रचना झाली आणि सिनेमामधला संघर्ष एकदम वेगळ्या वळणावरती आणि नाट्यात्म विधानावरती येऊन पोहोचला. सिनेमाचा शेवट काय असावा हे अजून ठरत नव्हतं. त्यामुळे तिकडे जाणारा प्रवास दाखवणारा रस्ता दिसणं तर त्याहूनही अस्पष्ट होतं. पंच कमिटी आणि गुढीपाडवा इथपर्यंत सिनेमा एक खणखणीत वक्तव्य घेऊन पुढे चालत आला होता, पण आता यापुढची पानं कोरी होती.

पुढची पानं पलटलीच जात नव्हती. या अस्वस्थतेमध्ये काही महिने गेले. सगळंच काम ठप्प झालं. काही सुचेनासं झालं. एका रविवारी सकाळी संदीप आणि मी संदीपची गाडी काढून पनवेलहून निघालो. कुठे जायचं ते माहीत नव्हतं. काय करायचे ते ठरलं नव्हतं. गाडी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर आली. सुसाट पळू लागली. लोणावळ्याला एके ठिकाणी एका पुलावरून रस्ता खाली उतरतो. सरळ पुलावरून रस्ता पुण्याला जातो आणि पुलावरून खाली उतरलेला रस्ता थेट लोणावळ्याला स्टँडवरती जातो. स्टँडसमोरच्या टपरीवरती कटिंग चहा प्यावा म्हणून आम्ही थांबलो. मी म्हटलं, ''अरे संदीप, चहा इथे पिण्यापेक्षा विलासदादांच्या तुंगार्लीच्या बंगल्यावर नवनाथकडे (तिथला केअर टेकर) चहा पिऊ. मग आम्ही परत पुढे तुंगार्लीला आलो. चहा घेतला. नवनाथच्या सुचनेनुसार पुढचा मोठा चढ चढून डोंगरावरती जायचं आणि वर असलेल्या वळवंड धरणाच्या कडेला बसायचं असं ठरलं. आम्ही जलाशयाच्या काठाचा मोठा दगड बघून त्यावर बसलो. समोर शांत स्तब्ध जलाशय. म्हशी राखणारी गुराखी पोरं, मागच्या झाडाझुडपांमधून येणारा पक्ष्यांचा आवाज आणि पुढचं काही सुचत नसल्यामुळे मेंदूत होणारी चिडचिड असं सगळं सुरू होतं. संदीपला एक कल्पना सुचली आणि तो अचानक म्हणाला, ''सर! पत्रे सावकारांना मारून टाकलं तर!''

'काय?' असं म्हणून मी किंचाळलोच. काही क्षण स्तब्ध झालो आणि मग मी आनंदाने हसत सुटलो. मला त्यावरून असं सुचलं की, पत्रे सावकारांचा देवदर्शनाला गेल्यावर अपघाती मृत्यू होईल मग त्यांचा दशक्रिया विधी कोण करेल असा जिवघेणा पेच तयार होईल. आणि मग त्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर चित्रपटाच्या शेवटाकडे जाता येईल. मी त्याच रात्री बाबा भांड यांना फोन करून ही नवी कल्पना ऐकवली. बाबा भांड यांनी शांतपणे माझं म्हणणं ऐकून घेतलं आणि मग ते अत्यंत समजूतदारपणे म्हणाले, ''हे बघा संजय पाटील, मी एकदा कादंबरी तुमच्या हवाली केलेलीच आहे तर किती मोडायचं आणि कितीदा मोडायचं हा तुमचा विषय आहे. मात्र जे काही करायचं ते अत्यंत चांगलं आणि तुमच्या 'जोगवा'च्या लौकिकाला साजेसं करा म्हणजे झालं. माझ्या नेहमीच तुम्हाला शुभेच्छा आहेत.'' मी झपाट्याने कामाला लागलो आणि बाकीची गोळाबेरीज करू लागलो.

याच काळात अजून दोन मोठ्या अडचणी निर्माण झाल्या. आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार पैठणमध्ये चित्रीकरण करणं धोकादायक होतं कारण कादंबरीला पार्श्वभूमी आहे ती पैठण शहराची, आणि चित्रपट आम्ही जाहीर केला होता तोही पैठण याच नावाने. त्यामुळे पैठणमध्ये रोजच्या रोज धार्मिक विधीलाही सरासरी अडीच ते तीन हजार लोक येतात. शुटींगच्या वेळी त्यांना कसं आवरायचं? आणि दुसरं म्हणजे विषयाची आशय स्फोटकता जाहीर झाल्यास आणि पैठणमधील पुरोहित मंडळींनी हे आमच्या दैनंदिन रोजीरोटीची शहानिशा करून आपल्या धार्मिक प्रक्रियेची जाहीर वरात काढण्याचे प्रकरण आहे असा समज करून घेतल्यास सामानसुमान बांधून पळायची वेळ आली असती. चित्रीकरणासाठी पैठण व्यतिरिक्त स्थळ शोधायचं म्हणून आम्ही विलास कोठारी आणि माझा पनवेलचा जुना मित्र मिलिंद तळेकर असे सगळे एका रविवारी भल्या पहाटे बाहेर पडलो आणि तळेगाव, राजगुरूनगर, शिक्रापूर आणि चाकण अशी दरमजल करत दोन दिवसांनी निराशपणे परत फिरलो. आता पुन्हा नव्याने चार दिवसांनी आम्ही सगळे बाहेर पडलो आणि थेट नाशिक गाठले. नाशिकवरून परत औरंगाबाद, पैठण, अहमदनगर, ओझर, रांजणगाव आणि तुळापूर असे चार दिवस फिरून आम्ही एका मध्यरात्री साताऱ्यात पोहोचलो. पुढील दोन दिवस साताऱ्याचा माहुली घाट, 'स्वदेश'च्या चित्रीकरणाचा वाईचा घाट असं बरंच काही फिरत आम्ही मग इचलकरंजी, सांगली, नृसिंहवाडी असं काय-काय फिरत राहिलो. पार कर्नाटकात संकेश्वरापर्यंत जावून आलो. आठ दिवसात साडेचार पाच हजार किलोमीटरची रपेट करून आणि वेगवेगळ्या ठिकाणी चाळीस प्रकारचे घाट बघून सरतेशेवटी कोल्हापूर मुक्कामी आलो. प्रयाग

चिखलीचा घाट गैरसोयीचा असला तरी पंचगंगेचा घाटावर काहीतरी अंतिम करावे असे ठरले आणि त्याच रात्री मला गारगोटीहून माझे वाङ्मयीन गुरू प्रा. राजन गवस यांच्या ख्यालीखुशालीचा फोन आला. मी बोलता-बोलता माझं नदीघाटाचं रडगाणं त्यांना ऐकवलं तर सर माझ्यावरती भडकलेच. ''संजू, अरे तुझं हे काखेत कळसा आणि गावाला वळसा? ज्या ठिकाणी मी तुला अनेकदा पोहायला घेऊन गेलो, तो गारगोटीचा घाट कसा काय विसरलास? अरे, बाबा भांड यांच्या 'दशक्रिया' कादंबरीमधल्या वातावरणाला भिडेल असा तंतोतंत घाट म्हणजे आपल्या गारगोटीचा नदीघाट आहे. तू ये बरं उद्या सकाळी तुझ्या सवंगड्यांना घेऊन.'' दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही गारगोटीला पोहोचलो आणि सगळेच आनंदाने उड्या मारायला लागलो.

हा आमचा आनंद फार दिवस टिकला नाही कारण केशव भटजीच्या भूमिकेसाठी आमचं सगळ्यांचं एकमत असं होतं की या खणखणीत भूमिकेसाठी 'मनोज जोशी' यांच्या सारखाच दणदणीत आणि दमदार अभिनेता पाहिजे. माझी त्यांच्याशी वीस वर्षांची मैत्री असल्याने त्यांच्याशी फोनवरही बोलणं झालं होतं. त्यांनीही होकार दिला होता. आणि एका रात्री मला त्यांचा फोन आला की, सध्या ते वेगवेगळ्या भाषेमधले चित्रपट आणि 'चाणक्य' या हिंदी नाटकाच्या देशभराच्या प्रयोगांमुळे किमान सात ते आठ महिने उपलब्ध नव्हते. एवढंच काय सविस्तर संहिता वाचावी एवढाही त्यांच्यापाशी वेळ नव्हता. परत एकदा मी हादरलो. दुसऱ्याच दिवशी मी आणि संदीपने त्यांना आरे कॉलनीतील संक्रमण स्टुडिओमध्ये एका भोजपुरी चित्रपटाचे चित्रीकरण सुरू होते तिथे जाऊन गाठलं. मनोजने अख्खं वेळापत्रक माझ्यासमोर नाचवलं. ह्या सगळ्या धामधुमीत मला त्यात कुठे सलग तीन-चार दिवसांची सुद्धा फट दिसत नव्हती आणि आम्हाला तर ते सलग अठरा दिवस हवे होते. त्यांनीही प्रांजळपणे सांगितलं की, 'संजय हे असं आहे. तू दुसरा कलाकार बघ. माझ्यामुळे नुकसान करून घेऊ नका. संदीप आणि मी जरा बाजूला गेलो. आमचं एकमत झालं की केशव भटजी साकारतील तर ते मनोज जोशीच. आम्ही सात महिने थांबायला तयार आहोत, पण तुम्ही २०१६ च्या मध्यानंतरच्या सलग १८ तारखा द्या असं म्हणालो.' तेही तयार झाले. पुढे पावसामुळे हे सगळं बारगळून आम्ही नव्या संकटात सापडलो तरी पुढे जाऊन या चित्रपटामधल्या भूमिकेसाठी मनोज जोशी यांनी सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याच्या राष्ट्रीय पुरस्कारावरती राजमुद्रा कोरली. स्वतःची प्रतिभाही सिद्ध केली आणि आमची प्रतीक्षाही सत्कारणी लावली.

कला दिग्दर्शक चंद्रशेखर मोरे त्याच्या ५० सहकाऱ्यांसह आणि दोन ट्रक भरतील एवढं सामानसुमान भरून आठ दिवस आधीच गारगोटीला रवाना झाला. दोन प्रशस्त मंदिरं आणि मुलाण्याचे हॉटेल तसेच फुलमाळांच्या टपऱ्या आणि इतर वातावरणनिर्मिती करायची होती. घाटाच्या पुढे एका कोपऱ्यात देशी दारुचा गुत्ताही उभा करायचा होता. तसंच त्याला पाटगावच्या सुप्रसिद्ध मठात आणि




मंदिरात (हे मंदिर खुद्द छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधायला सुरुवात केली होती.) काही वातावरणनिर्मिती करायची होती. कारण पत्रे सावकारांच्या मुलाचं लग्न, पंच कमिटी आणि गुढीपाडवा असले महत्त्वाचे प्रसंग पाटगाव येथे पार पाडायचे होते. आणि त्यासाठी तिथले विश्वस्त संजयदादा बेनाडीकर यांनी खुलेपणाने मदत केली. गारगोटीला घाटावर शेखर मोरे आणि साथीदारांनी उभं केलेलं मंदिर आणि इतर गोष्टी पाहून आम्ही सगळे अक्षरशः थक्क झालो.

ठरल्याप्रमाणे १६ सप्टेंबर २०१६ रोजी या दिवशी चित्रिकरणाची गारगोटी येथे सुरुवात झाली. बाबा भांड आणि त्यांच्या सुविद्य पत्नी, कोठारी कुटुंबीय, प्रा.डॉ. राजन गवस सर आणि अनेक हितचिंतक यांच्या साक्षीने आणि पावसाच्या दमदार पुनरागमनासहित आमचा मुहूर्ताचा सीन टाळ्यांच्या गजरात कसा-बसा पार पडला. पुढे हा पाऊस थांबेचना. इनडोअरचे काही प्रसंग चित्रित करून वेळ मारून न्यावी तर त्यासाठी लागणाऱ्या कलाकारांच्या तारखा उपलब्ध नसल्याने सगळंच ठप्प झालं. मारून मुटकून जे केलं होतं त्याचं फुटेज बघून संदीप तर रडकुंडीला आला होता. आम्ही नाईलाजाने आठ दिवसांची सुट्टी जाहीर करून सगळी यंत्रसामुग्री, माणसं, गाड्या वगैरे जामानिमा गोळा करून मुंबई गाठली.

नव्याने चित्रीकरण सुरू झालं तर आता ताखांचे घोळ सुरू झाले. पूर्वनियोजित वेळापत्रक कोलमडल्याने मनोज जोशी, दिलीप प्रभावळकर, उमाताई सरदेशमुख, आशा शेलार, मिलिंद फाटक, नंदकिशोर चौघुले, संतोष मयेकर, आदिती देशपांडे, मिलिंद शिंदे या सर्व व्यस्त कलाकारांची तारांबळ उडू लागली. मनोज जोशी तर देशाच्या कानाकोपऱ्यातून विमान पकडून गोव्याला पणजीच्या विमानतळावर यायचे. गारगोटीहून एक इनोव्हा पाच तासांचा प्रवास करून विमानतळावर जायची आणि तेवढाच प्रवास करून परत गारगोटीमध्ये यायची. दोन दिवस शूटींग झालं की परत तोच उलटा प्रवास सुरू व्हायचा. पुन्हा तोंडावर दिवाळी

आली. त्यामुळे दहा दिवसांची सुट्टी घेऊन सगळा लवाजमा पुनश्च मुंबईला परतला. या सगळ्या गडबडीत वाहतूक खर्च, वाढीव दिवसांचं मानधन, अतिरिक्त वाहनं यांचा अपरिमित आर्थिक बोजा 'रंगनील क्रिएशन्स' या निर्मिती संस्थेवर आला. आणि त्यांनी तो नफा तोट्याचे गणित न बघता स्वीकारला. मुळात गारगोटीमध्ये एका वेळी दीडशे लोकांची राहण्याची व्यवस्था होणं कठीण होतं. कारण 'हिरा पॅलेस' हे सात ते आठ खोल्यांचं हॉटेल आणि 'आश्रय' हॉटेलमधील सुमार दर्जाच्या आठ दहा खोल्या एवढ्यावर भागणं शक्य नसतं. अकरा किलोमीटर वरच्या आदमपूर येथील 'श्री बाळूमामा देवस्थान'च्या भक्त मंदिरामध्ये चाळीस खोल्या विश्वस्तांनी स्वस्तात उपलब्ध करून दिल्या. नशीब म्हणजे पद्मश्री डॉ. डी.वाय. पाटील यांचा खाजगी बंगला आमदार सतेज उर्फ बंटी पाटील यांनी उपलब्ध करून दिल्यामुळे मनोज जोशी आणि दिलीप प्रभावळकर या दिग्गजांना कोल्हापूरहून आणण्या-नेण्याचा आमचा वेळ आणि खर्च वाचला.

ग्रामीण भागामधल्या लोकांनाही आजकाल वेगवेगळ्या वाहिन्या आणि गॉसिपिंग करणाऱ्या समाज माध्यमांवरील वक्तव्यामुळे नको ते ज्ञान प्राप्त झाले आहे. गारगोटी, कडगाव, पाटगाव, आकुर्डी, फये अशा विविध ठिकाणी जमाव दृश्यांसाठी स्थानिक लोकांनी हवे तसे पैसे मागितले. गारगोटीला काही स्थानिक लोकांनी खूपच त्रास दिला. मयताच्या सामानाच्या दृश्यात एक लाकूड मोजण्याचा वजनकाटा एका तासासाठी हवा होता. एक आजीबाई तावातावाने पहिले पाच हजार रुपये टाका आणि मगच काट्याला हात लावा म्हणून हटून बसल्या. शेवटी एक हजार रुपयांच्या तडजोडीवर वजन काटा कॅमेऱ्यासमोर वर खाली हलू लागला. एक म्हातारेसे काका पारावर तंबाखू मळता-मळता मला विचारते झाले की, ''काय संजय पाटील? कधी करताय म्हनायचं पॅक अप? आटपा की लवकर. उद्या काय सकाळी सातचा कॉल टाईम हाय म्हणं? आणि काल रात्री काय कुलकर्ण्यांच्या वाड्यात दीड शिप्ट लागली म्हणं?'' त्यांनी पुढे केलेल्या तंबाखूच्या चिमटीचा नम्रपणे नकार देत मी आश्चर्यानं त्यांच्याकडे बघत राहिलो. सामान्यज्ञान वाढवून घ्यावं म्हणून मी त्यांच्या शेजारी ऐसपैसपणे बसून ज्ञान ग्रहण करू लागलो. काकांनी परत पुढे सुरू केलं,

''तुमा शिनिमावाल्यांचं काय हो? अडचणीचं आणि धावपळीचं काम आस्तंय. खरं, तुम्ही लोकं लै नोटा छापता राव.''

''अहो, काका प्रत्येक सिनेमात पैसे वसूल होतातच असं नाही.'' मी. ''त्या 'सैराट'वाल्याला वळकता का तुमी?'' काकांनी विचारले.

''हो. नागराज मंजुळे ना? मित्रच आहे माझा. का? काय झालं?''

''लै छापलं बघा तुमच्या दोस्तानं. सैराटमधी.''

मला हसावं की रडावं ते कळेना. 'सैराट'चं लेखन-दिग्दर्शन नागराजचं होतं. निर्मिती झी स्टुडिओजची होती. सिनेमा प्रचंड चालला तरी तो बिंबवण्यासाठी आणि चालवण्यासाठीही अवाढव्य खर्च येतो. 'झी'सारख्या मातब्बर वाहिनीला ते सहज शक्य असलं तरी येणाऱ्या नफ्यातून झालेला खर्च वजा होणारच. आणि तो फायदा ते नागराजकडे का बरं वळवतील?

थोडासा विषयांतराचा धोका पत्करून का होईना मी हे का मांडतोय तर खेडोपाड्यात सुद्धा आता मनोरंजन विश्वाविषयी आणि विशेषतः चित्रपट क्षेत्राविषयीच्या आर्थिक आवाक्याविषयी अवास्तव संकल्पनांनी जोर धरलाय. वस्तुतः हे पृथःकरण चित्रपट चांगला की वाईट एवढ्याच सीमारेषेपर्यंत चालायला हवं असा माझा ठाम आग्रह आहे.

'' 'गारगोटी'मधल्या घाटावरही दिवसा काय किंवा रात्री काय कोल्हापूरवरून आणलेल्या कलाकाराला दिवसाचे पाचशे मग आम्हाला का तीनशे? आम्हाला पण तेवढेच द्या. मॉबमध्ये असलो म्हणून काय झालं? मी पण अभिनय करू शकतो.'' असे वाद वारंवार झडू लागले. वादावादी वाढू लागली. त्यात गर्दीचा वाढता त्रास. नाईलाजाने सुरक्षेसाठी २० बाऊन्सर्स मागवले गेले. संदीप युनिटला घेऊन आत चित्रिकरणामध्ये, मी बऱ्याचदा मुंबईला आणि जमावाच्या गर्दीच्या ज्वालामुखीच्या तोंडावर राम कोंडीलकर आणि विनेश निकम ठाकलेले असत. सगळे कलाकार उपस्थित असतील तर १५ ऑक्टोबरलाच म्हणजे खूप आधी क्लायमॅक्स चित्रित करावा असा संदीपचा आग्रह होता. आशा शेलार, मिलिंद फाटक, मिलिंद शिंदे मुंबईहून येणार होते तर मनोज जोशी गोव्यावरून. त्याच दिवशी मराठा आरक्षणाचा भव्य मोर्चा कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. रात्रभर जागरण करून आणि पाठपुरावा करून आम्ही मुंबईहून येणाऱ्या गाड्या पहाटे पाचच्या आत कोल्हापूरचा हायवे क्रॉस करून कर्नाटकात निपाणीमार्गे जाऊन गारगोटीत येतील याची व्यवस्था केली. कारण नंतर कोल्हापूरहून गाडीचं काय, मुंग्यांची रांग ही सरकू शकली नसती. अखेर ही सगळी अग्निदिव्यं पार पडून सलग २७ दिवसांचं शूटींग प्रस्तावित असतांना अवकाळी पाऊस, दिवाळीची सुटी अशा दोन खंडानंतर एकूण ५५ दिवसांचा गोषवारा सोबत घेऊन आम्ही मुंबईमध्ये परतलो.

वरळीच्या माझ्या शासकीय निवासस्थानामध्ये एका खोलीचं आम्ही एडीटींग रूममध्ये रूपांतर केलं. दिग्दर्शक संदीप पाटील आणि संकलक सुनील जाधव यांनी रोज पहाटे दोन-तीन वाजेपर्यंत काम करण्याचा धडाका लावला. मीही अधेमधे रात्री अपरात्री तिथे डोकावत असे. ३१ डिसेंबरपूर्वी चित्रपट सेन्सॉर झाला नसता तर तो वेगवेगळ्या स्पर्धा, आंतरराष्ट्रीय महोत्सव राज्य आणि राष्ट्रीय पुरस्कार या मानाच्या स्पर्धा यासाठी नियमाप्रमाणे आम्ही तो पाठवू शकलो नसतो. रात्रीचा दिवस करून संदीपने संकलन संपवलं. कलर करेक्शन, व्ही.एफ. एक्स., स्पेशल साऊंड इफेक्टस, पार्श्वसंगीत या आघाड्यांवर आम्ही झुंजू लागलो. चित्रपटाला चित्रिकरणादरम्यान सिंक साऊंड म्हणजेच लोकेशन साऊंड हे खर्चिक तंत्रज्ञान आम्ही वापरल्यामुळे काही संवादांमधल्या चुका दुरुस्त करण्यासाठी दोन

दिवसांच्या डबिंगचा सोपस्कार आटोपल्याने आमचे तेही तीन आठवडे वाचले. २९ डिसेंबर रोजी सेन्सॉर मंडळाच्या सभासदांसमोर 'दशक्रिया'चे पहिले परीक्षण झाले. वस्तुतः सेन्सॉर मंडळाचे तीन सभासद परिक्षण करतात परंतु 'जोगवा' आणि 'पांगिरा'सारख्या समस्याप्रधान आणि माझा दोष नसताना वादग्रस्त म्हणून शिक्का बसल्याने 'संजय कृष्णाजी पाटील'ने लिहिलेला चित्रपट म्हणून पाच सदस्यांची समिती हजर होती. आम्ही शांतपणे सामोरे गेलो. फारसे वाद-विवाद न होता आणि काही बदलानिशी चित्रपट ३१ डिसेंबर २०१६ रोजी सेन्सॉरसंमत झाला. आम्ही जानेवारी २०१७ मध्ये नियमाप्रमाणे सगळीकडे प्रवेशिका पाठविल्या आणि निश्चिंत झालो. ८ एप्रिल २०१७ रोजी राष्ट्रीय पुरस्कारांची दिल्लीहून घोषणा झाली. 'दशक्रिया' सर्वोत्कृष्ट प्रादेशिक चित्रपट ठरला. मनोज जोशी यांना सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा तर मला सर्वोत्कृष्ट रुपांतरित पटकथा लेखनाचा असे पुरस्कार जाहीर झाले. सर्वोत्कृष्ट प्रादेशिक चित्रपटाचा दिग्दर्शक म्हणून संदीप भालचंद्र पाटील या रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील कोप्रोली या खेडेगावामधल्या तरुण चित्रकर्मीलाही गोरविण्यात आले.

३ मे २०१७ रोजी देशाचे राष्ट्रपती माननीय प्रणवकुमार मुखर्जी यांच्या हस्ते विज्ञान भवनात हा सन्मान आम्ही रुबाबात स्वीकारला.

त्याआधी तीनच दिवस म्हणजे ३० एप्रिल २०१७ रोजी राज्य शासनाच्या मराठी चित्रपट पुरस्कार सोहळ्यामध्ये हा चित्रपट ११ पारितोषिकांवर मोहोर उमटवून मोकळा झाला. क्रमाक्रमाने पुढे हा चित्रपट म्युनिच, कान्स आणि बर्लिनमध्येही गाजला. बर्लिनच्या 'इंडो-जर्मन फिल्म वीक'मध्ये याचे तीन हाऊसफुल्ल प्रयोग माझ्या मुलाखतीसहित पार पडले. 'कलकत्ता इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल' आणि 'गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' येथेही तो गाजला. आम्ही सगळेजण आनंदाच्या लाटांवर विराजमान झालो, पण आमचा हा आनंद फार काळ टिकणारा नव्हता.

कोठारी दांपत्य, त्यांचा मुलगा नील कोठारी आणि आम्ही सगळी टीम सर्वांनी सहमतीने शुक्रवार, १७ नोव्हेंबर २०१७ हा दिवस प्रदर्शनासाठी निश्चित केला. प्रदर्शनासाठी पोस्टर्स बनविणे, जाहिराती बनविणे, ट्रेलर्स बनवणे, गाणी प्रदर्शित करणे असा सगळा रात्रंदिवस चालणारा एक कारखानाच वरळी येथील माझ्या निवासस्थानात सुरू झाला. मला हुरुप आला. मला आधीचे प्री प्रॉडक्शनचे दिवस आठवले. एकाच वेळी लुकटेस्टसाठी मेकअपमन आणि त्याचे चार सहकारी, वेशभूषेसाठी कॉस्च्युम डिझायनर आणि त्याचे सहकारी, प्रत्येक चाचणीसाठी येणारे-जाणारे कलाकार, भान्या आणि किरकिऱ्याच्या संवादाची तालीम, दिग्दर्शकाच्या टीममधले शेड्युल बनवणारे चार जण, असा त्यावेळी एकदम तीस ते पस्तीस जणांचा जमाव एवढ्याशा घरात जमायचा. आमच्या जेवण नाश्ता बनवणाऱ्या मावशी इतक्या कंटाळायच्या की ''सायेब तुमी जरा शुटींगची तारीख लवकरची पकडा आणि मला सोडवा ह्यातनं'' असं करवादायच्या. माझी पत्नी स्वाती आठवड्याला बारा-पंधरा हजाराचा किराणा न चुकता आणि न थकता पाठवत असे. असो. चित्रपटाचं प्रदर्शन १० दिवसांवर आलं आणि एक ठिणगी पडली.

चित्रपटाच्या टीझरमधल्या एका स्त्री व्यक्तिरेखेच्या तोंडच्या वाक्यामुळे विशिष्ट समाजाच्या भावना दुखावल्याचा आरोप सुरू झाला. आणि मग बघता-बघता सगळ्या वृत्तपत्रांमध्ये आणि वाहिन्यांवर चौफेर वार्तांकनं सुरू झाली. फेसबुक आणि व्हॉटस ॲपवरती माझ्या आणि संदीपच्या नावाने अर्वाच्च आणि अश्लिल शिव्यांची लाखोली सुरू झाली. तरीही मी शांत होतो. पण परिस्थिती गंभीर बनू लागली. दोन-तीन धमक्यांचे फोन आले, तसा मी आक्रमक झालो. ताळतंत्र सोडून शब्द ऐकायला आले की अस्सल रांगड्या अशा कोल्हापुरी भाषेमध्ये आवाज वाढवून उत्तरं द्यायला सुरुवात केली. अर्ध्या दिवसात फरक पडला. मला फोन बंद झाले आणि संदीपला सुरू झाले. क्रमाक्रमाने संदीपचाही संयम सुटू लागला. मग त्याला फोन येईनासे झाले, पण समाजमाध्यमांवरती राळ उडवणं सुरूच होतं. मी व्यथित झालो, पण गप्प राहिलो. मंगळवार १४.११.२०१७ रोजी 'ए.बी.पी. माझा' या वृत्तवाहिनीवर प्रसन्ना जोशी यांच्या नेतृत्वाखालील 'दशक्रिया चित्रपटाला ब्राह्मण महासंघाचा विरोध का?' या विषयावर परिसंवाद झाला. ब्राह्मण महासंघाचे पुणे जिल्हा अध्यक्ष आनंद दवे, समाजशास्त्रज्ञ उत्तरा सहस्त्रबुद्धे, औरंगाबादचे सामाजिक कार्यकर्ते आणि अभ्यासक श्रीकांत देशपांडे आणि मी असे पाच जण होतो. चित्रपटाचे परीक्षण रोखावे किंवा प्रदर्शनाआधी तो दाखवावा या आनंद दवे यांच्या दोन्ही मागण्या मी फेटाळून लावल्या. चित्रपट सेन्सॉरसंमत असल्यामुळे समांतर सेन्सॉरशिप चालणार नाही असे निक्षून सांगतानाच मी संयमित आणि संतुलित भूमिका मांडली. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये महासंघातर्फे याचिका दाखल केली होती आणि त्याची सुनावणीही १७ नोव्हेंबर रोजी होती. इकडे 'जय महाराष्ट्र', 'टी.व्ही ९', 'आयबीए लोकमत', 'झी' या वाहिन्यांवरही संदीप त्यांची भूमिका मांडत होता. एके रात्री अस्वस्थपणे मी डॉ. जब्बार पटेल यांना फोन केला. सगळं सांगितलं. डॉक्टर हसून म्हणाले, ''अरे कविमित्रा, 'घाशीराम कोतवाल'च्या वेळी माझी गाढवावरून वरात काढावी आणि तोंडाला काळं फासावं असा फतवा निघाला होता, मी घाबरलो का? तू एक चांगली कलाकृती केली आहेस. घाबरायचं नाही. सेन्सॉर प्रमाणपत्र आणि राष्ट्रीय पुरस्कारांनी तुझी गुणवत्ता सिद्ध झालेली आहे.'' प्रदर्शनाच्या आदल्या रात्री चित्रपटाचा प्रिमियर शो संपल्यानंतर अभिनेता सुबोध भावे याने सगळ्या वाहिन्यांसमोर चित्रपटाचं जाहीरपणे कौतुक केलं. डॉ. जब्बार पटेल आणि सुबोध भावे हे दोन अपवाद वगळता मराठी चित्रपटसृष्टीतला एकही महापुरुष मला साधा दूरध्वनीवरूनही धीर द्यायलाही आला नाही, याचे दुःख खूप मोठे आहे. नाही म्हणायला अजून एक अपवाद आहे. अभिनेत्री मुक्ता बर्वेने तिच्या आईसोबत पार्ल्याच्या सनसिटीमध्ये रात्री उशिराचा खेळ बघितला आणि मध्यरात्री फोन करून माझं अभिनंदन केलं की, ''सर, खूप

छान झालाय सिनेमा. अप्रतिम. माझ्या आईलाही आवडलाय.''

महाराष्ट्रामधल्या सर्व मल्टिप्लेक्समध्ये आणि सिंगल स्क्रीन थिएटरवरती झेरॉक्स केलेले एक निवेदन रात्रीत पोहोचवण्यात आलं आणि त्यात असा उल्लेख केला होता की, 'दशक्रिया' चित्रपट आपल्या पडद्यावर दाखवू नये अन्यथा काही नुकसान झाल्यास आमची जबाबदार नाही. औरंगाबाद न्यायालयामध्ये सन्माननीय न्यायमूर्तींनी हा चित्रपट सेन्सॉरसंमत असल्याने त्याचे प्रदर्शन अडवता येणार नाही असे सांगून याचिका रद्दबादल ठरवली. तशी नाराज लोकांनी औरंगाबादमधल्या चित्रपटगृहांकडे मोर्चा वळवला. मी आदल्याच दिवशी सह्याद्री विश्रामगृहावर जाऊन सांस्कृतिक कार्यमंत्री मा.ना. विनोदजी तावडे यांना भेटून परिस्थिती विषद केली होती. त्यांनी माझ्या समोरच पुण्याच्या पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला यांना दूरध्वनीवरून सेन्सॉरसंमत आणि राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपट असल्याने काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी दक्षता घेण्याची विनंती केली होती. पुण्यामध्ये सहा-सात ठिकाणी सुमारे साडेसहाशे ते सातशे आंदोलक कार्यकर्त्यांना पोलीसांनी ताब्यात घेतलं आणि नंतर त्यांना सायंकाळी सोडण्यात आलं. औरंगाबाद येथे काही उत्साही कार्यकर्ते चित्रपटगृहामध्ये घुसून सुरू असलेला खेळ बंद पाडू लागले तसे चिडलेल्या जनता जनार्दनाने त्यांना पळवून लावले. कोल्हापूरलाही रसिकांनी ''जर 'दशक्रिया' दाखवायचा नसेल तर इतर कुठलाच चित्रपट दाखवू नका'' असा हट्ट धरल्यावर चित्रपटगृह मालकाने खेळ सुरू केले. थोड्याफार फरकाने सर्व महाराष्ट्रभर हीच परिस्थिती होती. मात्र चित्रपटगृहाकडे रसिक वळतच होते. दुसऱ्या आठवड्यात या चित्रपटाचे १९१ पडद्यांवर रोज २७२ या संख्येने खेळ सुरूच राहिले. चित्रपट सहा आठवडे पडद्यावर झळकत राहिला.

पैठण ही शालिवाहन साम्राज्याची जशी राजधानी तशीच ती एकनाथ महाराज नावाच्या थोर संताची आणि क्रांतिकारी समाजधुरकाची जन्मभूमी आणि कर्मभूमी. पण वास्तवाला आलेली बीभत्स झळाळी झटकून काढणे हे प्रत्येक सर्जनशील माणसाचे कामच असते. त्याच अंतःप्रेरणेतून बाबा भांड यांना ही कादंबरी लिहावीशी वाटली असणार, राम कोंडिलकर आणि संदीपला याच भावनेतून मी हा चित्रपट लिहावा असे वाटले असणार. 'दशक्रिया' कादंबरीच्या मलपृष्ठावर (ब्लर्ब) चंद्रकांत पाटील यांनी नमूद केलेला एक परिच्छेद वाचणे अत्यंत गरजेचे आहे.

''दशक्रिया ही भानुदास नावाच्या एका शाळकरी मुलाच्या आयुष्याची कहाणी आहे. बुद्धी, चातुर्य व साहस पणाला लावून पोटाची खळगी भरू पाहाणाऱ्या, दारिद्र्याने ढासळून गेलेल्या आपल्या कुटुंबाला आधार देण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भानुदासची ही कहाणी हळूहळू विस्तारत जाते आणि रोगट रूढींमुळे धर्माला आलेली अवकळा, विदारक जातिव्यवस्था, अर्थार्जनांचे एकाच वेळी संतापजनक व करुणाजनक वाटणारे पर्याय, पार कोलमडलेली कुटुंबव्यवस्था, उच्च-नीच अशा अनेक वर्णांना व वर्गांना पोटासाठी एकाच पातळीवर आणणारी विचित्र समाजस्थिती, आधुनिकीकरणाकडे पाठ फिरवणारे समूह, मानवी नात्यांचे पैशामुळे पटापट बदलत जाणारे रंग, मृत्यू आणि धर्माबाबतचे चिंतन, सोनेरी इतिहासाचे सडलेले कातडे अंगावर ओढून सुस्त पडलेली नगरी इत्यादी असंख्य गोष्टींना कवेत घेऊन सद्यस्थितीचा क्लेशदायक दस्तऐवज बनते.''

औरंगाबाद खंडपीठाने याचिका रद्दबादल ठरवण्याच्या निर्णयाचा परिणाम दुपारी पैठण शहरात दिसून आला. सर्व पुरोहितांनी विधी आणि क्रियाकर्म बंद ठेवल्यामुळे जवळ-जवळ दोनशे अडीचशे विधी प्रलंबित राहीले. आंदोलनकर्त्यांनी मग अभिनव पद्धतीने त्यांचा रोष व्यक्त केला. (लोकशाही प्रक्रियेनुसार तो त्यांचा अधिकारच आहे.) माझा आणि संदीपचा भर चौकात फोटो लावून आणि समोर पिठाचे गोळे, हळदीकुंकू, अगरबत्त्या असले आवश्यक सामान रचून जवळ-जवळ तीनशे लोकांनी, माझा आणि संदीपचा भर दिवसा आणि भर रस्त्यात दशक्रिया विधी साजरा केला. जिवंतपणीच आम्ही महात्मा पदाला पोहोचलो आहोत याचा आनंद काही छोटा नसतो. त्यामुळे आजही संदीपला मी गंमतीने म्हणतो की, 'तू एक फार मोठा महापुरुष आहेस कारण लोकांच्या मृत्युपश्चात विधी होतात की नाही त्यांना हे माहीत नसते. कधी कधी एखादाही पुरोहित मिळणे कठीण असते. तुझ्यावर लेका शेकडोच्या संख्येने जिवंतपणीच तुझा दशक्रिया विधी करायला लोकांची स्पर्धा लागते हे राष्ट्रीय पुरस्काराच्या तोडीचं पारितोषिक नाही का?

असो. वरील विधानामधला विनोदाचा भाग वगळला तरी वस्तुस्थितीचा निष्कर्ष चिंताजनक आहे असे म्हणावेसे वाटते. राजीव पाटीलच्या दुःखद निधनानंतर त्याच्या मृत्युपश्चात दशक्रिया विधीच्या वेळी दुःखाच्या भरात मी लिहिलेल्या अभंगापासून सुरू झालेला हा अनुभवप्रपंच मी माझ्या आणि संदीपच्या जिवंतपणी पार पडलेल्या दशक्रिया विधीपाशी संपवतो. 'बाबा भांड यांची कादंबरी ते - पडद्यावर साकारलेला चित्रपट' या जगणे समृद्ध करणाऱ्या अनुभवांचा हा प्रवास इथे वर्तुळ पूर्ण करेल असा मी नम्र विश्वास व्यक्त करतो.

*('दशक्रिया ते दशक्रिया' या आगामी पुस्तकातून निवडक अंश 'साकेत प्रकाशन'च्या सौजन्याने)*


**- संजय कृष्णाजी पाटील**

भ्रमणध्वनी : ९८२०२९७३४९

sanjaykpatil1967@gmail.com



**संजय कृष्णाजी पाटील यांची**
**'ग्रंथाली'तर्फे प्रकाशित होणारी आगामी पुस्तके**

- **आभाळ झेलण्याचे दिवस**
- **शून्य प्रहर**
- **हरवलेल्या कवितांची वही**
- **लेझीम खेळणारी पोरं - दुसरी आवृत्ती**

# कोकणातील दशावतार

प्रा. पंढरीनाथ द. रेडकर

**दशावतार म्हणजे कोकणातील लोकनाट्य. लाकडी मुखवटे, मृदुंग-झांज यासारखी वाद्ये, पुरुषपात्रांचा अभिनय या सर्वांतून विस्तीर्ण पौराणिक कथापट उभा राहतो...**

**आ**काशवाणीवर कै. रवींद्र पिंगे असताना आम्ही एका विषयावर चर्चा करत होतो. बोलता-बोलता कोकणातल्या दशावताराचा विषय निघाला.

सर्वांची तंद्री लागली आणि मी सांगू लागलो...

दशावतार हा कोकणी माणसाचा प्राणसखा उत्सव! प्राणवायूच म्हणा! जीवनातली आनंदज्योत कोणती असेल तर तो दशावतारी नाटकाचा सोहळा. भातकापणी झाल्यावर सराईच्या सुमाराला होळी सणापर्यंत दोन महिने दशावतारी मंडळी डोकीवर सामानाचे पेटारे घेऊन शेताबांधावरून गडगे ओलांडून गावोगावी ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक नाटकांचे फंड मांडतात आणि रसिक जनांचे मनोरंजन करतात. त्यात विष्णुपुराण, कालियामर्दन, लक्ष्मी-शनी महायुद्धासारखे रोमांचकारी प्रसंग उभे करणारी नाटकं देवाच्या दशावताराचे दर्शन घडवितात.

ही नाटकं कणकवली, फोंडा, मालवण, वेंगुर्ला, रत्नागिरी, गोव्यापर्यंत गावोगावी रात्रीचा रंग भरतात. 'आज फोंडाच्या बाजारपेठेत बाबी नालंगाचा नाटक आसा' म्हटल्यावर माहेरवाशिणी, आयाबहिणी, चेडवा झिलांका घेऊन पाच वाजल्यापासून नटायला, मुरडायला सुरुवात करतात. नाटक एक वाजता ऐन रात्री उभं राहणार तरी चार तास आधीच बायकांचा नट्टापट्टा चाले. सुंदर नव्या साड्या, अंबाड्यावर आबोलीच्या भरघोस वेण्यांनी सजवलेला सुंदर श्रृंगार म्हणजे कोकणातल्या बायकांचा नवलाचा श्रृंगारच! 'टिको भांग, पावडर-बिवडर लावून नवो परकर पोलका घालून पायातल्या पैंजणा छन्छन् वाजवित बारक्या पोरी नटत-मुरडत आधीच जत्रेला जायला सज्ज.'

त्याकाळी 'बाबी नालंग', 'बाबी कलिंगण', 'चेंदवणकर', 'खानोलकर', 'कलेश्वर नाटक मंडळी' सुप्रसिद्ध होत्या. नाटक कोणत्या गावी आहे याचे फलक बाजाराच्या नाक्यानाक्यावर झळकायचे. पटाचा जुगार खेळणारे 'तिनसान' होताच शेतात ठाण मांडायचे. जुगार रंगात आला की अटीतटीची भांडणे व्हायची. मग दंडुके घेऊन पोलीस शिट्या वाजवित नाल्या, ओढ्यातून धाड टाकायचे. जमलेला माल खिशात कोंबायचे.

नाटकाच्या स्थळी पंचक्रोशीतली लहान-थोर मंडळी जमे. पहिल्याने देवळातल्या देवाचे नवस फेडले जात. नंदादीप पंचारतीत तेल ओतण्याचा मान गावातल्या बाळू तेल्याचा असे. पालखी, मखर सजवण्याचा मान सुगंधा भाविणीचा असे, गाऱ्हाणं घालण्याचा मान, कौल लावण्याचा मान गुरवाचा नाहीतर पटेलाचा असे. ढोलावर पहिली थाप आणि काठी मारण्याचा मान पांडू म्हाराचा असे. अशी देवाची कामे करणाऱ्यांना गाव रहाटी एकर-दोन एकर जमीन बक्षिसी देत असे.

दशावतरातील जत्रा तर गावकऱ्यांची पर्वणीच, मोकळ्या शेतात मांडव घालून पेट्रोमॅक्सच्या चंदेरी प्रकाशात ही जत्रा शोभून दिसे. कुरकुरीत गरम भज्यांची दुकानं, खडखडे लाडू, वडापाव, पांढरी-तांबडी गाठली, पिना, लिपस्टिक, चंद्रकोरी सजवून विक्रीस ठेवल्या जात. बघ्यांची जसजशी गर्दी वाढू लागे तसतशी वडे-मटणाची भांडी रटरटू लागत. सर्वत्र कुरमुरे, वडे-सागुती, वड्याच्या तेलाचा वास दरवळे. शेजारच्या घरात नाटक मंडळींच्या जेवणाचा थाट वडे-सागुती सोबत नशापाणीही चाले.

दहीकाला म्हटला म्हणजे दशावतारी नाटक आलेच. नाटक म्हटले म्हणजे झांज, टाळ, मृदुंग, बाज्याची पेटी गावकऱ्यांचा आनंद द्विगुणित करीत असे. त्यातील सौंदर्य अमाप, दीप्ती अम्लान आणि देवाण-घेवाणही तृप्त करणारं!

फोंड्याची गांगो माऊली, मालवणचा रामेश्वर, आरवलीचा वेतोबा, सावंतवाडीचा रवळनाथ, कोळंबहडीची भैरवी आणि भद्रकाली अशा देवदेवतांचं स्मरण करून गावकरी कुळाच्या देवापुढे नारळ वाढवितात. ''होय महाराज'' असे म्हणून सगळा गाव दुमदुमून जातो. स्त्रिया आदिमातेला काकणा, खणा-नारळाची ओटी भरतात. घरातल्यांना सुखशांती लाभावी म्हणून गाव देवळातला मानकरी गाऱ्हाणे घालतो. अशा प्रसंगी चतु:सीमेपलिकडची मंडळी हजारोंच्या संख्येने एकत्र येतात, त्यात स्त्री, पुरुष, बालकांचाही समावेश असतो. जुन्या-नव्या आठवणी काढून गळाभेटी होतात.



भरपावसातही हे चित्रं दिसते. दसऱ्याच्या सीमोल्लंघनात पाऊस कोसळतो तरीही लोकांची गर्दी होतेच.

काल पाहिलेल्या दशावतारी नाटकातला काळाकुट्ट संकासूर, सीतेचा विलाप, द्रौपदीचं वस्त्रहरण आणि तिचा आकांत, दुर्योधन कर्णादी खलपुरुषांचं मंडपात थयथय नाचणं हे चित्र झोपेतच समोर आले की लहान बालकं घाबरून आईला मिठ्या मरतात. भूक लागली तर नाचणीची भाकरी आणि कुळथाचं पिठलं, तांदळाची भाकरी, पेज आणि सुक्या बांगड्याचं तिखलं हे तळकोकणातल्या माणसांचं वैभव. रानातली रानभाजी आणि कुंपणातल्या अडाण-माडाची चव घ्यावी तर कोकणात जायलाच हवं.

अकरा वाजेपर्यंत झोपून आदल्या दिवशीचं जागरण नटमंडळी निववित असे. बारा-एकपर्यंत नटमंडळी पेहेराव, चेहरेपट्टी लाल-निळ्या रंगाने रंगवित असत. काळेकुट्ट भस्मासूर आणि तोंडातून रक्त ओकणारी राक्षससेना उभी करीत. रावणाची दहा तोंडे, मारुतीची गदा, रामाचं धनुष्य आणि सीतेचं गंगावण निगुतीने ठेवलेलं असे. फोंड्याचा गोड गळ्याचा, स्त्री पात्र करणारा अभिमन्यू लाड, सीतेचं पार्ट सुरेख रंगवित असे. सीताहरण नाटकातील करुणविलाप अभिमन्यू गाऊ लागला की बायकांच्या डोळ्याला पदर लागलाच म्हणून समजा.

शंकासुराने ब्रह्मदेवाची, वेद चोरल्याची आरोळी ऐकली की लहानथोर मंडळी झोपेतून गडबडून जागी झालीच म्हणून समजावे. शेतवडीत पटाचे जुगार रंगू लागले की पोलीस आलेच म्हणून समजावे. देवळात घंटानाद झाला की दहीकाल्यातील दशावतरी मंडळीने नाटक उभे केले असेच समजावे.

शंकासुराने आपले काळे डगले आणि गणपती सरस्वतीने हातातले मोर कोपऱ्यात नेऊन ठेवले की झांज, पेटी, मृदुंग वाजू लागे. त्वरित राजा अर्ध विडीचं जळणारं थोटुक पायाखाली दाबून तणतणत स्टेजवर येतो. बऱ्याच वेळा बाकडी जुनीपुराणी असली तर त्या बलदंड राजाच्या बसण्याने राजासकट खाली कोसळत असत. मग जो काही पिटात हसा पिके त्याला तोड नाही. बऱ्याच वेळा राजा मंडपात येण्यापूर्वी ऊसाची कांडी खात-खात प्रवेश करी. पूर्वीच्या काळी दाजी हिवाळेकर रावणाची व खलनायकाची भूमिका करीत असे. तो नट बाकावरून पडल्याचे मला अजूनही स्मरते.

''देवा गजानना गंगाधरा'' अशी नांदी सुरू झाली की मृदुंग दणदणू लागला की पिटातली (जमिनीवरची) मंडळी मांड्या सावरून बसत. जागेवरून बायकांच्यामध्ये भांडणेपण होत.

''सकल्या वायच बाजूक सराक ना गो, माझ्या डोळ्यावर खांबो येता ना गो''

''तुच जावन पुढे बस ना गे रांडे''

''रांडे कोणाक म्हणतंस गो? ही जमीन तुझ्या बापसाची हा? ह्यो जागो तुझ्या धगडाचो हा?''

अशा प्रकारची प्रादेशिक ग्रामीण संभाषणं बायकांत चालत. कधीमधी बायका एकमेकीच्या झिंज्यापण ओढीत. पहाट झाली की नाटक संपत असे. रात्रभर राजा आणि सकाळी डोक्यावर बोज्या घेऊन नाटकमंडळी दुसऱ्या गावी स्थलांतर करीत असे.

जीवनातलं कारुण्य, दारिद्र्य, आर्तता, गरिबी घेऊन ही मंडळी स्वत:चा जीव संकटात घालून केवळ आपली कला जिवंत रहावी म्हणून सगळा खटाटोप करते. मिळकत काहीच नाही. केवळ आपले आणि आपल्या प्रदेशातल्या लोकांचे मनोरंजन व्हावं व आपली कला जिवंत रहावी हा उद्देश. पूर्वी दारिद्र्यात खितपत पडणारा कलावंत आता थोडा जीव धरून आहे कारण मायबाप सरकारने या नाटकी कलाकारांना पेन्शन योजना लागू केली आहे या कलावंतांचा विचार करताना रॉय किणीकरांचं काव्य मला पुन्हा-पुन्हा आठवतंय,

*ये मिटूनी जाऊ दंश जोवरी ओला*
*मृदगंध पांघरून घेऊ चंद्र उशाला.*

**- प्रा. पंढरीनाथ रेडकर**
दूरध्वनी : (०२२) २४३०३४४७
भ्रमणध्वनी : ९९३०८०६९६२

संकल्पना बदलणारा वास्तुरचनाकार

# बाळकृष्ण दोशी

अरुण मळेकर

**नव्वदीची वेस ओलांडलेल्या बाळकृष्ण दोशी या महान कमानकाराला त्याच्या प्रदीर्घ ध्यासपर्वासाठी वास्तुकलेतील नोबेल पारितोषिकाची शान असलेल्या 'प्रित्जकर' पुरस्काराने नुकतेच गौरवले गेले. हा पुरस्कार प्राप्त झालेले ते एकमेव भारतीय वास्तुरचनाकार आहेत.**

**भा**रतीय संस्कृतीचा प्राचीन इतिहास सांगणाऱ्या पुरातन वास्तू म्हणजे वास्तुकला आणि वास्तुशिल्पाचा वैभवशाली नजराणा आहे. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात या वैभवात हवी तशी भर न पडल्याने ब्रिटिश आमदानीत उभारलेल्या अनेक प्रकारच्या इमारतींचे बांधकाम पाहून समाधान मानणाऱ्या पर्यटक जाणकारांचा वर्ग अद्याप मोठा आहे. याला कारण म्हणजे इतिहास आणि प्राचीन संस्कृतीच्या अभ्यासाची उणीव हे असू शकते.

हा दृष्टिकोन बदलण्यासाठी ज्यांनी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या अलौकिक कामांनी सारं आयुष्यच वेचलं ते वास्तुरचनाकार बाळकृष्ण दोशी म्हणजे बांधकामाच्या क्षेत्राला कलाटणी देणारे प्रतिभावंत वास्तुरचनाकार होत. नव्वदीची वेस ओलांडलेल्या या महान कमानकाराला त्याच्या प्रदीर्घ ध्यासपर्वासाठी वास्तुकलेतील नोबेल पारितोषिकाची शान असलेल्या 'प्रित्जकर' (Pritzker) पुरस्काराने नुकतेच गौरवले गेले. हा पुरस्कार प्राप्त झालेले ते एकमेव भारतीय वास्तुरचाकार आहेत. हा सन्मान प्राप्त झाल्यावर सुद्धा त्यांनी जी प्रतिक्रिया व्यक्त केलीय. त्यातून त्यांची वास्तुकलेमधील कामाची निष्ठा आणि तपस्याच जाणवते.

''विस्तारीत जाणाऱ्या स्थापत्यकलेत काम करण्याची मला जी संधी लाभली तेच माझे जीवन, तत्त्वज्ञान आणि स्वप्न साकारण्याचा ध्यास आहे.'' यावरून त्यांनी निवडलेल्या वास्तुशास्त्र क्षेत्राशी त्यांची नाळ कशी जोडली गेली आहे याची जाणीव होते. सर्वच प्रदेशात एकाच प्रकारच्या इमारतीची उभारणी करून चालणार नाही तर त्याकरता परिसरातील भौगोलिक स्थिती, पर्यावरण, अन्य नैसर्गिक सुविधांचा स्रोत या घटकांचा प्रामुख्याने विचार होण्यावर दोघींचा भर आहे. तरीही या सूत्रानुसार स्थानिकांच्या प्रादेशिक गरजा ओळखून या इमारतींची उभारणी करताना बांधकामातील आधुनिक तंत्रज्ञानाशी त्यांनी फारकत घेतलेली नाही. वास्तुशास्त्रातील आधुनिक प्रवाहांचा अंगीकार करताना आपल्या पारंपरिक वास्तुरचनांचं संवर्धन होऊन त्यातून भारतीय वास्तुवैभवाचं दर्शन घडावे हे दोशींना अभिप्रेत आहे. जसे भारतीय चित्रपटसंगीतात पाश्चिमात्त्य संगीताचा यथायोग्य



वापर करताना आपला भारतीय बाज कायम ठेवण्यात संगीतकार सी. रामचंद्र यांचीही हीच धारणा होती.

बाळकृष्ण दोशी यांचा संस्कारक्षम विद्यार्थिदशेचा काळ पुण्यात गेला. पुण्यातील 'नूतन मराठी विद्यालया'चे विद्यार्थी असलेल्या दोशींचा वडिलांच्या सुतारकामाशी निगडित कारखाना होता. या कारखान्यातील विविध आकाराच्या सुबक वस्तूंनी त्यांना बालपणीच भुरळ घातली. या लाकडी कलाकृतीतून चित्ताकर्षक आरेखन तयार करण्याची आवड त्यांना तेव्हाच निर्माण झाली. दोशींनी देशभरात ज्या शेकडो कलापूर्ण इमारती भविष्यात उभारल्या त्यांच्या आरेखनाच्या निर्मितीचा हा खरं तर श्रीगणेशा होता.

आपल्या अभिरुचीनुसार वास्तुविशारद-वास्तुरचनाकार होण्याचं निश्चित केल्यावर पुण्यातील शालेय शिक्षणानंतर मुंबईच्या 'जे. जे. स्कूल ऑफ आर्किटेक्चर' या प्रख्यात संस्थेत त्यांनी प्रावीण्यासह शिक्षण पूर्ण केले आणि निवडलेल्या क्षेत्राचा अधिक अभ्यास करण्यासाठी त्यांनी फ्रान्समध्ये पॅरिसनगरी गाठली. दोशींच्या कुंडलीतील भाग्योदय खूपच अनुकूल होते. त्यामुळे



**बाळकृष्ण दोशी**
यांच्या वास्तुकलेचा
एक नमुना

त्यांच्या इच्छेनुसार विश्वविख्यात वास्तुविशारद ला-कार्बुझिए यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना काम करण्याची संधी लाभली. या संधीचं दोशींनी सोनंच करून टाकले. जागतिक वारसा यादीत समाविष्ट असलेल्या चंदीगड नगरीच्या उभारणीचे 'ला-कार्बुझिए' हे शिल्पकार जरी असले तरी ती नगरी साकारण्यातील बाळकृष्ण दोशींची कल्पकता वाखाणण्याजोगी आहे. 'ला-कार्बुझिए'प्रमाणेच 'लुईकान' या जगप्रसिद्ध वास्तुरचनाकाराच्या विचारांचा प्रभाव दोशींवर झाला, हे त्यांच्या अनेक वास्तुरचनांतून आढळते.

बाळकृष्ण दोशी हे खरे तर शांतता आणि एकांतप्रिय असे ऋजू स्वभावाचे. या त्यांच्या स्वभावाचं प्रतिबिंब त्यांच्या वास्तुकलेतून आढळते. आपण निर्माण केलेल्या वास्तूंमधून शांततेचा सुखद अनुभव यावा असा त्यांचा आग्रह आहे. या विचाराचा पगडा त्यांच्यावर असल्याने आपल्या आराखड्यानुसार इमारतीच्या कामासाठी बरीच जागा केवळ पायवाटेसाठी उपलब्ध करण्यावर त्यांचा भर आहे. आपल्या वास्तूत प्रवेश करताना माणसाला शांततापूर्ण, निसर्गसहवासाचा लाभ झाल्यावर देवस्वरूप निसर्गाचं लख्ख दर्शन घडावं असं त्यांना वाटतंय.

आपल्या प्राचीन वास्तुकलेतील मूळ संकल्पनेचा अभ्यास करून काही इमारती त्यांनी उभारल्यात. शिक्षणक्षेत्राशी निगडित इमारती निर्माण करताना कमीत कमी दरवाजे हवेत, तसेच ज्ञानाचा संचार असल्या वास्तूमधून मुक्तपणे व्हावा ही त्यापाठीमागील त्यांची कल्पना प्राचीन गुरुकुल आणि रवींद्रनाथांच्या शांतिनिकेतनशी जवळीक साधणारी आहे. इमारतीसभोवतालच्या वातावरणाच्या मोकळेपणाबरोबर हवा, प्रकाश, भरपूर हवा याबाबतीत ते दक्ष आहेत.

सर्वसामान्य माणसाला आर्थिकदृष्ट्या परवडेल तसेच त्याच्या मानसिक स्वास्थ्यासह आरोग्य चांगले राहील असे त्याच्या प्राथमिक गरजा भागवणारे अनेक गृहनिर्माण प्रकल्प दोशींनी मोठ्या कल्पकतेने साकारलेत. त्यांचे ठळक उदाहरण म्हणजे अहमदाबादमध्ये समाजातील सर्व थरातील लोक एकत्र राहाण्यासाठी बांधले गेलेले गृहप्रकल्प. यांच्या उभारणीतही परिसरातील सौंदर्याच्या संवर्धनाचा मेळ त्यांना झकासपणे साधला आहे.

दोशींचा कल्पकतेने तयार झालेल्या वास्तूमधून प्रसन्नता भव्यता आणि उदात्तपणा यांचा अनोखा मिलाफ जाणवतो. याचे उदाहरण म्हणजे बंगळूर येथील 'मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट'चे देता येईल. येथील परिसरात वावरताना अनेक आकाराच्या चित्ताकर्षक वास्तू, त्यांना एकमेकांशी जोडणारे ॲप्रोचरोड, वेगवेगळ्या ठिकाणचे छोटे-मोठे चौक, तसेच शैक्षणिक इमारतींसह कर्मचारी वसाहत, विद्यार्थी वसतिगृहे हे सर्वच समूहाच्या वातावरणाशी सुसंगत आहे. याच कारणाने शिक्षणाला परिपक्व असे ज्ञानदानाच्या आदान-प्रदानाचे काम येथे चालते.

स्वातंत्र्योत्तर काळात अशा गृहप्रकल्पातून वास्तुशास्त्राला कलाटणी मिळून, नावीन्यपूर्ण संकल्पनेसह त्याला लोकमान्यता लाभली त्या पाठीमागे बाळकृष्ण दोशींबरोबर अच्युत कानविंदे, चार्ल्स कोरिया, अनंतराव राजे, माधव अचवल या युगप्रवर्तक वास्तुरचनाकारांचं नाव घ्यावेच लागेल.

म. गांधींच्या विचारांनी प्रभावित होऊन त्यांच्या विचाराशी सुसंगत गृहरचना उभारणाऱ्या लॉरी बेकर यांच्याशी साधर्म्य असलेले दोशी हे अल्पखर्चिक गृहनिर्माण प्रकल्प उभारणीचे, संशोधनात्मक काम करणारे प्रवर्तक ठरलेत. याला कारण म्हणजे त्यांनी अभ्यासपूर्ण कल्पकतेने उभारलेल्या गृहरचनेतून पर्यावरणपूरकता, आधुनिकता आणि आपल्या प्राचीन संस्कृतीचा सोनेरी संगम साधण्याचा केलेला प्रयत्न.

वास्तुरचनाकार म्हणून सर्वत्र नावलौकिक मिळवताना दोशींनी व्रतस्थपणे काम करताना आपल्या कामाला सतत वास्तवाचं भान ठेवून व्यासंगासह संशोधनाची जोड दिली आहे. त्यांच्या

अजोड कामातून त्यांच्या विचारांच्याही पाऊलखुणा उमटल्यात. हे काही उत्तुंग इमारत प्रकल्पातून जाणवते. इंदूरमधील 'अरण्य', जयपूरनगरीतील 'विद्याधननगर' ही झाली निवासी गृहसंकुलं. याव्यतिरिक्त आयआयटी (बंगळुरू), एनआयएफटी (दिल्ली), सीईपिटी (अहमदाबाद), आयसीआरआय (हैदराबाद) आणि पुण्यातील 'सवाई गंधर्व वास्तू' हा त्यांच्या असामान्य प्रतिभेचा जिताजागता पुरावा आहे.

स्वातंत्र्यानंतरही बराच काळ ब्रिटिश राजवटीचा वास्तुकलेवरही प्रभाव होताच. या जोखडातून बाहेर पडण्यासाठी बाळकृष्ण दोशींनी १९६२मध्ये 'स्कूल ऑफ आर्किटेक्चर'ची स्थापना करून वास्तुकलेचा अभ्यास करण्यासाठी एक नवीन दालन खुले करून इतिहास घडवला. यांच्या या कामाबद्दल ते वास्तुरचनाकार 'माधव आचवल' सुवर्णपदकाचे मानकरी ठरलेत.

आपल्या कामातून ईश्वरप्राप्तीचा शोध घेणाऱ्या दोशींनी एक व्रत म्हणून काम करताना मानवी जीवन सुखकारक करण्याचा ध्यासच घेतला होता. गृहनिर्माण प्रकल्प साकारताना कचरा-घनकचऱ्याचा पुनर्वापर या त्यांच्या अनोख्या प्रयोगातून याची सत्यता जाणवते. बदलत्या काळातही वास्तुकला ही नेहमीच समाजाभिमुख आणि पर्यावरणसंवर्धक असली पाहिजे ही मूळ दोशींचीच कल्पना. यालाच भारतीय स्थापत्यकौशल्य, संस्कृती, स्थानिकांची परंपरा याचे भान त्यांनी नेहमीच सांभाळल्याचे जाणवते. अहमदाबाद मुक्कामी आपल्या 'संगत' या स्टुडियो वास्तूची निर्मिती करताना मोकळी गच्ची, तळी, नागमोडी रस्ते, टेकड्या असे जणू निसर्गाचे प्रतिरूपच येथे जाणवते. कृत्रिम आणि नैसर्गिक घटकांचा समतोल वापर करण्यात दोशींची दूरदृष्टीही दिसून येते.

दोशींच्या कामाचा आढावा घेताना त्यांच्या कामात चाकोरीबद्धपणा कुठेच आढळत नाही; स्वत:च्या वर्तुळात न अडकता आपली वेगळी नाममुद्रा उमटवत अनेक जाणकारांना सहभागी करून त्यांनी नावीन्यपूर्ण प्रयोगाच्या आधारे वास्तुशास्त्राला कलाटणी देताना दिशादर्शनही केलंय.


या तपस्वी, व्रतस्थ माणसाच्या घरात नेहमीच प्रसन्न, आनंदी वातावरण असते. तेजल, राधिका आणि मनीषा या तीनही कन्यांचा सक्रिय सहभाग दोशींच्या कामात असतोच. पत्नी कमलाबेन यांचा सहभाग ते नेहमीच कृतज्ञतेने व्यक्त करतात. स्वत:विषयी मोजकंच बोलणाऱ्या, नव्वदीपार केलेल्या या कृतार्थ माणसाचा सारा जीवनपट म्हणजे वास्तुशास्त्र विषयाचा धगधगता यज्ञकुंड आहे.

**– अरुण मळेकर**
भ्रमणध्वनी : ९८६९११८५९१
दूरध्वनी : (०२२) २५४३३१४७
arun.malekar10@gmail.com

॥ग्रंथाली॥

संकल्पना **मंदार आपटे**
शब्दांकन **श्रेयसी वझे- मंत्रीवादी**

## कितीदा नव्याने तुला आठवावे...



'कितीदा नव्याने तुला आठवावे' ह्या गीताच्या निमित्ताने बऱ्याच जणांनी त्यांच्या कारकिर्दीचा काळ पुन्हा एकदा नव्याने जगला ते हे पुस्तक वाचून जाणवेल. ह्यातील सर्व मान्यवर लेखकांचे त्या-त्या क्षेत्रामधील पहिले पाऊल, त्याची एखादी हृदयस्पर्शी आठवण सांगणारं पुस्तक.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

**शिक्षण विकास मंच,**
**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई लिखित**

## सेमीइंग्रजी का आणि कसे?



सेमीइंग्रजीचे भवितव्य म्हणजेच मराठी शाळांचे भवितव्य हे समीकरण लक्षात घेऊन सेमीइंग्रजीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी योग्य ती पावले उचलली तरच सर्वसामान्य विद्यार्थ्यांचे आणि मराठीचे भले होईल. अन्यथा इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मुक्त वाट उपलब्ध करून देऊन बहुजन समाजाचे प्रचंड प्रमाणात नुकसान आपल्या हातून होईल. हे वास्तव लक्षात घेऊन 'सेमीइंग्रजी - का आणि कसे?' या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ‘ग्रंथाली’चा ‘चौरस’ वाचकदिन

## कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने

**स्थळ : कीर्ती महाविद्यालय पटांगण, प्रभादेवी, दादर (पश्चिम), मुंबई ४०००२५**

‘ग्रंथाली’चा ४४वा वाचकदिन साजरा होतोय. नव्या विषयांची ओळख आणि जुन्याचं भान असं त्याचं स्वरूप कायम आहे. या वर्षी दहा नव्या पुस्तकांचं प्रकाशन होईल. सोबत आहे प्रथमच प्रेक्षकांसमोर येणारी एकांकिका ‘भोंडला’ आणि स्नेहल भाटकर, बाबूजी, गदिमा आणि पुल यांच्या जन्मशताब्दीवर्षानिमित्त ‘चौरस – शब्दासुरांची मैफल’...

### सोमवार, २४ डिसेंबर २०१८

दुपारी ४ वाजता
‘मु.पो.आई’, ‘पंखाविना भरारी’ आणि
‘आमची आई’ या पुस्तकांच्या निमित्ताने आयोजित
‘आई’ या विषयावरील स्पर्धेतील निवडक लेख आणि
कविता यांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन
सायंकाळी ६ ते ८

---

### ‘# मी टू’ : उत्तर की प्रश्न (चर्चासत्र)

सूत्रधार : ॲड. जाई वैद्य । समन्वयक : प्रल्हाद जाधव
वक्ते : संजीव लाटकर, भरत दाभोळकर, वंदना खरे,
आस्ताद काळे, श्याम जोशी

---

### मंगळवार, २५ डिसेंबर २०१८

सकाळी ११ ते ४
अभिवाचनस्पर्धेची अंतिम फेरी

---

सायंकाळी ५ ते ५.३०
**संजय कृष्णाजी पाटील यांच्या**
**पुस्तकांचे प्रकाशन**
**‘आभाळ झेलण्याचे दिवस’** (लेख/कथा/समीक्षा)
प्रकाशन हस्ते : **बाबा भांड**
**‘दशक्रिया ते दशक्रिया’** (साकेत प्रकाशन)
प्रकाशन हस्ते : **राजदत्त**
**‘शून्य प्रहर’ (एकांकिकासंग्रह)**
**‘हरवलेल्या कवितांचा वही’** (कवितासंग्रह)
प्रकाशन हस्ते : **सौमित्र**
**‘लेझिम खेळणारी पोरं’** (कवितासंग्रह)
प्रकाशन हस्ते : **मुक्ता बर्वे**

### मंगळवार, २५ डिसेंबर २०१८

सायंकाळी ५.३० ते ६.३०
संजय कृष्णाजी पाटील लिखित
**‘भोंडला’**
या एकांकिकेचा प्रयोग
अभिजित जयवंत झुंजारराव दिग्दर्शित आणि
अभिनय, कल्याण निर्मित

---

सायंकाळी ६.३० ते ७.००
**पुस्तकप्रकाशन**
**‘लेखसंग्रह’** – सिसिलिया कार्व्हालो
**‘माध्यमरंग’** – रविराज गंधे
**‘नोबेलनगरीतील नवलस्वप्ने’ २०१८** – सुधीर थत्ते,
नंदिनी थत्ते
**‘ट्रंप’** – डॉ. अनंत पां. लाभसेटवार
**‘हिंदुस्थान रागदारी संगीतातील सुवर्णयुगाचे मानकरी**
रमेश वाघमारे
**मराठी स्त्रीची बदलती अस्मिता** – नीलिमा भावे

---

अभिवाचन, लेख, निबंध, कविता
या स्पर्धांमधील विजेत्यांच्या
**पुरस्कारवितरणाचा सोहळा**

---

सायंकाळी ७ वाजता
### ‘चौरस’ – शब्दसुरांची मैफल

स्नेहल भाटकर, बाबूजी, गदिमा आणि पुल यांनी दिलेल्या
शब्द-सुरांच्या शिदोरीची मैफल. ध्वनिचित्रफितींसह.
संकल्पना-संहिता : अरुण जोशी
संहिता-सहलेखन-निवेदन : अस्मिता पांडे

ग्रंथप्रदर्शन, वाचक-लेखक मेळावा आणि खुल्या
मैदानावर रसनेला तृप्त करणाऱ्या पदार्थांचा आस्वाद.

***लक्षात राहील अशी संध्याकाळ अनुभवायला अवश्य या!***

# #METoo

धनंजय गांगल

**'मी टू' हा औट घटकेचा खेळ की एक संघटित बुलंद आवाज? स्त्रीमुक्ती चळवळीने तिला बळ दिले आहे की चळवळीचा हा एक नवा टप्पा आहे? असे अनेक प्रश्न घेऊन येत्या वाचकदिनी 'ग्रंथाली' या कळीच्या मुद्याला भिडणार आहे. हा लेख या चर्चेची विस्तृत पार्श्वभूमी मांडतो आहे...**

**भँ**वरीदेवी ही राजस्थानमधील एका छोट्या गावातील गरीब शेतकरी कुटुंबातील स्त्री. राजस्थान सरकारच्या स्त्री-विकास आणि प्रबोधनाच्या योजनेअंतर्गत एक कार्यकर्ती (साथिन) म्हणून १९८५ पासून काम करत होती. स्त्री-शिक्षण, आरोग्य, स्त्री-भ्रूणहत्या, हुंडा प्रतिबंधक कायदा आणि मुख्य म्हणजे अल्पवयीन-विवाह या सर्व प्रश्नांवर घरोघरी जाऊन स्त्रियांचे, कुटुंबाचे प्रबोधन करणे हे साथिन म्हणून तिचे मुख्य काम. राजस्थानमध्ये अल्पवयीन-विवाह प्रश्न मोठा. खुद्द भँवरीदेवीचाही अल्पवयीन-विवाह झालेला. साल १९९२. अशाच एका 'गुज्जर' या उच्च वर्णीय समाजातील फक्त नऊ महिन्याच्या मुलीचा अल्पवयीन-विवाह लावण्याला विरोध केल्यावरून खटका उडाला. भँवरीदेवी आणि तिचा पती मोहन-लाल प्रजापत हे कुंभार जातीचे. आपल्या शेकडो वर्षांच्या महान परंपरेला विरोध आणि तोही आपल्याहून तथाकथित खालच्या जातीच्या, तेही एका स्त्रीने करावा यावरून त्या गुज्जर समाजाचा तिळपापड उडाला. त्यातल्या पाच-एक पुरुषांनी भँवरीदेवी आणि तिचा पती मोहन-लाल यांना शेतात एकटं गाठलं. पतीला मारहाण केली तर भँवरीदेवीला कायमचा धडा शिकवण्यासाठी तिच्यावर आळीपाळीने बलात्कार केला! नेहमीच्या प्रथेप्रमाणे पोलिसांनी सुरुवातीला तिची तक्रार नोंदवून घेण्यात टाळाटाळ केली. सहसा हे पोलीस अधिकारी अशा अल्पवयीन-विवाह समारंभात स्वतःच भोजनाचा आनंद घेतलेले असतात. पण स्थानिक वृत्तपत्रांनी, मग टप्प्याटप्प्याने मोठ्या वृत्तपत्रांनी आणि स्त्री-संघटनांनी ही घटना उचलून धरली. शेवटी सरकारला जाग आली. हे प्रकरण सीबीआयकडे सोपवावे लागले. गुन्हा दाखल झालेल्या पाच आरोपींना जामीन नाकारत राजस्थान उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एन एम टिबरेवाल यांनी गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे आशादायी चित्र उभे केले, पण नंतर पाच वेळा योगायोगाने न्यायमूर्ती बदलत गेले. शेवटी नोव्हेंबर १९९५ मध्ये निकाल लागला तेव्हा बलात्काराच्या आरोपातून सर्व आरोपींची सुटका झाली आणि अत्यंत कमी प्रतीच्या धमकावणे वगैरे सारख्या गुन्ह्यांसाठी सगळ्यांना फक्त नऊ महिन्यांची शिक्षा झाली. वाईट म्हणजे बलात्काराच्या आरोपातून आरोपींची सुटका करण्याची अत्यंत अविश्वसनीय आणि विचित्र कारणं न्यायमूर्तींनी दिली. ती अशी होती - उच्चवर्णीय खालच्या जातीच्या स्त्रीवर बलात्कार करणार नाहीत. गावचा मुखिया बलात्कार करणार नाही. साठी ओलांडलेले पुरुष बलात्कार करू शकत नाहीत. आरोपींमध्ये एक काका-पुतण्या होते, न्यायमूर्तींनी म्हटलं नात्यातल्या कोणासमोर कोणी बलात्कार करणार नाही! या निकालाने एकच भडका उडाला आणि निषेधाचे अनेक मोर्चे निघाले. या पूर्ण प्रकरणात गुन्हा हा त्यांच्या शेतात घडला - सरकारी जागेत नाही असा सूर लावत पहिल्यापासून सरकारने आपली जबाबदारी झटकली. पुढे या पार्श्वभूमीवर स्त्रियांसाठी काम करणाऱ्या 'विशाखा' नावाच्या महिला स्वयंसेवी संघटनेने सर्वोच्च न्यायालयात जनहितार्थ याचिका दाखल केली. या याचिकेवर इ.स. १९९७ साली सर्वोच्च न्यायालयाने जो निकाल दिला तो निकाल म्हणजेच 'विशाखा निकाल' किंवा 'विशाखा मार्गदर्शक तत्त्वे' होत. यातली मुख्य बाब म्हणजे कामाच्या ठिकाणी स्त्रीच्या सुरक्षेची जबाबदारी एम्प्लॉयर म्हणजे नियोक्तावर (रोजगार देणाऱ्यावर) टाकण्यात आली.

'विशाखा' याचिकेवर निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाची दिलेली व्याख्या आणि मार्गदर्शक तत्त्वे साधारणपणे अशी आहेत :

- कोणताही अस्वागतार्ह शारीरिक स्पर्श
- शरीरसंबंधांची मागणी किंवा विनंती
- लैंगिकतासूचक शेरे मारणे वा अश्लील बोलणे
- कामुक वा अश्लील चित्रे दाखवणे किंवा एसएमएस, ईमेल करणे.
- लैंगिकता सूचक कृती, शारीरिक, मौखिक किंवा नि:शब्दपणे केलेली अन्य कोणतीही कृती.

नोकरी वा व्यवसायाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळणूक होऊ न देण्याची जबाबदारी ही मालकाची अथवा संबंधित अधिकारी वा व्यक्तीची असेल.

सर्व सरकारी व निमसरकारी अथवा खाजगी कामाच्या




ठिकाणी लैंगिक छळवणूक म्हणजे काय, याची माहिती काम काजाच्या ठिकाणी लावण्यात यावी व सर्व कर्मचाऱ्यांपर्यंत ती पोचेल, अशी व्यवस्था करावी.

जर लैंगिक छळवणुकीची घटना ही फौजदारी गुन्हा होत असेल, तर संबंधित अधिकाऱ्यांनी योग्य त्या ठिकाणी याची तक्रार तर नोंदवावीच; पण त्याचबरोबर पीडित महिलेस सर्व सुरक्षा पुरवावी.

पीडित महिलेस तिच्या इच्छित ठिकाणी बदली करून द्यावी व संबंधित आरोपी कर्मचाऱ्याविरुद्ध नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई सुरू करावी.

सर्व सरकारी, निमसरकारी, खाजगी तसेच सार्वजनिक क्षेत्रातील कार्यालयात महिलांच्या होणाऱ्या लैंगिक शोषणाची तक्रार ऐकून निवाडा देण्यासाठी एक तक्रार निवारण मंच वा समिती असावी व त्यात पन्नास टक्के सदस्य महिला असाव्यात, स्वयंसेवी महिला संघटना, महिला आयोग यांचे प्रतिनिधी असावेत, तसेच कायदेतज्ज्ञ, तक्रार करणारी स्त्री व ज्याच्याविरुद्ध तक्रार आहे तो पुरुष या दोघांच्याही खात्याचे प्रमुख त्या कमिटीत असावेत व स्त्रियांनी या कमिटीकडे आपली तक्रार मांडावी. या मंचापुढे जेव्हा एखादी महिला आपल्या शोषणाबद्दल लेखी तक्रार करेल, तेव्हा समितीचे सदस्य तिची तक्रार व दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतील. सर्व रेकॉर्ड्स तपासतील. याद्वारे सत्यशोधनाचा प्रयत्न करतील व दोषी ठरलेल्या कर्मचाऱ्याची पगारवाढ थांबवणे किंवा त्याची शिक्षा तत्त्वावर बदली करणे, अशा प्रकारच्या शिक्षा देऊन प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतील. येथेही महिलेला न्याय न मिळाल्यास ती 'राज्य महिला आयोग' किंवा न्यायालयात दाद मागू शकेल.

जर एखाद्या नोकरदार महिलेने बाहेरील व्यक्तीविरुद्ध कामकाजाच्या ठिकाणी लैंगिक छळवणुकीची तक्रार केली, तर अशा व्यक्तीविरुद्ध जरूर ती सर्व कायदेशीर कारवाई करण्याची व पीडित महिलेस सर्व मदत करण्याची जबाबदारी ही मालकांवर वा अधिकाऱ्यांवर राहील.

केंद्र व राज्य सरकारने याबाबतीत योग्य ते कायदे व उपाययोजना कराव्यात.

पुढे कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा लैंगिक छळ (प्रतिबंध व निवारण) हे विधेयक संसदेने २०१२ मध्ये मंजूर केले आणि या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले

प्रबोधनाच्या स्तरावर फक्त राजस्थानच मागासलेलं आहे असं नाही. उत्तरेतील बहुतेक राज्यात हीच परिस्थिती आहे. यातल्या अनेक ठिकाणी जातपंचायती, गावकी आणि तत्सम संस्थांची समांतर न्यायव्यवस्था चालते. ही सहसा तिथल्या जाती-व्यवस्थेची आरसा प्रतिमा असते आणि दहशत निर्माण व्हावी म्हणून अत्यंत क्रूर पद्धतीने ती चालवली जाते. या जातपंचायती, गावकी आणि तत्सम संस्थांचे कायमचे उच्चाटन करण्यासाठी सामाजिक बहिष्कारापासून व्यक्तींचे संरक्षण (प्रतिबंध, बंदी व निवारण) अधिनियम २०१६; हा कायदा देशात पहिल्यांदा लागू करून महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असल्याचा भास होत असला तरी महाराष्ट्रातही अनेक गावात जातपंचायती, गावकी यांची अजूनही दहशत आहे. त्यांच्या न्याय देण्याच्या पद्धतीत बहुतेक वेळा कुठल्या तरी भँवरीदेवी सारख्या स्त्रीला शारीरिक आणि मानसिक अत्याचाराला न्यायाच्या नावाखाली सामोरे जावे लागते.

स्वतंत्र भारतातलं प्रत्येक दशक हे कुठल्या-ना-कुठल्या

अस्वस्थतेचं आणि वेगवान राजकीय घडामोडींचं होतं. अनेक भाषा, धर्म, जाती; पराकोटीची आर्थिक, राजकीय, सामाजिक विषमता; लोकसंख्येचा स्फोट आणि साधनांची सीमित उपलब्धता; यामुळे या प्रचंड लोकसंख्येच्या लोकशाहीत, होणाऱ्या विकासात, जास्तीत जास्त वाटा आपल्याला मिळावा आणि कमीत कमी कर्तव्य करायला लागावीत यासाठी प्रत्येकजण कार्यरत असतो. त्यासाठी कधी जात, कधी धर्म, कधी भाषा तर कधी प्रदेश अशा वेगवेगळ्या आधारावर एकत्र येत तो दबावगट बनवून आपले इप्सित साध्य करण्याच्या प्रयत्नात असतो. कुठल्या-ना-कुठल्या अस्वस्थतेचं हे मूळ कारण! एकोणीसशे सत्तरचं दशकही एक असंच, अस्वस्थ आणि वेगवान राजकीय, सामाजिक घडामोडीचं दशक - देशासाठी आणि महाराष्ट्रासाठी! एकाहत्तरचे बांगलादेश युद्ध, दुष्काळ, तेल किमतीचा भडका, महागाई, भ्रष्टाचार, जेपी आंदोलन, आणीबाणी, इंदिरा गांधींचा ऐतिहासिक पराभव, जनता पक्ष आणि इंदिरा गांधींचे दणक्यात पुनरागमन - हे सगळं देशपातळीवर एकीकडे, तर राज्याच्या पातळीवर युक्रांद, दलित पँथर, स्त्री-मुक्ती चळवळ अशा अनेक प्रकारे सामाजिक विषमतेला चळवळींच्या स्वरूपात मिळणारी आव्हाने दुसरीकडे.

साठच्या दशकात जगभरात उसळलेल्या बदलांच्या लाटेत अमेरिकेत स्त्रीमुक्तीचा अजेन्डा प्रभावीपणे पुढे यावा म्हणून 'ब्रा बर्निंग' ('कंचुकी दहना') सारखे, भयंकर वाटणारे कार्यक्रम जाहीरपणे झाले. यातून स्त्री मुक्ती म्हणजे उच्चभ्रू आणि उच्छुंखल स्त्रियांची लैंगिक स्वातंत्र्यासाठीचा (स्वैराचार) चळवळ अशी धारणा झाली. या निमित्तानं 'स्त्री देहा'ची चर्चा केंद्रस्थानी आली. दुसरीकडे अकादमिक / विद्यापीठीय स्तरावर सिमॉन द बोव्हाचं 'सेकंड सेक्स', एकोणसत्तरच्या बोस्टनमधील स्त्री-परिषदेतून निर्माण झालेलं 'अवर बॉडी अवर सेल्व्ह'; 'बेट्टी फ्रिडन'चे 'फेमिनाईन मिस्टिक', 'केट मिल्लेट'चं 'सेक्शुअल पॉलिटिक्स', 'जर्मन ग्रीर'चं 'द फिमेल यूनक' याचा प्रभाव होताच. पण या सगळ्याला रचनात्मक टोक आलं ते १९७५ हे वर्ष 'जागतिक महिला वर्ष' म्हणून जाहीर झालं आणि साजरं झालं या घटनेमुळे. त्याचा प्रभाव जगभर आणि आपल्याकडेही पडला. स्त्री मुक्ती संघटना, क्रांतिकारी महिला संघटना, नारी समता मंच, स्त्री आधार केंद्र, सर्वहारा महिला संघटना, मोलकरीण संघटना अशा अनेक मार्गांनी स्त्री-शिक्षण, आरोग्य, स्त्री-भ्रूणहत्या, स्त्री-हक्क इत्यादींवर प्रबोधन सुरू होतं. रेल्वे/ बस स्थानकात अकारण धक्के मारणारे, अनावश्यक स्पर्श करणारे पुरुष सहन करण्याचे दुर्दैव जवळपास प्रत्येक महिलेच्या वाट्यास आलेले असते. अशा रोजच्या व्यवहारातील अन्यायाशी या चळवळींनी जोडून घेतलं. 'अरे, तू काय दिवे लावलेस की तुझ्या वंशाला दिवाच हवा?' यातला विनोद सोडला तरी - वंशाला दिवा कल्पनेला आव्हान मिळाले. स्त्रियांनी 'चूल आणि मूल' या चक्रातून बाहेर यावं; गृहिणी म्हणून दिवसभर करत असलेल्या कष्टांना अधिकृत कामाचा दर्जा मिळावा, सिनेमा, जाहिराती यामधलं 'स्त्री'च्या होत असलेल्या वस्तुकरणाला विरोध असे तात्त्विक आयमही ह्या चळवळींत अंतर्भूत होते. मुख्य म्हणजे स्त्रीमुक्ती चळवळ ही पुरुषांच्या विरोधातील चळवळ नसून स्त्रीपुरुष दोघांची आहे, हा विचार मूलभूत होता. असं वस्ती पातळीवर प्रत्यक्ष काम आणि दुसऱ्या बाजूला अकादमिक/विद्यापीठीय देशी-परदेशी संशोधन प्रकल्पांतर्गत त्याची वैचारिक मांडणी अशी दोन स्तरावर स्त्री-मुक्ती चळवळीची बीजं अंकुरत होती.

'ना (शहा)बानो होती, ना मंडल होता; ना कमंडल होता!' १९८६, ८७ नंतर घडलेल्या राजकीय घटनांवर ही वाजपेयींची मार्मिक प्रतिक्रिया. शाहबानो प्रकरणात राजीव गांधींनी केवळ मतांच्या राजकारणासाठी जो प्रतिगामी निर्णय घेतला तो तसा घेतला नसता तर राजीव गांधींचा पराभव कदाचित झाला नसता, व्ही पी सिंग निवडून आले नसते, मंडल नसतं आणि मंडल नसतं तर कमंडल म्हणजे अडवाणींची रथ-यात्रा आणि राम-जन्मभूमीची चळवळही झाली नसती आणि देशाच्या राजकारणाला हे वेगळं वळण लागलं नसतं. वाजपेयींची पोलिटिकल असेसमेन्ट काहीही असो पण याच काळात बहुतेक राजकीय पक्षांनी फक्त निवडणुका जिंकणे या एकाच ध्येयावर लक्ष केंद्रित करायला सुरुवात केली. आणीबाणीत नसबंदीवरून झालेल्या असंतोषानंतर राजकीय पक्षांनी लोकसंख्येवर प्रबोधनच काय, काहीही भाष्य करणंच बंद केलं. कितीही प्रमाणात प्रजनन करणं हा लोकांचा हक्क आहे आणि त्या सर्वांना अन्न-वस्त्र-निवारा पुरवणे हे सरकारचे आदिम कर्तव्य आहे यावर सर्व राजकीय पक्षांचं आणि विचारवंतांचं आता एकमत आहे. त्याच्या पुढच्या टप्प्यावर राजकीय पक्षांनी स्त्री-मुक्तीसारख्या प्रबोधनाच्या सर्व कामातून स्वतः ला पूर्णपणे मुक्त करून घेतलं. स्त्री-मुक्ती चळवळीला असलेलं राजकीय अधिष्ठान संपलं. ९०च्या दशकातील जागतिकीकरण आणि खुल्या अर्थव्यवस्थेचा रेटा यामुळे आलेल्या बदलाची गती संभ्रमित करणारी होती. सामाजिक, वैयक्तिक पातळीवरही जगण्याचे संदर्भ बदलले समाजापेक्षा वैयक्तिक उत्कर्षाकडे केंद्रबिंदू सरकला. बॉलिवूडमध्ये व्यवस्थेविरुद्ध लढणाऱ्या अमिताभचे दिवस संपून व्यवस्थेतून येनकेनप्रकारे मार्ग काढून व्यक्तिगत उत्कर्ष साधणाऱ्या शाहरुखचे दिवस आले. साहित्यातही याच काळापासून तरुणांना प्रेरणादायी (मोटिव्हेशनल) उपक्रमाअंतर्गत प्रत्यक्षात व्यक्तिगत कर्तृत्वाच्या, उत्कर्षाच्या कथा, आत्मकथा, यांचा ट्रेंड चालू झाला. तोच ट्रेंड अजूनही छोट्या-मोठ्या व्हाट्सअप पोस्टमध्येही दिसतो. याच काळात स्त्री-मुक्ती चळवळीचं केंद्र एनजीओ -अशासकीय संघटनांकडे सरकलं. आर्थिक स्थैर्य, निधी, करियर असे बदल होत यातली उत्स्फूर्तता कमी होऊ लागली. याच काळात बहुतेक चळवळींत आणि पत्रकारितेसकट बहुतेक माध्यमक्षेत्रात 'मिशन ते प्रोफेशन' असा प्रवास सुरू झाला. माध्यमांतील स्त्रियांचा सहभाग आणि कामाच्या वेळा, जागा आणि पद्धती बॉलिवूडशी स्पर्धा करू लागल्या.

हे सर्व विस्ताराने सांगण्याचे कारण म्हणजे सध्याची महानगरं, उच्चभ्रू आणि एलिट वर्गापुरती सीमित असणारी MeToo ही चळवळ! एके-काळी स्त्रियांना कुठल्याही अगदी मूलभूत

शिक्षणाचासुद्धा अधिकार नव्हता. उलट बालविवाह, सतीप्रथा, केशवपन अशा अमानवी प्रथा संस्कृतीगौरवासह मिरवल्या जात होत्या. तेव्हा राजा राममोहन रॉय, फुले, आंबेडकर, कर्वे अशांपासून अनेकांनी जे काम केलं, सोसलं ते आणि वर उल्लेख केलेल्या गेल्या चार-पाच दशकातील घटना असा मोठा आणि रुंद इतिहास आहे. खरंतर बॉलिवूड आणि प्रसारमाध्यमांपुरती सीमित असणारी ही MeToo चळवळ आणि ती दुरून पाहणारे आपण यांना कदाचित ही जाणीव नसेल आणि नसेल तर हा संदर्भ आणि इतिहास जाणून घेतला पाहिजे. सोशल मीडिया वरून चळवळी चालण्याच्या या जमान्यात सिम्बॉलिझम म्हणजे प्रतिकात्मकतेला असाधारण महत्त्व प्राप्त होतं. कोर्पोरेट्समधल्या 'हेड्स मस्ट रोल' या सिम्पलीस्टीक तत्त्वाला धरून कोणालातरी राजीनामा द्यावा लागला आणि कोणीतरी तुरुंगात गेलं की चळवळीचं उद्दिष्ट साध्य झालं म्हणत जल्लोष साजरा करणं या पार्श्वभूमीवर, आपल्यापासूनच ही चळवळ चालू झाली आणि आपणच त्याची यशस्वी सांगता केली हा भ्रम नको.

अशले जूड हिने ऑक्टोबर २०१७ साली निर्माता हार्वे वाइनस्टाइन याच्याविरोधात तक्रार केली. त्यापाठोपाठ ट्विटर संकेत स्थळावर जरी आलीस मिलानो हिने मीटू (MeToo))चा वापर प्रचलित केला, पण २००६ मध्ये सामाजिक कार्यकर्त्या तराना ब्रुक यांनी हा शब्द पहिल्यांदा वापरला. १९९७ साली एका तेरा वर्षाच्या लैंगिक शोषणाची शिकार बनलेल्या मुलीशी त्या बोलत होत्या. तिला कसा प्रतिसाद द्यावा हेच मला सुचत नव्हते. 'मी सुद्धा' अशा अत्याचाराची शिकार आहे हे सुद्धा मी तिला सांगू शकले नाही. लैंगिक छळाला बळी पडलेल्या स्त्रियांना सहानुभूतीच्या पलीकडे जाऊन (एम्पथी) आधार देण्यासाठी त्यांनी 'मी टू' ही संकल्पना आणली, तर १५ ऑक्टोबर २०१७ रोजी अमेरिकी अभिनेत्री अलिसा मिलानोने या संकल्पनेचा वापर करून ट्विटरमार्फत आवाहन केले की, लैंगिक छळाला बळी पडलेल्यांनी 'मी टू' हा हॅशटॅग स्टेटस म्हणून ठेवावा आणि आपले वैयक्तिक अनुभव मांडावेत, जेणेकरून या समस्येची व्याप्ती आणि गांभीर्य सर्वांच्या लक्षात येईल. हालिवूडमधील चित्रपट निर्माता हार्वे वाइनस्टाइन यांच्या विरोधात लैंगिक छळाच्या अनेक तक्रारी आल्यानंतर अलिसाने हा हॅशटॅग तयार केला. 'मी टू' हॅशटॅग मोहिमेला सोशल मीडियावर प्रचंड प्रतिसाद मिळाला. मनोरंजन, क्रीडा, राजकारण, वैद्यक, आर्थिक, उद्योग यांपासून ते अगदी लष्कर आणि धार्मिक स्थळांपर्यंत सर्व ठिकाणी लैंगिक छळाचा सामना करावा लागला, असे स्त्रियांनी सोशल मीडियावरून नमूद केले. 'मी टू' ही चळवळ अमेरिकेतून सुरू झाली असली तरी खरे तर तिला भौगोलिक सीमा अशा नाहीतच, कारण ती सोशल मीडियामार्फत चालवली जाणारी ऑनलाइन चळवळ आहे. या चळवळीचे लोण अल्पावधीत जगभर पसरले. लैंगिक छळाची समस्या जगाच्या कानाकोपऱ्यात कशी सारख्याच तीव्रतेने अस्तित्वात आहे, याचे पुरावे देणाऱ्या पोस्ट्स जगभरातून पडू लागल्या. किमान ८५ देशांमध्ये हा हॅशटॅग ट्रेड इन आहे.

आपल्याकडे सुरवात झाली ती अमेरिकेहून परत आलेल्या अभिनेत्री तनुश्री दत्ता हिने अभिनेते नाना पाटेकर यांच्यावर केलेल्या लैंगिक गैरवर्तनाच्या आरोपांनी. अभिनेत्री तनुश्री दत्ता हिने 'हॉर्न ओके प्लीज' या चित्रपटाच्या सेटवर संबंधितांकडून लैंगिक छळाची तक्रार करून आपल्यावर दहा वर्षांपूर्वी झालेल्या अन्यायाला वाचा फोडली. तेव्हा सगळ्यांना धक्का बसला. नंतर बॉलिवूड आणि प्रसारमाध्यमांतील अनेक महिला आपल्यावर झालेल्या अन्यायाची व्यथा समाजमाध्यमांवर मांडत आहेत. 'तारा' मालिकेत मुख्य भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री नवनीत निशान यांनी अभिनेते आलोक नाथ यांच्यावर आरोप केले. संहिता-लेखिका दिग्दर्शिका विनता नंदा यांनी फेसबुक पोस्ट लिहून ज्येष्ठ अभिनेते आलोक नाथ यांच्यावर अप्रत्यक्ष बलात्काराचा आरोप केला आहे. अभिनेता-दिग्दर्शक रजत कपूर यांच्यावरही गैरवर्तनाचे आरोप झाले होते. त्यांनी याप्रकरणी समाजमाध्यमांचा आधार घेत माफी मागितली आहे. त्यानंतर 'स्त्री' चित्रपटातील अभिनेत्री फ्लोरा सैनी हिनेही निर्माते गौरांग दोशी यांच्यावर मारहाणीचा आरोप करून त्यांनी अनेक महिलांचे आयुष्य उद्ध्वस्त केले, असे म्हटले आहे. 'क्वीन' चित्रपटातील कंगनाची सहकलाकार नयनी हिने निर्माते विकास बहल यांच्यावर लैंगिक गैरवर्तणुकीचा आरोप करत कंगनाच्या म्हणण्याला दुजोरा दिला. कैलाश खेर, पियुष मिश्रा, सुभाष घई यांच्यासारख्यावर आरोप झाले. बॉलिवुडमधले हे प्रकार समोर येत असतानाच महिला पत्रकारांनीही त्यांच्यावर झालेल्या अन्यायांना वाचा फोडण्यास सुरुवात केली. पत्रकार संध्या मेननने बी. जी. कोळसे पाटील, लेखक किरण नगरकर आणि सुप्रसिद्ध फोटोग्राफर पाब्लो बार्थलोम्यू या तिघांनी कशाप्रकारे शोषण केले ते समोर आणले. मोदी सरकारमधले परराष्ट्र राज्यमंत्री एम. जे. अकबर यांच्याबरोबर काम केलेल्या अनेक महिला पत्रकारांनी त्यांच्यावर लैंगिक शोषणाचा आरोप लावला. अखेर त्यांना राजीनामा द्यावा लागला.

लैंगिक शोषणाबद्दल कायदा स्पष्ट आहे. इंडियन पिनल कोडच्या कलम ३५४अ नुसार या गुन्ह्यावर कारवाई होते. कलम ५०९मध्ये कामाच्या जागी होणाऱ्या लैंगिक छळणुकीचा समावेश आहे. यामध्ये महिलेच्या इच्छेविरुद्ध तिला स्पर्श करणं, अश्लील शेरे मारणं, असे मॅसेज पाठवणं, तिला आक्षेपार्ह साहित्य तिच्या मर्जीविरुद्ध दाखवणे वगैरे गोष्टी वर्ज्य मानल्या आहेत. म्हणजे स्त्रीची सहमती नसेल तर पुरुषानं मर्यादेत रहायला हवं. उच्चभ्रू वर्गाच्या पार्श्वभूमीवर चित्रित केलेल्या 'पिंक' सिनेमाची रचनाच आणि संदेश असा होता की समोर मेनका आली तरी विश्वामित्राने आपला संयम सोडता कामा नये. त्यातील थोडी अतिशयोक्ती सोडली तरी या सिनेमात अमिताभ म्हणतो, 'नो मिन्स नो.' पुरुषांनी हे कायम लक्षात ठेवायला हवं. विशेष म्हणजे, गाजलेल्या विशाखा खटल्यानंतर हा कायदा मजबूत झाला. लैंगिक शोषणाच्या विरोधात सर्व कार्यालयात विशाखा समित्या हव्यात असं बंधन आलं. अलीकडेच या कायद्यात सुधारणा करण्यात आली. पण आज एवढी वर्षं उलटली तरी बहुतेक

व्यवस्थापनं हा कायदा पाळताना दिसत नाहीत. असंघटित क्षेत्रात तर ही फार दूरची गोष्ट.

या बहुतेक MeToo स्त्रिया शहरी, आधुनिक उच्च वर्गातून आलेल्या आहेत. त्यामुळे ज्येष्ठ समाजसेविका सिंधुताई सपकाळ सकट अनेकांनी अत्याचार झाल्यानंतर इतक्या वर्षांनी का? हा विलंबाचा प्रश्न उपस्थित केला. खरे तर २०१३च्या नोव्हेंबर महिन्यात तरुण तेजपाल यांना एका महिला सहकार्याचा (तिनं धाडसानं पुढे येऊन केलेल्या तक्रारीच्या आधारे) लैंगिक छळ केल्याच्या आरोपावरून अटक झाली. हे प्रकरण गाजलं होतं. पण तेव्हाही नवल म्हणजे या स्त्रिया पुढे आल्या नाहीत. जणू काही अमेरिकेहून MeTooचे संकेत येण्याची त्या वाट बघत होत्या. याला समाधानकारक उत्तर मिळू शकले नाही. बहुतेकांनी त्या व्यवस्थेचा फायदा होत होता तोपर्यंत मौन पाळलं आणि आता त्या व्यवस्थेतून त्यांना मिळण्यासारखं काही राहिलं नाही हे पाहून अचानक क्रांतीचा आव आणला असा आरोप झाल्यास आश्चर्य वाटायला नको. असा एक आशावाद होता की ही चळवळ सध्या देशातली महानगरं, उच्चभ्रू वर्ग यांपुरती सीमित आहे. तरीही एकदा धीर चेपला की, ही चळवळ छोटी शहरं आणि खेड्यांत पोहोचायला वेळ लागणार नाही. मुळात, स्त्री मुक्तीची चळवळ पहिल्यांदा सुरू झाली, तेव्हा ती शहरी उच्च वर्गातूनच खाली सरकली, प्रगत देशातून आपल्याकडे आली अशीही मांडणी करण्यात आली! पण स्त्री मुक्तीची चळवळीची वैचारिक बैठक आणि अनेक स्तरावर काम करण्याची तयारी नसल्यामुळे ते फोल ठरलं. माध्यमासाठी ब्रेकिंग न्यूज हे एक खेळणं असतं. लहान मूल एक खेळणं टाकून दुसरीकडे वळतं तसं MeTooला ज्या वेगाने माध्यमानी वरवरची प्रसिद्धी दिली, त्याच वेगाने MeTooला बाजूला सारून ती आता पुढच्या खेळण्याकडे वळली आहेत. त्यामुळे या MeTooला काही वैचारिक खोली होती की थोडी सहानुभूती आणि औट घटकेची प्रसिद्धी एवढीच मानसिक गरज होती? असा प्रश्न पडतोय. भारतातल्या आघाडीच्या पत्रकार-लेखिका मेघना पंत यांनी या चळवळीचे वर्णन 'चहा मस्त उकळावा, पण नंतर पिण्यास विसरून जावे' अशा शब्दांत केले. भौगोलिक सीमा पुसणे ही समाजमाध्यमांची सर्वात मोठी ताकद. या साधनाची सहज उपलब्धता हे या 'मी टू' मोहिमेचे वेगळेपण. बलस्थान आणि दुर्दैवाने मर्यादादेखील!

रामायण-महाभारताच्या अनेक आवृत्त्यांमधल्या या काही प्रचलित कथा पहा. अहिल्येच्या सौंदर्यानं भुललेला इंद्र तिचे पती गौतम ऋषीचं रूप घेऊन आला आणि त्यांच्या अनुपस्थितीमध्ये अहिल्येबरोबर रत झाला. घरी परतल्यावर ऋषींना प्रकार कळला. क्रोधित होऊन त्यांनी अहिल्येला शाप दिला- 'तू शिळा होशील'. रडून माफी मागणाऱ्या अहिल्येला 'रामाच्या स्पर्शानं तू पुन्हा स्त्री होशील' असा उ:शाप मिळाला. रावणानं फसवून सीतेला पळवून नेलं, पण तो सीतेला स्पर्श करू शकला नाही (किंवा त्यानं केला नाही). रामानं सीतेची सुटका केली. अयोध्येला परतल्यावर एका धोब्याच्या शंकेचं निरसन करण्यासाठी, आपलं पावित्र्य सिद्ध करण्यासाठी सीतेनं अग्निपरीक्षा दिली (किंवा तिला द्यावी लागली). द्यूतात सर्व काही हरलेल्या पांडवांनी द्रौपदीलाही पणास लावलं. मासिक धर्म म्हणून आतल्या महालात बसलेल्या द्रौपदीला दु:शासनानं केस धरून ओढत आणलं, अपशब्द आणि कुत्सित हास्याच्या माऱ्यासोबत भर दरबारात तिचं वस्त्र फेडलं गेलं. आपल्या मांडीकडे निर्देश करून 'तुझी जागा इथं आहे' असं दुर्योधनानं चिथावलं, तर कौरवांनी हसून तिची विटंबना केली. संतापानं उद्रेक झालेल्या द्रौपदीनं पांडवांना, भीष्म-द्रोणांना खडे बोल सुनावले. कथांमधील अत्याचार करणारे आणि बघणारे सर्व पुरुष हे राजे, ऋषी किंवा वयस्कर होते. म्हणजे समाजात बडे प्रस्थ असलेले. मुळात पुरुषसत्ताक पद्धतीमध्ये स्त्रीवर अधिकार पुरुषाचा, त्यातून त्या पुरुषांचा सामाजिक अधिकारही मोठा. अत्याचार सहन करणाऱ्या व्यक्तीचं तोंड अदृश्यपणे दाबलं जाणारच.


अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने लैंगिक व्यभिचार हा गुन्हा न ठरवण्याबाबत निकाल दिला त्यावरही अशाच बाष्कळ प्रतिक्रिया उमटल्या. तो निकाल म्हणजे जणू स्वैराचारास मुभा अशा पद्धतीने त्यावर भाष्य झाले, पण हे आदिम काळापासून चालत आलं आहे. तेव्हा कोणाला तरी शिक्षा आणि जरब याच्या पलीकडे जाऊन, एक पाऊल मागे घेऊन त्रयस्थपणे या पुरुषाच्या (आणि कदाचित स्त्रियांच्या सुद्धा) आदिम प्रेरणेकडे (बेसिक इन्स्टिंक्ट) बघता येईल का? माणसाच्या मनात खोल दडलेल्या या अज्ञात प्रदेशात फिरण्याचा मोह बहुतेक सगळ्या सर्जनशील व्यक्तींना होतोच. त्यांच्या अभिव्यक्तीत आणि व्यक्तिगत जीवनातही तो उतरतो. २१व्या शतकातील बदलत्या व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या कल्पना आणि वाढत्या आकांक्षा (फ्रीडम अँड ॲस्पिरेशन्स) यांनी ही पूर्वापार चालत आलेली विवाह संस्था, स्त्री-पुरुष संबंध यांना परत आव्हान मिळू लागले आहे. तेव्हा धर्म बुडाला म्हणून अरण्यरुदन करण्यापेक्षा विवाहसंस्थेची आणि स्त्री-पुरुष संबंध नव्याने विचार आणि व्यवहार्य मांडणी करण्याची गरज आहे. नाहीतर शिवाजी मंदिरात चार-चौघी आणि त्याच्याचसमोर प्लाझाला 'माहेरची साडी' दोन्हीकडे एकाच वेळी गर्दी करणाऱ्या या समाजातला हा अंतर्विरोध आणि विसंगती ही अशीच चालू राहणार!

**- धनंजय गांगल**

भ्रमणध्वनी : ९८२१०३२८३०
dhananjay.gangal@gmail.com

# अमेरिकेतील एक ज्ञानगंगा

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**



जगविख्यात M.I.T.

**प**रवा म्हणजे ऑगस्ट, २०१८ च्या शेवटी मला बोस्टन-मधल्या सेंट चार्ल्स नदीवर जलविहार करण्याचा योग आला. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात उन्हाळ्याची सुटी संपून विद्यापीठं उघडतात. या फक्त ८० मैल लांबीच्या व ईशान्य दिशेने वाहून अटलांटिक समुद्रात विसर्जित होणाऱ्या सरितेच्या दोन्ही काठांवर जगप्रसिद्ध विद्यामंदिरं उभी असलेली बघून माझं कुतूहल जागृत झालं. आपल्या गंगेच्या पाण्यात जेवढं पुण्य तेवढी या नदीच्या जलप्रवाहात विद्या असावी. बोस्टनमध्ये ३५ महाविद्यालयं आणि विद्यापीठं. तिथे दरवर्षी एकूण दीड लाख विद्यार्थी अभ्यास करतात म्हणून आपण पुणे जसं विद्येचं माहेरघर समजतो तसं बोस्टन समजण्यात येतं. सेंट चार्ल्स नदीवर विहार करताना अनेक जगप्रसिद्ध विद्यापीठांचं दर्शन झालं.

या नदीच्या पूर्वेला केंब्रिज नावाचं शहर तर पश्चिमेला बोस्टन. आपण सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात इथे चुकूनही भेट देऊ नये. त्यावेळी नवीन सत्र सुरू होत असल्यामुळे विद्यार्थ्यांची, त्यांच्या वाहनांची आणि पारा वर चढलेल्या लोकांची तोबा गर्दी. सगळे विद्यार्थी पुस्तकं, फर्निचर व कपड्यांनी भरलेल्या गाड्या घेऊन रस्त्यावर गर्दी करतात. वाहन उभं करण्यास कुठे जागा मिळत नाही म्हणून आरडाओरड सुरू होते. अशा वेळी एवढ्या जगप्रसिद्ध शिक्षणसंस्थेत प्रवेश मिळाल्याचा आनंद मावळतो. वर उफाळून येतो तो दुर्वास ऋषी. पण वर्ग सुरू झाले की एक-दोन दिवसात सर्व शांत होऊन जीवनाला स्थिरता आणि ध्येयाला दिशा लाभते.

आमची बोट बंदरातून ईशान्य दिशेनं प्रवास करू लागली आणि पश्चिम किनाऱ्यावर वसलेल्या पहिल्या संस्थेचं दर्शन झालं. मॅसॅच्युचेट जनरल हॉस्पिटल १००० हून अधिक खाटांचं रुग्णालय. ते एवढं मोठं आहे की बोस्टनमध्ये त्यामुळे जो ज्ञानानुभव मिळाला तो अविस्मरणीय होता. सर्वाधिक म्हणजे २५,००० कर्मचारी इथे काम करतात. त्याचं उत्पन्न अब्जावधी डॉलर असून उपचारासाठी जगभरातून रुग्ण इथे येतात. हे रुग्णालय हार्वर्ड युनिव्हर्सिटीच्या वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न असून तिथे निवासी डॉक्टर म्हणून जागा मिळणं वैकुंठाला जाण्यासारखं समजतात. हे रुग्णालय नुसते उपचार करत नाहीत तर अव्वल दर्जाचं वैद्यकीय संशोधनही करतं. त्यासाठी त्याला आतापावेतो एकूण १३ नोबेल मिळाले. यातला महत्त्वाचा एक शोध म्हणजे १८००च्या शतकात जाग्या, शुद्धीवर असलेल्या रुग्णावर शस्त्रक्रिया केली जाई. त्यावेळी तो हंबरडा फोडी. म्हणून त्याचे तोंडात बोळे कोंबून त्याला खाटेला दोरानं घट्ट बांधून ठेवण्यात येई. १८४६ साली इथर (ether) नावाच्या पहिल्या भूलरसायनाचा शोध लागला आणि हे क्रौर्य कायमचं इतिहासजमा झालं. आता भूलशास्त्र बरंच विकसित झालं आहे. १९६२ मध्ये तुटलेल्या पायाचं पुनर्रोपण पहिल्यांदा या दवाखान्यात करण्यात आलं. असा लौकिक इतिहास असलेलं दुसरं रुग्णालय अमेरिकेत नाही. महत्त्वाचं म्हणजे ही वैद्यकीय संस्था खाजगी आहे.

या रुग्णालयाच्या शेजारीच जगातलं अतिप्रतिष्ठित नेत्र रुग्णालय आहे. त्याची स्थापना १८२४ मध्ये दोन डॉक्टरांनी केली. ते पुन्हा हार्वर्ड विद्यापीठाशी संलग्न असून इथे दरवर्षी एकूण ११० निवासी डॉक्टरांना प्रशिक्षण मिळतं. डोळ्यांचे, कानाचे व घशाचे

असाध्य रोग घेऊन लोक इथे उपचारांसाठी येतात. हे रुग्णालयही खाजगी आहे.

पूर्व किनाऱ्यावर लवकरच ताजमहालसारखा गोलाकार घुमट (Dome) असलेली भव्य इमारत दिसली. तिच्यासमोरचं भव्य अंगण व भलेमोठे उंच स्तंभ भारदस्तेत भर घालत होते. ही जगप्रसिद्ध M.I.T. आपल्या I.I.T.s. याच धर्तीवर उभारलेल्या. पण दोन संस्थांमध्ये एक मोठा फरक आहे. M.I.T. मध्ये अभियांत्रिकी व तंत्रज्ञानाबरोबर मानव्य विद्येचे विषय शिकवल्या जातात– साहित्य, जैवशास्त्र, अर्थशास्त्र, भाषाशास्त्र यासारख्या विषयांची सांगड घातल्यामुळे इथल्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची सर्वांगानं वाढ झालेली असते तर आपले विद्यार्थी या बाबतीत एक पैलू ठोकळे बनतात अशी टीका केली जाते. पण यात आता हळूहळू बदल होत आहे. मी काही वर्षांपूर्वी मद्रास I.I.T.मध्ये भाषण करण्यास गेले तेव्हा त्यांच्या संचालकांनी अभ्यासक्रमात हा बदल करण्यास सुरुवात केली होती. परंतु आपल्या I.I.T. स्वायत्त समजल्या जात असल्या तरी सरकारच्या मर्जीनुसार चालतात. याउलट M.I.T. खाजगी असून खास संचालक मंडळ ती चालवते. राज्याच्या गव्हर्नरला सभासदाची जागा मिळते. पण त्याला मतदानाचा हक्क नाही. त्यामुळे भारताप्रमाणे इथल्या शिक्षणात राजकीय लुडबुड होत नाही हे महत्त्वाचं.

अलिबाबाच्या गुहेत काय असतं हे जाणण्याचं कुतूहल जसं आपल्याला असतं तसं त्या डोमखाली कुठलं रहस्य लपलं आहे हे जाणून घेण्यास मी उत्सुक होतो. पूर्वीच्या भेटीत मी आत गेलो नाही. पण आजची संधी हुकू दिली नाही. दारातून आत गेलो तर काही विशेष दिसलं नाही. तो डोम बघण्यास पाचव्या मजल्यावर जावं लागलं आणि आतली ७५ फूट उंचीची व तेवढ्याच व्यासाची भव्य जागा बघून आ वासला. याला रोटंडा म्हणतात. तो M.I.T. च्या अभियांत्रिकी ग्रंथालयाचा भाग. पण देवळात गेल्यावर देव दिसू नये अशी माझी स्थिती झाली. तिथे कुठेच पुस्तकं दिसली नाही. दिसली ती टेबलं आणि गुबगुबीत खुर्च्या. ते वाचनालय होतं. पुस्तकं कुठे आहेत म्हणून विचारल्यावर तिथल्या ग्रंथपालानं ते सहाव्या मजल्यावर आहेत अशी ग्वाही दिली. या रोटंडाच्या शेंड्यावर काचेचं झाकण आहे. तिथून आत प्रकाश शिरतो. पण दुसऱ्या महायुद्धात ते विमानदृश्याचं लक्ष्य होऊ नये म्हणून काळ्या आच्छादनानं झाकून ठेवण्यात आलं होतं. तिथे एका टेबलावर नवीन पुस्तकं ठेवली होती. त्यातली बरीचशी M.I.T.च्या प्राध्यापकांनी लिहिलेली. त्यांची शीर्षकं वाचण्याचा मी प्रयत्न केला आणि भूलरसायनाचा शोध लागण्यापूर्वी शुद्धीवर असलेल्या माणसाला शल्यक्रिया करताना जर वाटत होतं तशी माझी स्थिती झाली.

M.I.T. ची स्थापना १८६१ मध्ये झाली. त्यावेळी अमेरिका युरोपच्या मागे होती. तिथल्या कौशल्यशाळेची (Polytechnic) संकल्पना अमेरिकेनं आयात केली आणि M.I.T. स्थापन करण्यात आली. आज ती जगाच्या पुढे आहे. वॉल स्ट्रीट जर्नलनं नुकत्याच केलेल्या क्रमवारीत अमेरिकन शिक्षणसंस्थांमध्ये M.I.T. चा दुसरा नंबर लागतो. तिथे फक्त १२,००० विद्यार्थी. त्यातले ६८०० पदव्युत्तर शिक्षणासाठी तर उरलेले पदवीसाठी. आजपावेतो या संस्थेला ९१ नोबेल मिळाले आणि आपल्या I.I.T. ना? शून्य लिहिताना धन्य वाटत नाही. माजी विद्यार्थी आपल्या मायसंस्थेला नेहमी देणग्या देण्याची अमेरिकेत पद्धत आहे. या संस्थेचं देणगीसंचित (endowment) १५ अब्ज डॉलर आहे. या गुंतवणुकीवर मिळणारा परतावा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यास व इतर कारणांसाठी वापरण्यात येतो. ही गंगाजळी शिक्षणसंस्था यशस्वी विद्यार्थी निर्माण करण्यास किती यशस्वी झाली याचं प्रतीकच समजायला पाहिजे.

जवळच M.I.T. चा स्लोन केटरींग मॅनेजमेंट स्कूलची भव्य वास्तू आहे. इथला MBA चा अभ्यासक्रम उत्कृष्ट प्रकारचा समजण्यात येतो. याची सुरुवात १९१४ मध्ये एक विभाग म्हणून झाली. त्यांचा एक प्रसिद्ध विद्यार्थी म्हणजे आल्फ्रेड स्लोन. तो पुढे जनरल मोटार्स या तत्कालीन जगात मोठ्या असलेल्या वाहन कंपनीचा मुख्य झाला. त्याला आपली कंपनी चालवण्यासाठी नवीन विचारांच्या व नेतृत्वगुण असलेल्या अधिकाऱ्यांची जरुरी होती. म्हणून त्यानं १९३८ मध्ये M.I.T. ला मोठी देणगी देऊन MBAचा अभ्यासक्रम सुरू केला. या विभागाचं महाविद्यालयात रूपांतर करून त्याला देणगीदाराचं नाव देण्यात आलं. मागच्या वर्षी इथला स्वीकारदर ११% होता. म्हणजे I.I.T.s पेक्षा M.I.T. उदार असली तरी गुणवत्तेच्या दृष्टीनं दोन्ही एका पारड्यात बसत नाही. जागतिक निर्देशांकात M.I.T. चा नंबर MBA पहिल्या दहात लागतो तर आपल्या I.I.M.s निरनिराळ्या सर्वेक्षणानुसार २५० ते ३००च्या दरम्यान कुठेतरी फेकल्या गेलेल्या आढळतात.

इथे पदवी मिळवणारे प्रसिद्ध विद्यार्थी म्हणजे आपल्या केंद्रीय बँकेचे २३वे गव्हर्नर रघुराम राजन. त्यांनी आपल्या बँकांतील बुडित कर्जावर बोट ठेवून संस्थांना सुधारण्याचा प्रयत्न केला. या प्रक्रियेत आतापर्यंत १० ट्रिलियन रु.चं बुडित कर्ज सापडलं आणि सरकारचे डोळे पांढरे झाले. त्यावेळी टेलिफोन कर्ज देण्याची पद्धत असे. म्हणून उद्योजकाला धार्जिण असलेला सरकारदरबारी बाबू किंवा मंत्री दूरध्वनी करून बँकांना कर्जवाटप करण्यास भाग पाडे. दुसरे विद्यार्थी म्हणजे पटनी कॉम्प्युटर सिस्टमचे नरेंद्र पटनी आणि शेजारील हार्वर्डच्या व्यवस्थापन अभ्यासक्रमाचे (MBA) अधिष्ठाता नितीन नोहरिया. जागतिक पातळीवर झळकणाऱ्या माजी विद्यार्थ्यांत नुकतेच दिवंगत झालेले संयुक्त राष्ट्रसंघाचे ७ वे सरचिटणीस कोफी अ‍ॅनन व इस्राईल या देशाचे पंतप्रधान बेंजामिन नेतनॉव्हू यांचा समावेश करावा लागेल.

सेंट चार्ल्स नदीवर अनेक पूल आहेत. त्यातला एक M.I.T.च्या अगदी पुढे आहे. तो हार्वर्डच्या स्थापत्य अभियंत्यांनी बांधलेला म्हणून त्याला हार्वर्ड पूल हे नाव देण्यात आलं. मग तो M.I.T. नं विकत घेतला. पण नाव मात्र बदललं नाही कारण त्यात अनेक दोष होते म्हणून त्या विद्यापीठाचे अभियंते आपल्या विद्यार्थ्यांपेक्षा कमी दर्जाचे असे M.I.T. ला वाटणं साहजिक होतं. या सदोष पुलाशी नाव जोडून आपली ख्याती डागल्या जाऊ नये



हँकॉक विमा कंपनीचा टॉवर

म्हणून M.I.T. नं त्याचं बारसं केलं नाही.

नंतर पश्चिम किनाऱ्यावर जॉन हँकॉक या अमेरिकेत प्रसिद्ध असणाऱ्या विमा कंपनीची उंच इमारत दृष्टिपथात आली. जगविख्यात शिक्षण संस्थांमध्ये उद्योगानं डोकं काढावं म्हणजे भारतीय तत्त्वज्ञानानुसार मेंढ्यात कोल्हा सापडणे. कारण आपल्या देशात सरस्वती आणि लक्ष्मी एकत्र नांदू शकत नाही असं थोतांड आहे. हस्तिदंती मनोऱ्यात बसलेल्या प्रोफेसरनं उद्योगजगात उतरणं आपण ब्राह्मणानं रस्तेसफाईचं तुच्छ काम करण्यासारखं समजतो. पण साफसफाईतून लक्ष्मी कमावता येते याचं भान आपल्याला कुठे आहे? अमेरिकेत कचरा ढेल्यात भरून दूरस्थ ठिकाणी नेणाऱ्या कंपन्यांचे संस्थापक अब्जाधीश झालेले आहेत. M.I.T. व हार्वर्डमधल्या ज्ञानाचा लोकोपभोग व्हावा म्हणून बोस्टनमधील राऊट १२८ (Route) या रस्त्यावर कितीतरी उद्यमारंभी कंपन्या स्थापन करण्यात आल्या. प्रयोगशाळेतलं ज्ञान जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचं महत्त्वाचं काम या उद्योगांनी केलं आहे. म्हणून सरस्वती लक्ष्मीपासून फटकून राहते असं समजणं चुकीचं होईल. हा जॉन हॅलॉकचा वास्तू त्याचंच एक उदाहरण. हार्वर्ड, M.I.T. व M.B.A. चे पदवीधर तिथे काम करतात.

नदीवरून स्पष्ट दिसणाऱ्या या उंच वास्तूचं वैशिष्ट्य असं की त्याला वास्तुशास्त्रातले अनेक पुरस्कार मिळाले. त्याची बांधणी १९६८ मध्ये सुरू होऊन १९७६ मध्ये संपली. कुठलंच भरीव काम न करता ओबामाला नोबेल दिल्याचा जसा निवड समितीला पश्चात्ताप वाटला तसाच या पुरस्कार देणाऱ्यांना झाला कारण त्या वास्तूत अनेक अभियांत्रिकी दोष आहेत हे नंतर उघडकीस आलं. पहिला दोष म्हणजे काचेची तावदानं उंचावरून खाली रस्त्यावर पडून फुटली. त्याचा उपद्रव पादचाऱ्यांना झाला. म्हणून सोसाट्याचा वारा आला की पोलीस त्या वास्तूभोवतालची रहदारी बंद करत. त्यामुळे जॉन हँकॉकच्या प्रतिमेला काळिमा लागला. हा दोष दुरुस्त करणं म्हणजे एक मोठी खर्चिक बाब होती. तरीही कंपनीनं सगळी १०,००० तावदानं बदलून दुसरी घट्ट बसणारी लावली.

दुसरा दोष म्हणजे वारं आलं की हा टॉवर हिंदोळे घेई. त्यामुळे वरच्या मजल्यावर काम करणाऱ्यांना भोवळ येई. आपण कागद उडून जाऊ नये म्हणून जसं त्यावर वजन ठेवतो तसं हा वास्तू हेलकावे घेऊ नये म्हणून अभियंत्यांनी ५०व्या माळ्यावर प्रत्येकी ३०० टन वजनाचे दोन गोळे विरुद्ध दिशेनं ठेवले. त्यामुळे ती इमारत एकदम स्थिरावली. एवढे मोठे कथिलाचे पर्वत इतक्या उंचीवर कसे नेले हे विचारणं म्हणजे हजारो वर्षांपूर्वी झुलते मनोरे बांधताना इजिप्तमधल्या लोकांनी मोठमोठे दगड यापेक्षा जास्त उंचीवर कसे नेले या मूलभूत प्रश्नाला हात लावण्यासारखं. किंबहुना आजच्या अभियंत्याचं काम प्राचीन काळातल्या कर्मचाऱ्यांपेक्षा कितीतरी सोपं. मोठी यंत्रणा वापरून कुठलंही काम करता येतं.

त्यानंतर पश्चिम किनाऱ्यावर प्रुडेंशियल विमा कंपनीचा त्याहीपेक्षा मोठा टॉवर दिसला. त्याचे अभियंते M.I.T. प्रशिक्षित झालेले असावेत कारण त्यांनी कुठलीच घोडचूक केली नाही. थोडं पुढे गेलं की त्याच किनाऱ्यावर तीन साधारण इमारतींनी डोकं वर काढलं होतं. पुन्हा दुसरी शिक्षणसंस्था तिथे उगवली. ते वास्तू बोस्टन युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांची निवासस्थानं असं कळलं. हे विद्यापीठही खाजगीच पण सांख्यिक दृष्ट्या M.I.T. किंवा हार्वर्डपेक्षा मोठं. प्राथमिक पदवी अभ्यासक्रमासाठी M.I.T. ४५०० तर बोस्टन युनिव्हर्सिटी १८,००० विद्यार्थ्यांना प्रवेश देते. इथली वार्षिक फी ५२,००० डॉलर (३७ लाख अवमूल्यित रु.) पण एवढ्यावरून काम भागत नाही. रहाण्याचा, पुस्तकाचा, खाण्याचा व घरी भेटीला जाण्याचा खर्च वेगळा म्हणजे वर्षाला जवळजवळ ७०,००० डॉलर (४९.७ लाख रु.) आणि ४ वर्षाच्या पदवीशिक्षणाला २ कोटी रुपयांचा भुर्दंड सोसावा लागतो. ऋषीच्या घरी काम करून विद्यार्जन करण्याचे आपल्या पुराणातले दिवस केव्हाच पुराणजमा झालेले आहेत. हार्वर्डची पदवी घेण्यास एकूण १,५९,००० डॉलर (१.२ कोटी) तर M.I.T. ची थोडी महाग. थोडक्यात म्हणजे हे शिक्षण घेण्यासाठी बँक फोडावी लागते आणि विद्यार्थी तसं करतात. पदवी खिशात पडताच अमेरिकन विद्यार्थ्याच्या डोक्यावर सरासरी ३७,००० डॉलर (२६ लाख रु.) कर्ज असतं. M.B.A., विधी किंवा वैद्यकीय क्षेत्रातल्या विद्यार्थ्यांना त्यापेक्षा कितीतरी जास्त कर्ज उचलावं लागतं. असं असूनही भारतातून अमेरिकेला शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचे लोंढे रोडावले नाहीत. उलट ते वाढत आहेत.

सध्या जवळजवळ १ लाख विद्यार्थी अमेरिकेत अभ्यास करतात. याबाबतीत चीननंतर आपलाच नंबर लागतो. नवलाची गोष्ट अशी की यातले अर्धे विद्यार्थी प्राथमिक पदवीसाठी अमेरिकेला आले आहेत. म्हणजे एवढा खर्च पेलण्याची ऐपत त्यांच्या पालकांमध्ये आहे. अर्थातच इतर कमी दर्जाच्या विद्यापीठात अभ्यास करण्यास हार्वर्ड, M.I.T. किंवा बोस्टन युनिव्हर्सिटीपेक्षा कमी खर्च येतो. तरीपण ती रक्कम भरणं सोपं नसतं. त्यासाठी स्वीस बँकेत खातं लागतं हे विसरू नये.


हार्वर्डची एक इमारत

बोस्टन युनिव्हर्सिटी हार्वर्डच्या छायेत वावरत असली तरी तीनही मानवी जीवन सुखकर करण्यासाठी महत्त्वाचं योगदान केलं आहे. टेलिफोनची संकल्पना इथे जन्माला आली. ॲलेक्झांडर ग्रॅहॅम बेल इथे स्वरयंत्र शरीरशास्त्राचा (Vocal Physology) प्रोफेसर होता. त्यानं दूरध्वनीचे प्रयोग इथल्या कँपसवर केले. त्याला या नवीन संशोधनार्थ वेळ मिळावा म्हणून बोस्टन विद्यापीठानं ग्रॅहॅम बेलला १८७५ मध्ये १ वर्षाचा आगाऊ पगार देऊन मोकळीक दिली आणि पुढच्याच वर्षी तो यशस्वी झाला. तेव्हापासून मानवाला तारेवर जीभ चालवणं शक्य झालं. त्यानं या वाचेचा भरपूर उपयोग केला. पण त्यासाठी त्याला किंवा विजेचा बल्ब शोधून काढणाऱ्या थोमड एडिसनला नोबेल कधीच मिळालं नाही. कारण या शोधांमध्ये कुठलंच मूळ विज्ञान (basic science) ध्वनित नव्हतं. पण फडतूस राजकारणी मात्र या पुरस्कारासाठी पात्र होतात याला काय म्हणावं?

इथले शिकलेले दोन विद्यार्थी नमूद करण्यासारखे आहे. बोस्टन युनिव्हर्सिटीचा धर्मशास्त्र विभाग (Theology Department) अव्वल दर्जाचं समजण्यात येतो. त्याचा जगप्रसिद्ध नोबेलप्राप्त व गांधींचा पुरस्कर्ता मार्टिन ल्युथर किंग इथूनच पदवीधर झाला. नामवंत पुलित्सर पारितोषिक जिंकणारी भारतीय वंशाची लेखिका झुंपा लाहिरी इथेच शिकलेली. उभ्या भारतानं जेवढी नोबेल पारितोषिकं जिंकली नाहीत तेवढी बोस्टन विद्यापीठानं पटकावली. एकूण ७ नोबेलचं हे विद्यापीठ मानकरी आहे.

अजून पुढे गेल्यावर खजिनाच सापडला. नदीच्या दोन्ही काठावर जगप्रसिद्ध हार्वर्ड युनिव्हर्सिटीचा परिसर दिसला. पूर्व किनाऱ्यावर केंब्रिजमध्ये प्राथमिक पदवीची महाविद्यालयं तर पश्चिमेला पदव्युत्तर शिक्षणाच्या प्रयोगशाळा. या १६३६ मध्ये स्थापन झालेल्या विद्यापीठाच्या प्रवेश निकषात जी जादू आहे ती आतापर्यंत कुणालाच कळली नाही. त्यामुळे अमेरिकेचे अनेक राष्ट्राध्यक्ष (७), सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश किंवा शासकीय सेवा अधिकारी याच विद्यापीठात शिक्षण घेतलेले आढळतात. विज्ञानातही हे विद्यापीठ मागे नाही. इथे गवतासारखे नोबेल मानकरी उगवतात. सध्या ५ त्यांच्या अध्यापन वर्गात मोडतात. असं भाग्य जगात कुठल्याच विद्यापीठाला लाभलेले नाही. आतापावेतो निरनिराळ्या शाखांत हार्वर्डनं एकूण १५७ नोबेल पटकावले. माझ्या वर्गात एवढे विद्यार्थी देखील नव्हते. त्यांच्या यादीत मला एकाही भारतीयाचं नाव सापडलं नाही. त्यासाठी आपल्याला युनिव्हर्सिटी ऑफ शिकागोला भेट द्यावी लागेल. तिथे पदार्थ विज्ञानशास्त्रात १९८३ मध्ये सुब्रमण्यम चंद्रशेखरनं हे अतिदुर्मिळ पारितोषिक कमावलं. पुन्हा भारत या क्रमवारीत कुठे बसतो असा खुळचट प्रश्न विचारण्याचा मोह अनेकांना आवरत नाही. जर निराशा पत्करण्याची तयारी असेल तर सांगतो. स्वातंत्र्योत्तर काळात १.३४ अब्ज लोकांमध्ये एकाही भारतस्थित नागरिकाला नोबेल मिळालं नाही. नाही म्हणायला मदर थरेसा यांना १९७९ मध्ये हा पुरस्कार देण्यात आला. पण तिचा जन्म ज्या स्कोपजे या पुरातन देशात झाला तो आज अस्तित्वात देखील नाही. अमर्त्य सेनला १९९८ मध्ये गौरवण्यात आलं. पण ते हार्वर्डमध्ये प्राध्यापक होते. कैलास सत्यार्थींच्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या समुहाला तो पुरस्कार २०१४ मध्ये मिळाला. पण ते भारतात काम केलं म्हणून नव्हे.

अशा इतिहास असलेल्या विद्यापीठात मी गेलो. पण पदवी काही मिळाली नाही. झाली ती भेट. प्रौढपणाचे गुण तरुणाईत कसे ओळखावे याचं शास्त्रच हार्वर्डनं शोधून काढलं. त्यामुळे वॉल स्ट्रीटवर, उद्योगजगात व वित्तक्षेत्रात त्या विद्यापीठाचे कितीतरी विद्यार्थी कमालीचे यशस्वी झाले. याचं श्रेय ते हार्वर्डनं दिलेल्या शिक्षणाला देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अब्जावधी डॉलरचं दान करतात. त्यांची नावं धारण केलेल्या कितीतरी इमारती कॅम्पसभर उभ्या आहेत. त्यामुळे हार्वर्डचं देणगीसंचित आज जगात सर्वात मोठं आहे. ३७ अब्ज डॉलरची गंगाजळीचं आर्थिक व्यवस्थापन करणारा दुसरा कुणी नसून मराठी वंशाचा एक एन.पी. नार्वेकर नावाचा मनुष्य आहे. या संचितातून होणाऱ्या उत्पन्नातून हार्वर्ड आपला संसारच चालवत नाही तर शिष्यवृत्त्या देऊन गरजू विद्यार्थ्यांना मदत करते. म्हणून नार्वेकरचं काम एवढं महत्त्वाचं की

विद्यापीठ त्याला दर वर्षाला एकूण १६ दशलक्ष डॉलरचा पगार देते. (१.२ अब्ज रु.)

हार्वर्डमध्ये एकूण २२,००० विद्यार्थी. त्यातले फक्त ४८०० प्राथमिक पदवीसाठी तर उरलेले पदव्युत्तर अभ्यासासाठी. वर्षाची फी ४६,३०० डॉलर (३३ लाख) व सर्व खर्च मिळून ६७,६०७ डॉलर (४८ लाख रु.) लागतात. म्हणजे चार वर्षाच्या पदवीसाठी घरी बँक नाहीतर खनिज तेलाची विहीर असणं आवश्यक असतं. प्रवेशासाठी चार गुणांच्या मोजपट्टीवर ४.१४ गुण मिळवावे लागतात. म्हणजे १०० पेक्षा जास्त. परंतु हार्वर्ड हे एकच निकष वापरत नाही. व्यक्तिमत्त्वाचे इतर पैलूही लक्षात जाईल. नेतृत्वगुण, अभ्यासेतर क्षेत्रात केलेली कामगिरी वगैरे महत्त्वाचे ठरतात. भारताच्या संदर्भात धारावीत जाऊन तिथल्या गरीबांना केलेली मदत इथे लक्षात घेण्यात येते. अमेरिकेतली धारावी म्हणजे घेटो (Ghetto). तिथल्या काळ्यांना गणित शिकवल्याचं आत्मसमाधानच नव्हे तर हार्वर्डमध्ये जाण्याची संधी मिळू शकेल. हे सगळे निकष एकत्रित लक्षात घेतल्यावरच प्रवेश देण्यात येतो. सध्या त्याचा स्वीकारदर ६% आहे. स्वीकारलेल्या गरीब विद्यार्थ्यांना अर्थातच आर्थिक मदत देण्यात येते. यातून जे हिरे निघतात ते शेवटी विद्यापीठाला देणगी देऊन उदात्त व पवित्र कार्य बजावतात. परवाच म्हणजे २०१५ मध्ये जॉन पॉल्सन नावाच्या गृहस्थानं ४०० दशलक्ष डॉलरची देणगी (२८.४ अब्ज रु.) देणगी अभियांत्रिकी कॉलेजसाठी जाहीर केली. एवढी मोठी देणगी हार्वर्डला ४०० वर्षाच्या इतिहासात कधी मिळाली नाही. ५९ वर्षीय पॉल्सननी १९८० मध्ये तिथून M.B.A. मिळवल्यावर हेज फंड (Hedge Fund) स्थापन केला व गडगंज संपत्ती गोळा केली. २०१३ मध्ये त्याची कमाई २.३ अब्ज डॉलर होती. तेवढे पैसे आपले केंद्रीय सरकार १.३४ अब्ज लोकांच्या आरोग्यावर खर्च करीत नाही. अर्थातच अभियांत्रिकी कॉलेजला त्याचं नाव देण्यात येईल. अशा दानशूर विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे वेळी ओळखणं सोपं नसतं. आपले रतन टाटा देखील हार्वर्डचे M.B.A. पदवीधर. त्यांनी आपल्या धर्मादाय प्रतिष्ठानातर्फे हार्वर्डला २०१० मध्ये ५० दशलक्ष डॉलर (३.५ अब्ज रु.) देणगी टाटाभवन बांधण्यास दिली. ती भारतात वादग्रस्त ठरली. सध्या या विद्यापीठातून पदवी मिळवणारे ७९ अब्जाधीश जिवंत आहेत. त्यातल्या अनेकांना आपलं मृत्युपत्र लिहिताना हार्वर्डची आठवण नक्कीच होईल.

सुरुवातीला या विद्यापीठात फक्त पुरुषांनाच प्रवेश मिळे. स्त्रियांसाठी हार्वर्डला संलग्न असलेलं रॅडक्लिफ (Radcliff) कॉलेज राखून ठेवण्यात आलं होतं. ते कॉलेजही हार्वर्डच्या परिसरात आहे. लिंग समहक्काचे आहे दिवस आले असले तरी रॅडक्लिफ मुलांना प्रवेश देत नाही. पण हार्वर्डमध्ये मात्र मुलींचं स्वागत करण्यात येते. यावरून आपल्याला लिंगसमत्वाची व्याख्या कळली असेलच.

सध्या हार्वर्ड विद्यापीठ कोर्टकचेऱ्यात ओढलं गेलं आहे. एशियन अमेरिकन म्हणजे मुख्यत्वेकरून चिनी व भारतीय वंशाच्या विद्यार्थ्यांनी हार्वर्ड विरुद्ध खटला भरला. त्यांना गोऱ्यांपेक्षा जास्त गुण मिळूनही विद्यापीठ प्रवेश नाकारते व वंशभेद दाखवते हा त्यांचा दावा. हार्वर्डनं एशियन अमेरिकन विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम कोटा तयार केला असून गुणवत्ताधारी इच्छुकांना प्रवेश दिला नाही यासाठी अनेक पुरावे गोळा करण्यात आले. या दाव्याला वैधता व विश्वासार्हता लाभण्याचं एक कारण म्हणजे ट्रंप शासनानं त्याला पाठिंबा दिला. ही गोष्ट खरी आहे की नुसत्या गुणांकांवरून प्रवेश दिला तर अधिकांश विद्यार्थी चिनी व भारतीय असतील. गोरे मागे पडतील. असं युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्नियामध्ये झालं आहे. म्हणून त्या राज्यसरकार पुरस्कृत विद्यापीठानं या अल्पसंख्याकांच्या प्रवेशावर मर्यादा घातल्यात. ते विद्यापीठ प्रामुख्यानं जनतेच्या आर्थिक मदतीवर चालत असल्यामुळे व त्यात गोऱ्यांचं योगदान अधिक असल्यामुळे त्यांना प्रवेश न देणं उचित ठरणार नाही पण हार्वर्ड खाजगी आहे आणि कायद्यानुसार कुठल्याही वंशाविरुद्ध अस्पृश्यात करणं अवैध समजलं जात असल्यामुळे त्याची प्रवेशपद्धती कायद्यात बसते का हे न्यायाधीश ठरवतील व हा मामला सर्वोच्च न्यायालयात जाईल असे वाटते. त्याचा निकाल लागेपर्यंत काही वर्षे लागतील.

हार्वर्ड संपताच आमचा दौराही संपुष्टात आला. पण या जलविहारात अमेरिकेतल्या नावाजलेल्या शिक्षणसंस्थांचं जे दर्शन झालं ते उद्बोधक वाटलं. एवढं ज्ञान कुठल्याच नदीच्या काठावर साचलेलं नसेल. मानवी बुद्धिचा जो आविष्कार या ज्ञानमंदिरात झालेला दिसतो तेवढा जगात दुसऱ्या कुठेच आढळणार नाही. तसं पाहिलं तर आपलं नालंदा विद्यापीठ हार्वर्डपेक्षा कितीतरी जुनं. ते पाचव्या शतकात स्थापन झालं होतं. पण आज त्याचे अवशेषच मागे राहिले आहेत. ते ज्या दिवशी हार्वर्डच्या पंक्तीला बसेल त्या दिवशी भारतानं आपलं न्याय्य स्थान जगात पटकावलं असं म्हणता येईल.

– **डॉ. अनंत पां. लाभसेटवार** (Ph.D.)
anantlabh@gmail.com
(लेखक 'फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी', कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्षं 'चेअरमन ऑफ दी बोर्ड' होते.)

**॥ग्रंथाली॥**




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

# ट्रंप
## डॉ. अनंत पां. लाभसेटवार

ट्रंप करिष्माधारक, वाटाघाटीपटू, कृतीप्रधान, नेतृत्ववान व देशहित अग्रणी ठेवणारे. त्याबरोबर एक भंपकबाज बोलणारे, श्रीमंतीची अतिशयोक्त प्रिय व देशाचे राजकीय ध्रुवीकरण करणारे म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांचा हा वादळी व चित्तथरारक जीवनपट.

# रंग 'झी' मालिकाविश्वाचे...

**'झी मराठी'वरील मालिका, त्यांच्यातील व्यक्तिरेखा आणि ती साकारणारे कलावंत म्हणजे प्रत्येक कुटुंबाचा अविभाज्य भागच! या मालिकांच्या रंगांची झलक आता 'शब्द रुची'तून भेटीला येणार आहे. वाचनसंस्कृतीच्या जतन-संवर्धनात 'झी'ने पुढे केलेला हात मोलाचा आहे.**


## झिंग झिंग झिंगाट : सोशल मीडियावर सेलिब्रिटी झाले 'झिंगाट'

मागील चार, पाच दिवसांपासून सोशल मीडियावर विशेषतः फेसबुक आणि इंस्टाग्रामवर ZingZingZingaat हा हॅशटॅग वापरून मराठी सेलिब्रेटींनी ठराविक अक्षरापासून गायलेल्या गाण्यांचे व्हिडीओज बघायला मिळत आहे. याची सुरुवात झाली, ती मराठीच्या ऑफिशिअल फेसबुक पेजवरील आदेश बांदेकरांच्या व्हिडिओपासून, आदेश बांदेकरांनी या व्हिडिओमध्ये एक गाणं गाऊन प्रसिद्ध अभिनेते सुबोध भावेंना त्या गाण्याच्या शेवटच्या अक्षरापासून सुरू होणारं गाणं गाण्याचे चॅलेंज दिले. तेथूनच अभिजित खांडकेकर, भाऊ कदम, श्रेया बुगडे, अभिज्ञा भावे, संकर्षण कऱ्हाडे, अक्षया देवधर, इशा केसकर, अनिता दाते, सायली संजीव, धनश्री कडगांवकर, शिवानी बावकर, सागर कारंडे यांच्यासह अनेक मराठी सेलिब्रिटींनी या ऑनलाईन अंताक्षरीचे व्हिडीओ आपापल्या सोशल मीडिया हॅन्डलसवर पोस्ट केले.

मात्र आदेश बांदेकरांनी दिलेल्या या चॅलेंजच्या मागचे रहस्य नेमके आहे तरी काय? या प्रश्नाचं उत्तर आहे, झी मराठीवरील नवीन कथाबाह्य कार्यक्रम 'झिंग झिंग झिंगाट..! 'ऑनलाईन अंताक्षरी चॅलेंज' हा या कार्यक्रमाच्या प्रमोशनचा फंडा होता. या नव्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालक आहेत आदेश बांदेकर, म्हणूनच या आगळ्या वेगळ्या चॅलेंजची सुरुवात त्यांच्यापासून झाली. सेलिब्रेटींच्या गाण्यांच्या व्हिडीओंना सोशल मीडियावरील तरुणाईने तुफान रिस्पॉन्स दिला.

## शाळा बुडवून चित्रपट पाहायला जायचो – भाऊ कदम

गेल्या काही दिवसांपासून संजय मोने यांच्या 'कानाला खडा' या आगामी 'चॅट शो'ची सर्वत्र चर्चा आहे. या कार्यक्रमात संजय मोने कलाकारांशी गप्पा मारणार आहेत. कानाला खडा लावणारे काही किस्से या गप्पांमध्ये रंगणार आहेत. हा कार्यक्रम लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. शुक्रवार व शनिवार रात्री ९.३० वाजता प्रसारित होणार आहे.





या कार्यक्रमाच्या पहिल्याच भागात भाऊ कदम संजय मोने यांच्याशी गप्पा मारायला येणार आहेत.

'चला हवा येऊ द्या'मधून जगभरात प्रेक्षकांच्या घर घरात पोहोचलेला एक अवलिया विनोदवीर म्हणजे भाऊ कदम. सगळ्यांचा आवडता कलाकार भाऊ याचे किस्से देखील तितकेच भन्नाट आहेत. संजय मोने यांच्यासोबत गप्पा मारताना भाऊ कदम यांनी त्यांच्या बालपणीचा असा एक किस्सा सांगितला त्यानंतर भाऊने कानाला खडा लावला आणि ती गोष्ट परत न करण्याचा निर्णय घेतला. भाऊ कदम शाळेत असताना शाळा बुडवून चित्रपट पाहायला जात असे. पण एके दिवशी त्याच्या बाबांना ही गोष्ट कळली आणि त्यानांतर काय घडलं हे 'कानाला खडा' या कार्यक्रमाच्या पहिल्या भागात पाहायला मिळाले. तसंच शनिवारच्या भागात तरुणांच्या हृदयाची 'धडकन' सई ताम्हणकर आणि तिचे कानाला खडे लावणारे किस्से देखील प्रेक्षकांना खूप आवडले.

तेव्हा पाहायला विसरू नका 'कानाला खडा' शुक्रवार आणि शनिवार रात्री ९.३० वाजता फक्त झी मराठीवर!!

## काळानुरूप बदलाची शिक्षणात गरज–राज्यस्तरीय शिक्षण परिषदेतील सूर

शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आयोजित 'शालेय शिक्षण आज आणि उद्या' या विषयावरील राज्यस्तरीय वार्षिक एकदिवसीय शिक्षण परिषद २५ नोव्हेंबर रोजी मुंबईच्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

सेमीइंग्रजी का आणि कसे..? या संपादित पुस्तकाचे प्रकाशन यावेळी उपस्थित मान्यवर रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील आणि प्रतिष्ठानचे सरचिटणीस शरद काळे याच्या हस्ते करण्यात आले. प्रकाशनाच्या वेळी आपले मनोगत व्यक्त करताना शरद काळे म्हणाले की, विद्यापीठीय आणि शालेय शिक्षणाचा दर्जा आज घसरल्याचे चित्र आहे.राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात मराठी मुले मागे पडल्याचे आज दिसत आहे. सेमीइंग्रजी का आणि कसे..? या पुस्तकासंदर्भातील माहिती 'शिक्षण विकास मंच'च्या मुख्य सल्लागार बसंती रॉय यांनी दिली.

यानंतर यावर्षीचा डॉ. कुमुद बन्सल उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार 'ग्रंथाली' प्रकाशित 'सल शिक्षणाचा' या सूर्यकांत कुलकर्णी लिखित पुस्तकाला देण्यात आला. यावेळी 'शिक्षण विकास मंच'च्या निमंत्रक आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी आज मुलं वाचतात किती? असा प्रश्न उपस्थित करून वाचनसंस्कृतीकडे उपस्थितांचे लक्ष वेधले. शिक्षण आणि आरोग्य ह्या दोन बाबी महत्त्वाच्या आहेत. मात्र शासनाचे या दोन्हीकडे लक्ष नाही.

---

## मांगल्याचा ध्यास घेणारा 'खेळिया'

आनंदयात्री बा.भ. बोरकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त डॉ. घनश्याम बोरकर यांच्या 'खेळिया' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन पणजी येथे नुकतेच झाले. याप्रसंगी साहित्यिक–समीक्षक प्रा. सोमनाथ कोमरपंत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. 'डॉ. घनश्याम बोरकर यांच्या कवितेचा दंश बोरकर वंशाचाच आहे.' या शब्दात सोमनाथ कोमरपंत यांनी 'खेळिया'ला दाद दिली.

त्यांच्या कवितेत शारीर, मानस आणि गूढ प्रवाह असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'म्युझिकल थॉट इज पोइट्री' ही थॉमस कॉर्लाइलची व्याख्या त्यांनी डॉ. घनश्याम यांच्या कवितेसंदर्भात सांगितली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक सुरेश मुंडू आमोणकर होते तर सन्माननीय वक्ते म्हणून कवी माधव बोरकर उपस्थित होते.

डॉ. घनश्याम बोरकर यांची कन्या तेजश्री बोरकर–दीक्षित यांनी पुस्तक प्रकाशनानंतर काव्यमैफल सादर केली.

---

## नर्मदा किडनी फाउंडेशनच्या रौप्यमहोत्सवी कार्यक्रम

किडनीचे आरोग्य आणि विकार ह्याबाबत जनजागृती करणाऱ्या नर्मदा किडनी फाउंडेशनचा रौप्यमहोत्सवी समारंभ मुंबईतील सावरकर आलिशान सभागृहात साजरा झाला. या कार्यक्रमात ज्ञानराज पाटकर ह्यांनी लिहिलेले आत्मकथन –'स्वल्पविराम' प्रकाशित करण्याचा सोहळा संपन्न झाला. समारंभाला उपस्थित असलेल्या लोकप्रिय संगीतकार जतीनजी पंडित ह्यांच्या शुभहस्ते प्रकाशन करण्यात आले.या प्रसंगी नर्मदा किडनी फाउंडेशनचे सर्वेसर्वा आणि ग्लोबल हॉस्पिटलमध्ये संचालक किडनीविकार तज्ञ डॉ. भरत शहा उपस्थित होते. प्रस्तुत आत्मकथनात ज्ञानराज अर्थात राजन पाटकर ह्यांनी आपले डायलेसिस व किडनी ट्रान्सप्लांटविषयक स्वानुभव हे अनेकांना मार्गदर्शक ठरतील असे गौरवोद्गार माननीय पाहुण्यांनी पुस्तकाचे महत्त्व सांगताना काढले. ग्रंथालीतर्फे धनश्री धारप आणि दत्ता सावंत हे प्रकाशन सोहळ्यास उपस्थित होते.

---

## कोकणातल्या कृषिसमृद्धीची महिती

कोकणाकडे बऱ्याचदा पर्यटन स्थळ म्हणून पाहिले जाते. अनेक शहरीवासियांनी वास्तव्याचे ठिकाण म्हणून कोकणातल्या जागेचा स्वीकार केलेला आहे. आंबाबरोबर काही ठरावीक फळांची जागृती ही जगभर झालेली आहे. परंतु कोकणामध्ये कोकणाबरोबर महाराष्ट्राला समृद्ध करू शकेल अशी अनेक कृषिउत्पादने आहेत, त्यांचा हवा तसा शोध घेतलेला नाही असे मत जे.जे. युनिव्हर्सिटी राजस्थान आणि श्री व्यंकटेश युनिव्हर्सिटी उत्तर प्रदेशचे माजी कुलगुरू डॉ. अरुण मुरुडकर यांनी व्यक्त केले. प्रा. डॉ. उत्तम विश्राम महाडकर यांनी लिहिलेल्या 'कृषिसमृद्धीतून कोकणाचा शाश्वत विकास' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. मुरुडकर यांच्या हस्ते झाले. 'ग्रंथाली'ने लेखनाची जबाबदारी माझ्यावर टाकल्यामुळे संशोधनातून हे पुस्तक आपण पूर्ण करू शकलो. यानिमित्ताने सतत कार्यरत राहण्याची हमी पुस्तकाचे लेखक प्रा. डॉ. उत्तम महाडकर यांनी दिली.

'ग्रंथाली'च्या लेखिका अनुराधा गोरे यांनी पुस्तकाला शुभेच्छा देताना कोकणात सहसा शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत नाहीत, त्याला कारण म्हणजे शेतकरी इथल्या निसर्गाचा पुरेपूर उपयोग करत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदिनी पाटील यांनी केले.

**एका ऐतिहासिक घटनेतील वेदनामय नाट्याचे मन हेलावून टाकणारे चित्रण**

दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने हिरोशिमा आणि नागासाकी या जपानमधील दोन शहरांवर अणुबॉम्ब टाकला, ही जागतिक इतिहासातील सर्वांत भीषण आणि मानवतेला काळिमा फासणारी घटना होती. या दोन शहरांवर बॉम्ब टाकल्यानंतर तिथे मृत्यूचं जे तांडव झालं आणि जखमी लोकांना ज्या वेदनांना तोंड द्यावं लागलं, त्याचं साद्यंत वर्णन करणारी कादंबरी आहे 'नागासाकी.' या वर्णनाबरोबरच १६ ते २९ जुलै आणि ५ ऑगस्ट १९४५ ते १० ऑगस्ट १९४५ या दिवसांतील राजकीय घडामोडींचं आणि हिरोशिमा, नागासाकीतील लोकांच्या दैनंदिन जीवनाचं चित्रणही या कादंबरीत केलं आहे. क्रेग कोली यांनी संशोधन करून, खूप संदर्भ अभ्यासून, प्रत्यक्षदर्शींच्या मुलाखती घेऊन ही कादंबरी सिद्ध केली आहे. अनुवाद केला आहे डॉ. जयश्री गोडसे यांनी.

मेहता पब्लिशिंग हाऊस

निरपराध अज्ञातांचा निरंकुश संहार

**नागासकी**

**लेखक : क्रेम कोली**

**अनु. डॉ. जयश्री गोडसे**



अमेरिकेने हिरोशिमावर बॉम्ब टाकला तो दिवस होता, ६ ऑगस्ट १९४५. हा बॉम्ब पडल्यानंतर हिरोशिमात जो हलकल्लोळ माजतो, इथून या कादंबरीतील नाट्याला सुरुवात होते. मृत्यूच्या तांडवाचं, जखमी लोकांचं वर्णन वाचताना अंगावर शहारे येतात. उदा. हिरोशिमामध्ये कामानिमित्त आलेला नागासाकीचा यामागुची बॉम्बहल्ल्यामुळे जखमी होतो. तो नागासाकीला जाण्यासाठी रेल्वेस्टशनवर चाललेला असतो, त्यावेळचं हे वर्णन – 'नदीत तरंगणाऱ्या प्रेतांवरून रांगतच त्याने नदी ओलांडण्याचा प्रयत्न केला. त्या प्रेतांवरून तो हात आणि गुडघे टेकत पुढे निघाला होता. एक मृतदेह त्याच्या वजनाने बुडाला आणि त्याच्या पाठोपाठ यामागुचीसुद्धा पाण्यात पडला. त्यामुळे त्याची भाजलेली त्वचा ओली होऊन वेदनांचा डोंब उसळला. मग परत कोरड्या जमिनीवर येऊन तो तसाच प्रवाहाच्या वरच्या बाजूने चालत राहिला. मग त्याला पूल सापडला. पूल फक्त एका खांबावर पण शाबूत होता. हळूहळू त्यावरून जाऊन त्याने दुसरा किनारा गाठला. प्रेतांचे ढीग रचण्याचे काम काही माणसे करत होती. त्यांच्यावर पेट्रोल, तेल टाकून ती जाळून टाकण्यात येत होती. त्यामुळे त्या धुळीच्या ढगात या जळणाऱ्या तेलाचा धूरही मिसळत होता.'

हिरोशिमावर बॉम्ब पडतो, तेव्हा नागासाकीतील ज्या व्यक्ती हिरोशिमामध्ये असतात, त्यात नागासाकीमधील 'मिनयु' या वर्तमानपत्राचे संपादक ताकेजिरो निशिओका यांचा आणि पत्रकार नाकामुरा यांचा समावेश असतो. नाकामुरा ओकायामाच्या डोमेई वर्तमानपत्राला हिरोशिमावर झालेल्या बॉम्बहल्ल्याच्या संदर्भात छोटा अहवाल पाठवतो आणि हिरोशिमावरील बॉम्बहल्ल्याची घटना निशिओका, नागासाकीचे राज्यपाल वाकामात्सु नागानो यांच्या कानावर घालतात; पण राज्यपाल त्यांच्यावर विश्वास ठेवत नाहीत.

एकूणच, हिरोशिमावर बॉम्बहल्ला झाल्यावर अपरिमित भौतिक आणि जीवितहानी होऊनही प्रसारमाध्यमांपर्यंत ती घटना प्रभावीपणे पोहोचली नाही. हिरोशिमावर बॉम्ब टाकण्याआधी आणि नंतरही अमेरिकेने जपानला शरण येण्याचे आवाहन वारंवार केले होते; पण जपानने त्याकडे दुर्लक्ष केले आणि अमेरिकेने नागासाकीवर बॉम्ब टाकला. हिरोशिमापेक्षाही भयंकर हानी या बॉम्बमुळे झाली. असंख्य माणसे मृत्युमुखी पडली. असंख्य जखमी झाली. त्या संदर्भातील वर्णनं वाचताना मनाला खूप यातना होतात. उदा. स्फोटाच्या केंद्रापासून जवळजवळ एक किलोमीटर परिसर संपूर्णतः उद्ध्वस्त झाला होता. हिरोशिमाला याच अंतरावरच्या काही इमारती पडल्या नव्हत्या. पण येथे भूकंपातही पडू नयेत म्हणून विशिष्ट पद्धतीने बांधलेल्या काँक्रीटच्या इमारतीदेखील भुईसपाट झाल्या. माणसे आणि प्राणी तत्क्षणी मेले. माणसांच्या शरीरातील पाणी त्या उष्णतेच्या लाटेमुळे सुकून गेले. एक मुलगा एका विटांच्या वेअरहाउसच्या सावलीत उभा होता. जवळजवळ एक किलोमीटर अंतरावर त्याने उघड्यावर असलेली आई आणि तिचा मुलगा यांचा अक्षरशः धूर झालेला बघितला.

अशा प्रकारची वर्णनं या कादंबरीत वारंवार येतात आणि इतका भीषण संहार झालेला असतानाही जपानच्या राज्यकर्त्यांपर्यंत तो पोहोचत नाही आणि जपानच्या राज्यकर्त्यांची ही अनभिज्ञता वाचकाला आश्चर्यचकित करते. रशिया–अमेरिका–ब्रिटन यांनी पोस्टडॅम येथे घेतलेली परिषद, त्यानंतर जारी केलेला जाहीरनामा, जपानच्या परराष्ट्रमंत्र्यांनी रशियाला मध्यस्थी करण्याची केलेली विनंती, ती विनंती फेटाळून रशियाने जपानवर केलेला हल्ला, हिरोशिमावर आणि नागासाकीवर बॉम्ब टाकण्याआधी अमेरिकेने केलेली तयारी, बॉम्ब टाकल्यानंतरची अमेरिकेची प्रतिक्रिया, जपानची राजकीय भूमिका या राजकीय घटनांचा तपशील या कादंबरीत साकल्याने आला आहे.

नागासाकीवर बॉम्बहल्ला झाल्यानंतर येवढ्या विपरीत परिस्थीतीतही डॉक्टर नागाई, परिचारिका सुगाको मुराई, अन्य डॉक्टर्स आणि काही नागरिक जखमींना जमेल तशी मदत करत असतात. या लोकांची माणुसकी आणि जपानमधील लोकांचं देशप्रेम या सकारात्मक बाबींचं दर्शन या कादंबरीतून घडतं. हिरोशिमा आणि नागासाकीवर झालेला बॉम्बहल्ला या ऐतिहासिक घटनेतील वेदनामय नाट्य 'नागासाकी' या कादंबरीतून अधोरेखित झालं आहे. एका बाजूला माणसाची क्रूरता, अहंमन्यता, उदासीनता, तर दुसऱ्या बाजूला मानवता, सेवाभाव, परोपकार अशा दोन्ही बाजूंचं दर्शन या कादंबरीतून घडतं. बॉम्बहल्ल्याच्या विनाशकारी परिणामांचं प्राधान्यानं चित्रण करणारी ही कादंबरी वाचलीच पाहिजे.

**– अंजली पटवर्धन**

**नागासाकी**

लेखक : क्रेग कोली

अनुवाद : डॉ. जयश्री गोडसे

पृष्ठसंख्या : ३६०, किंमत : ४०० रुपये

प्रकाशन : मेहता पब्लिशिंग हाऊस


**ग्रंथाली येथे सभासदांना सवलतीत ३२० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**मु.पो. आई**
**संपादकांचं मातृस्मरण**
**संपा. संदीप रामराव काळे**




**शोध आईच्या गावाचा!**

संदीप काळेंनी माध्यमांतील जाणकार संपादक मंडळींचे संपादित केलेले सगळे लेख वाचले तर जाणवतं की, आई म्हणजे प्रतिकूलतेशी अव्याहत झगडणारी, मुलांच्या भल्यासाठी तगमगणारी, कधी हळवी; तर कधी खंबीर, मुलांना घडवणारी वात्सल्यमूर्ती असते. बऱ्याचदा आवर्जून केले जातात ते उपचार ठरतात आणि नकळत झालेले संस्कार होतात. असे संस्कार घडून येण्यासाठी आईचं स्वतःचं जीवन हा एक धडा असतो. या पुस्तकाच्या पानोपानी निःस्वार्थ सेवेचं, क्षमाशीलतेचं आणि स्थितप्रज्ञतेचं दर्शन सर्वच लेखांमध्ये घडतं. खासदार शरद पवार यांची या पुस्तकाला समग्र अशी प्रस्तावना लाभली आहे, तिच्यातला हा अंश. ही प्रस्तावना म्हणजे या पुस्तकाचा शिरपेच म्हणता येईल.

संदीप काळे हे पत्रकारितेतील हुकमी नाव. लेखनाच्या सोबतच अनेक सामाजिक चळवळींशी नाते ठेवून युवकांमध्ये प्रेरणा चेतवण्याच्या कामात ते सक्रिय आहेत. या पुस्तकाची संकल्पना कशी पुढे आली याची माहिती ते त्यांच्या मनोगतात देतात. खरेतर पत्रकार बातमीचा उगम सहसा सागत नाहीत. परंतु संदीप काळे यांनी तो मोकळेपणाने सांगितला आहे.

खासदार कुमार केतकर म्हणजे लेखक, संपादक, वक्ता, आणि चिकित्सक निर्भीड सडेतोड पत्रकार! प्रवासात गप्पांच्या ओघात काळेंनी त्यांना एक प्रश्न विचारला, 'सर, तुमच्या वैचारिक बैठकीचा पाया कसा रचला गेला?' 'आईच्या इराद्यांचा हा असर आहे. माझ्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीसाठी मी माझ्या आईला बरेचसं श्रेय देईन.' हा तो संवाद. यातून आईच्या गावाचा शोध घेण्याचे बीज रूजले. पत्रकारांना आपली बातमी शिळी होऊ द्यायची नसते. अवघ्या एका वर्षभरात हे पुस्तक वाचकांच्या हाती आले.

एकूण एकतीस संपादकांनी आईविषयीचे लेख लिहिले आहेत. विषय सोपा तितकाच अवघड, हळवा तिकाच कठीण. समोर दिसणाऱ्या पाऱ्याच्या थेंबासारखा इवलासा पण चिमटीत न पकडता येणारा. सागरासारखा अथांग, कवेत न मावणारा. अनेक परिमाणे असलेला तरी समग्रपणे नीट न मांडता येणारा. मातृत्व, प्रेम, वात्सल्य, माया, ऋजुता एका बाजूला, संस्कार, शिक्षण, सांभाळ, कष्ट अशा अनेक आघाड्यांवर करावी लागणारी कसरत, तरीही आकाशी झेप घेताना नजर पिलांवर ठेववणारी; स्वतःचे स्वपण सोडून संसार नावाचा गाडा सांभाळणारी, इतरांसाठी कणाकणाने चंदनासारखी झिजणारी, ही दुसरी बाजू. या सगळ्यांत प्रत्येकाला आपली आई दिसतेही आणि तरीही तिचे वेगळेपण त्या वयात न दिसणारे. कधीतरी वयाच्या एका टप्प्यावर स्वत:च्या आताच्या वाटचालीचा मागोवा घेण्याची सवड मिळते, तेव्हा सगळ्या गोतावळ्यात केंद्रभागी कोळ्याच्या जाळ्यात असल्यासारखी आई दिसू लागते, तिचे आईपण उमगू लागते.

कुमार केतकरांनी आपल्या वैचारिक अधिष्ठानाचे केंद्र आई असल्याचे स्पष्ट केले, त्यावेळी हेही लक्षात येते, आईची स्वतःची ठाम अशी वैचारिक बैठक देखील तितकीच प्रगल्भ होती. तिचा साहित्य, संगीत, कला यांचा व्यासंग आणि कर्तबगारी कितीतरी अनेक पटीने अधिक होती. मधुकर भावे लिहितात, 'वडिलांना गांधी हत्येनंतर अटक झाली. त्याकाळात आईने द्रौपदीची थाळी कुठून आणली होती ते कधीच कळले नाही, परंतु आईने कधी उपाशी झोपू दिले नाही, कशाची कमी पडू दिली नाही. घरातच वेदशाळा असल्याने स्वतः शिकलेली नसतानाही तिला संस्कृतमधली अनेक वचने, गायत्री मंत्र, व्यंकटेश स्तोत्र, रामरक्षा, भीमरूपी तिला पाठ होते. परवचा, भीमरूपी, व्यंकटेश स्तोत्र म्हटल्याशिवाय जेवण मिळणार नाही, हा तिचा पाठ होता.'

राजीव खांडेकर लिहितात, 'सदैव गोड बोलणे, लहान थोरांशी प्रेमाने वागणे, अंगी कायम नम्रता बाळगणे, मोठ्यांविषयी आदर बाळगणे, या आईच्या अंगी असलेल्या वैशिष्ट्यांच्या वाटेने अबोलपणे चालतो आहे. आवडलेल्या कथा लिहून काढणारी आई ही एकमेव म्हणावी लागेल.' अभिनंदन थोरातांची आई आपल्या कुटुंबाप्रमाणेच देशाचाही विचार करते. १९६२ च्या चीन आक्रमणाच्या वेळी या माऊलीने स्वतःचे मौल्यवान सर्व दागिने संरक्षण दलाच्या मदतीसाठी दान केले. हे मन जितके उदार होते तितकेच खंबीर. एका प्रसंगी मुलावर कठीण प्रसंग गुदरला तेव्हा ती ठामपणे पाठीशी उभी राहिली आणि म्हणाली, 'तू जर खऱ्या आईचे दूध प्यायला असशील तर कसल्याच प्रकारच्या दबाला बळी पडणार नाहीस.' भरतकुमार राऊत यांच्या मातेने तर दुधाचा रतीब घातला, घरात इंग्रजी वृत्तपत्र असावे म्हणून. प्रवीण बर्दापूरकर यांच्या आईच्या वाट्याला दोन गोष्टी होत्या, अतिशय सुंदर असे नितळ गोरेपान असे रूप आणि सतत कष्ट, कष्टच. कितीही कसेही कष्ट पडले तरी त्यांचा कधी ओझे म्हणून अव्हेर केला नाही. ती गावची डॉक्टर म्हणून ओळखली जायची. कधी कष्टापुढे पुढे झुकली नाही. वसा म्हणून त्याकडे पाहिले. तसा कुठल्या परिस्थितीत मनाचा खंबीरपणा कधी सोडला नाही.

या पुस्तकात अनेक थोर संपादकांनी आपल्या आईविषयी मन मोकळे केले आहे. प्रत्येकाच्या आईचे वेगळेपण यातून दिसून येत असले तरी शेवटी आई ही एकच आहे. सर्व नात्यांना जन्म देणारे, त्यात सामावणारे आई नावाचे गाव. यात प्रत्येकाची लेखनाची शैली ही कमावलेली आहे. नेमकेपण टिपण्यात प्रत्येकाची हुकुमत आहे. आई विषयी सांगताना तो काळ, आप्त, घरची परिस्थिती, स्वतःचे बालपण, जडणघडण याचेही मनोज्ञ असे वर्णन ओघाने येत जाते. संदीप काळे यांनी प्रत्येकाच्या मनात असलेले मातृस्मरण उत्तमपणे संपादित करून वाचकांना अंतर्मुख केले आहे. लेखांच्या सोबत सुरुवातीला त्या-त्या लेखकाचा फोटोसह परिचय दिलेला आहे. यातून त्या लेखकाचा परिचय होतो. हे पुस्तक वाचताना प्रत्येकाला यात आपली आई इथे मुक्कामी आहे, असे नक्की वाटेल. नयन बारहाते यांनी सजवलेले मुखपृष्ठ म्हणजे ममत्वाचे सुरेख शिल्पच म्हणायला हवे.

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

**गाव कुठे आहे?**
**संजीवकुमार सोनावणे**




**नादंणाऱ्या गावाच्या कथा**

गावाकडच्या कथा म्हटल्या की गाव प्रथम नजरेसमोर उभा राहतो. मग गावातली माणसे, त्यांचे आपसातले संबंध, राजकारण, गाववस्ती, शेती, शेतमजुरी, बोली, असे विविध स्तरांना आपल्यासोबत जोडून घेणारे गाव दिसू लागते. कुटुंबातील संवाद, मतभेद ही आणखी त्यात भर घालणारी गोष्ट. तरीही गावातली प्रत्येक व्यक्ती ठळकपणे नजरेसमोर कायम राहते, तिच्या गुणदोषासह. बोलण्याची पद्धत, वागण्याची रीत, खेळवण्याची तऱ्हा, माणसागणिक वेगळी असली तरी ती गावाची ओळख असते. या गावाकडच्या कथा 'गाव कुठे आहे?' या संग्रहात वाचायला मिळतात. या कथांना दोन विभागात विभागलेले दिसते. ही कथा ग्रामीण जशी आहे, तशी ती गावगाड्याबाहेरच्यांची देखील आहे. तरीही ती एकसंध अशी जोडलेली आहे. नाण्याच्या दोन बाजू असल्यातरी नाणे एकच असते. असा एकजीव कथांचा हा संग्रह घेऊन आले आहेत डॉ. संजीवकुमार सोनवणे. जे लेखक, कवी आहेत, संशोधक आहेत, त्यांच्या कविता आणि कथांचा समावेश उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात करण्यात आलेला आहे.

या कथांचे वेगळेपण प्रथमतः लक्षात येते ते त्यांच्या बोलीभाषेवरून. ही खानदेशातील बोली आहे. तिचा ढब, आक्रमकपणा, तिथले वेगळे शब्द, उच्चारण्याची पद्धत, हा सगळा वेगळाच बाज आहे, तिथल्या वांग्याच्या भरितासारखा. शहरी माणसांना समजून घेताना थोडी झटापट करावी लागेल. परंतु ती कळू लागते कथेच्या ओघात तेव्हा मात्र मन हरखून गेल्यासारखे नक्कीच होते. दुसरा लक्षात येणारा प्रकार आहे तो म्हणजे, 'गावकूस आणि गावकुसाबाहेर' अशा दोन्हींच्या परिघात नांदणाऱ्यांच्या कथा या संग्रहात आहेत. गावकुसाबाहेरच्या कथा लिहिताना एक वेगळेच निरीक्षण आवश्यक असते. त्याचा परिचय नसेल तर कथा आत्मा हरवल्यासारखी कृत्रिम होण्याची शक्यता असते, परंतु या कथासंग्रहाबाबत असे झालेले नाही. या लघुकथा आहेत. त्यांचा आवाका एका बिंदूवर केंद्रित असावा असा, नेमकेपण सांगणाऱ्या आहेत. लेखकाचा हा पहिलाच कथासंग्रह असला तरी आपली झेप कशी असेल याची प्रचीती देणारा संग्रह आहे.

'सायजा' या कथेत नवऱ्याच्या व्यासनापायी सायजा संसाराची जबाबदारी कामधंदा करून पार पाडते आहे. कामावर जाताना खाटेवर खिळलेल्या नवऱ्याच्या नाकर्तेपणावर ती खेसकते, 'पी–पी भागला न् बसला माह्या करमाची कातडी काढत!' परंतु ती सायजा कामावरून आल्यानंतर लेकीला जिलेबी देते तेव्हा बजावते, 'तुझ्या बाला एखाद् तुकडा ठीव गं!' 'पंचायत' या कथेत आरक्षणामुळे पंचायतीत सरपंच म्हणून निवडून आलेली रत्ना, गावाचा विकास करू पाहते. परंतु अनेक वर्षे सरपंच असलेला रायबा पाटील तिला फक्त सह्याजीराव ठेवून सगळा कारभार आपल्या हाती घेतो. हे लक्षात आल्यानंतर रत्ना सावध होते आणि स्वतः खंबीरपणे उभी राहते. 'सावित्रीमाईले नही का लोकेस्नी तरास दिधा... तरी ती माय बधनी नही...तिन्ही स्त्री शिक्षण दिसन आम्हना उद्धार करा की नाही? मी पन मागे हाटाव नही... ग्रामपंचायतमा जासू...रायबा पाटीलनी 'पंचायत' करसू...गावना विकास करसू.' सायजा, रत्ना प्रमाणेच दमयंती, नेहा, सायतारा, बायजाबोय या स्त्रियांच्या व्यक्तिरेखा या कथांमध्ये आहेत. त्या परिस्थितीशी दोन हात करताना आपला कणखरपणा सोडत नाहीत. कणा मोडल्यासारख्या शरण जात नाहीत. '...माय बाईना जनमच आसा ऱ्हास...आपलेबी इज्जत प्यारी ऱ्हास...पण आते कई नही...आपणबी डंडार ऱ्हाववो...आसासले उपटी मारवो.'

डॉ. बाबासाहेबांची शिकवण, चळवळ, आरक्षण, बॅकलॉग यांच्याशी संबंधित काही कथा आहेत. 'बॅकलॉग' कथेतील प्रा. पवार हे चळवळीच्या जोरावर कॉलेजमध्ये बॅकलॉग भरण्याच्या मागणीतून आपला स्वार्थ साधून घेतात आणि त्यानंतर चळवळीकडे पाठ फिरवतात. 'कार्यकर्ता' या कथेत नगरपालिकेने कामावरून काढून टाकलेल्या सफाई कामगारांसाठी उपोषण करणारा भीमनगरमधला कार्यकर्ता शेवटी एकाकी पडतो. इतका की शेवटी घरातलेही त्याच्या विरोधात उभे राहतात. समाज सुधारण्याच्या नादापायी घराचा बट्ट्याबोळ झाला त्याचे काय, असा प्रश्न विचारतात. 'डोळ्यांतला पाऊस' या कथेतला कार्यकर्ता सामाजिक चळवळीतील कार्यकर्ता होता. आता तो राजकीय चळवळीचा कार्यकर्ता झाला. त्याच्यातला कार्यकर्ता व्यसनाच्या आहारी गेला. समाज चळवळीच्या कार्यकर्त्यावर भाळलेली ती मात्र उध्वस्त झाली.

दुष्काळाचा परिणाम केवळ शेतकऱ्यावरच होतो असे नाही, शेतमजुरांवरही होतो. आत्महत्या करून प्रश्न सुटत नाहीत. गावात चारदोन टपऱ्या टाकल्या म्हणजे विकास झाला, गाव बदलले, असेही होत नाही. नोकरी सुटल्यानंतरचे जगणे आणि निवडणुकीत पोळी भाजून जगणे, हाही विरोधाभास अस्वस्थ करणारा आहे. एक आश्वासक कथासंग्रह लेखकाने वाचकाच्या हाती दिला आहे. यातला ओघवता प्रवाह, भाषेवरील अधिकार, बोली भाषेची परिमाणकारकता लक्षात येणारी आहे.

या कथासंग्रहाला योगीराज वाघमारे यांची अभ्यासपूर्ण अशी प्रस्तावना लाभलेली आहे. गावगाड्याचे बोलके चित्र सतीश भावसार यांनी मुखपृष्ठावर रंगवलेले आहे.

**मूल्य १२० रुपये सवलतीत ७० रुपये**

# ग्रंथपान

**कितीदा नव्याने तुला आठवावे**
**संकल्पना : मंदार आपटे**
**शब्दांकन : श्रेयसी वझे–मंत्रीवादी**



**सुरांच्या हिंदोळ्यावर**

'पहिल्या वहिल्या गोष्टी या सहजतेने हाती पडत नाहीत हेच खरं. पण त्या नेहमी खास असतात. कारण, पुढच्या प्रवासात त्याच आपल्या गुरू होतात. कधी – कधी आपल्या पहिल्या प्रयत्नांना तितकंसं यशही मिळत नाही. पण पुढच्या यशाचा पाया घालण्याचं काम मात्र नक्की होतं.'

एखादे गाणे हे माणसाचा कब्जा घेते आणि माणूस गाणेमय होऊन जातो. गाणे माणसाला स्थळकाळ विसरायला लावते. सुखदु:खात साथ करते तेही गाणेच! गाणे माणसाला आत्ममग्न करते. माणूस जेव्हा एखादे गीत गुणगुणत असतो स्वतःशीच, तेव्हा समजावे, हे गाणे नव्हे, ते गुणगुणाऱ्याचे गाणे जगणे आहे. एक काळ असा होता की, सतत गाणी कानांवर येत असत. ती इतकी मधुर असत की, माणूस नकळत ते स्वतःशी गुणगुणत असायचा. ज्यात जीवनरस आहे, सजीव स्वर आहेत, भावभावनांचे उत्कट खेळ आहेत, ती गाणी आपोआप माणसाला आपल्याकडे ओढून घेतात. आणि माणूस त्यांच्या मोहिनीत एकरूप होतो. असेच एक गाणे आहे,

कितीदा नव्याने तुला आठवावे
डोळ्यांतले पाणी नव्याने वहावे

'ती सध्या काय करते?' या सतीश राजवाडे यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटातले हे गाणे आहे. हे गाणे लिहिले आहे देवयानी कर्वे – कोठारी यांनी. या गीताला संगीताचा साज बहाल केला आहे तो मंदार आपटे यांनी. स्वरसोबतीला आहेत आर्या आंबेकर. संगीत दिग्दर्शक म्हणून मंदार आपटे यांचा हा पहिलाच चित्रपट. मंदार आपटे यांची संगीतकार म्हणून खरी कारकीर्द सुरू झाली ती २००४ सालापासून. नऊ अल्बम, नव्वद गाणी, अशी मोठी कामगिरी त्यांच्या नावावर कोरली गेली आहे ती तेव्हापासून. याची यादीही त्यांनी या पुस्तकाच्या शेवटी दिलेली आहे. असे असले तरी त्यांची वेगळी ओळख किंवा 'संगीतकार' म्हणून त्यांच्या नावावर मोहर उमटविण्यास जे गाणे कारण ठरले आहे, ते आहे 'कितीदा नव्याने तुला आठवावे.' या गाण्याला प्रतिसादही भरभरून लाभला. फोन, मेल, ई –मेल, यू ट्युब यावरून कौतुकाचा वर्षाव झाला. कुणी समक्ष येऊन दाद दिली. असा प्रतिसाद कुठल्याही कलावंतासाठी फार मोलाची भेट असते, कुठल्याही पुरस्कारापेक्षाही मोठी असते. यात कौतुकाचा भाग असतो तसे प्रोत्साहनही असते. आपले काम रसिकांना आवडते आहे, या सारखी भाग्याची दुसरी कुठलीच गोष्ट असूच शकत नाही कलावंतासाठी. यातून रसिक आणि कलावंत याचे जे वेगळे कलासक्त नाते तयार होते, तेही लौकिक नात्यापेक्षा वेगळे नितळ आणि निरपेक्ष असते. अशा सुहृद नात्याची जपणूक करणे हा खरा भावनिक आणि जिव्हाळ्याचा विषय.

'प्लेझर बॉक्स' हे व.पु.काळे यांचे पुस्तक असेच आहे, वाचकांनी त्यांच्या साहित्यावर केलेल्या भरभरून कौतुकाच्या वर्षावाचे. त्यांना आलेल्या पत्रांचे त्यांनी पुस्तक रूपाने हे रसिकप्रेम जतन करून ठेवले. इतरही साहित्यिकांनी असे प्रयोग केलेले आहेत. मंदार आपटे यांचे हे पुस्तक याच प्रवाहातील आहे. चाहत्यांची संख्या मोठी असली तरी निवडक असे शंभर अभिप्राय त्यांनी या पुस्तकात समाविष्ट केले आहेत. तसे हे काम कठीण होते. भाव व्यक्त करताना शब्दांच्या संख्येला महत्त्व नसते, परंतु पृष्ठांना मर्यादा असते. त्यामुळे 'निवडक'ला पर्याय नसावा. यात तंत्रज्ञ, कलावंत, यांच्याविषयी लेख आहेत, ज्यांचा थेट या चित्रपटाच्या, संगीताच्या, गाण्याच्या निर्मितीत सहभाग आहे.

नाना पाटेकर यांची प्रतिक्रिया तर खूपच बोलकी आहे. खरे म्हणजे नाना गाण्यावर दाद देऊन टीव्हीवर आणि समक्ष फोनवर मंदारला मनमोकळी दाद देतात, ही अप्रूप वाटावी अशी गोष्ट आहे. पण नानांनी ती दिलखुलासपणे दिली आहे. ती कशी आहे, त्याचा आस्वाद पुस्तकातून घेण्यातच खरी गंमत आहे.

सुकन्या मोने यांना खरंतर पुनर्जन्म लाभला की काय किंवा हे सारे सहन करण्यासाठीच त्यांचा जन्म झाला आहे की काय, अशी शंका यावी, इतके आयुष्याने त्यांना छळले आहे. तरीही त्याची सावली सोबत न ठेवता हसतमुखाने सहज वावर दाखवणारी सुकन्या वेगळी आहे, ते या पुस्तकातील लेखामुळे लक्षात येते. सतीश राजवाडे यांचे नाव दिग्दर्शन क्षेत्रात अग्रभागी आले खरे, पण त्यांचा प्रवास लाल गालिचावरून झालेला नाही, काटेरी मुकुट घालूनच झालेला आहे, हे त्यांच्या लेखामुळे कळते. संगीत संयोजन हा वेगळा प्रकार आहे. 'इंट्रो पीस' म्हणजे काय असते, हे अमित पाध्ये समजावून सांगतात. मुख्य ध्वनिमुद्रक यांचेही अनुभवविश्व वेगळे असते आणि इतर कुठल्याही कलाकाराइतकेच महत्वाचे आहे, याविषयीचा सौरभ कारजेकर यांचा लेख गाण्यासोबतच लक्षात राहावा असा आहे. देवयानी कर्वे–कोठारी, ऊर्मिला कानिटकर–कोठारे, नीलेश मोहरीर, तेजश्री प्रधान, विजय दयाळ यांचीही मनोगते यात आहेत. मंदारने आपल्या कामाविषयी, सहकाऱ्यांविषयी मन मोकळे केले आहे.

पुस्तकाची संकल्पना साकार करायची तर त्यासाठी अनेकांचे सहकार्य अपेक्षित असते. त्यातले मोठे सहकार्य म्हणजे या सगळ्यांचे संकलन करणे, शब्दांकन करणे. श्रेयसी वझे–मंत्रवादी यांनी ही जबाबदारी नेटाने आणि तितक्याच सहजपणे पार पाडली आहे. व्यस्त कलावंतांच्या वेळेत वेळ साधून त्यांना बोलते करणे, हवे तेच नेमके टिपून घेणे, कठीणच. पण त्यांनी ही जबाबदारी आपलेपणाने सांभाळल्याची दिसून येते.

या पुस्तकाच्या रूपाने गाण्याच्या आठवणींचे दस्तावेजीकरण होत असल्याचा आनंद सुनील बर्वे यांची प्रस्तावनेत व्यक्त केला आहे. दररोजच्या रियाजाचा विसर नको, हे सूत्र अनिल हर्डीकर यांनी मनोगतातून अधोरेखित केले आहे. समीर वैद्य यांनी कलात्मक असे सुंदर मुखपृष्ठ सजवले आहे. भावमुद्रा आणि रसिकमुद्रा यांचा हा संगम आहे.

**मूल्य २०० रुपये  सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**फणा**

**पंढरीनाथ रेडकर**




**आकांक्षेच्या प्रतिमेतील चेहरे**

'प्रत्येकालाच प्रेमाची भूक असते, त्या जवळिकीची भूक असते. प्रत्येक भावनाशील माणसांची ती गरज असते. अनुदिनी अनुतापाने तापलेल्या, दमलेल्या माणसाची अशी एक कूस हवीच असते, की जिथे आपण हक्काने विरघळून जाऊ. सगळे काही विसरून त्या सावलीत शांत, निवांत पडू शकू. सर्जनशील माणसाला तर अशा सुखाची निवांत आवश्यकता असते.'

पंढरीनाथ रेडकर, हे साहित्यक्षेत्रात स्थिरावलेले एक नाव. साहित्यातील सर्व प्रकारांतील वाङ्मय निमिर्ती केलेली असून त्यासाठी त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित केलेले आहे. त्यात 'फणा' या नव्या कथासंग्रहाचा समावेश झाला आहे. एकूण सतरा कथांचा हा संग्रह असून तिच्यात 'हरितीर्थ' या ऐतिहासिक वळणाच्या कथेचा समावेश आहे. तशी ही कथा दीर्घ स्वरूपाची वाटत असली तरी ती एका कादंबरीचा विषय ठरावा, असा मोठा आवाका असलेली कथा आहे. इतर सर्व वाचून झाल्यावरही हीच कथा मनाभोवती विळखा घालून बसलेली आहे असा भास होतो. त्याचे कारण या कथेत असलेल्या अहिल्या, वसुंधरा आणि रुक्मिणी या स्त्रिया आणि त्यांच्या केंद्रस्थानी असलेला युवराज देवराय. प्रेम, आसक्ती, विफलता, द्वेष आणि शौर्य यांचा संगम या कथेत अनुभवास येतो. व्यक्तिरेखा आणि प्रसंगांची तर सुंदर गुंफण गुंफली गेली आहे.

'किनो' या कथेचे स्वरूप आणखी वेगळे आहे. ती कथाप्रकारचा एक वेगळा प्रयोग घेऊन येते. किनोच्या जगण्याचे वेगवेगळे किनारे कधी शारीरिक तर कधी मानसिक स्तरावर समुद्राच्या लाटांना झेलत असल्यासारखे दिसतात. तिला प्रश्न पडतो,' बाईने नवऱ्याची दासी म्हणून लाड का करावेत? तो आयुष्यभराचा सोबती असतो म्हणून? शय्यासोबती करतो म्हणून? तिचा रक्षणकर्ता म्हणून? मग तो तुडवायचे, शरीराची विटंबना करण्याचे का थांबवत नाही? सहकाऱ्याने तिच्याकडे वाईट मागण्या केल्यावर तो गप्प का बसतो? संततधार कोसळणाऱ्या पावसात चिखल-चिखल झालेली जमीन आणि स्वतः, यातले विलक्षण साम्य ती टिपते. 'मीरा' या कथेतील सुशिक्षित डॉ. मीरा अशाच शारीरिक आणि मानसिक छळाला सामोरे जाते. प्रेमाची भीक मागणारा डॉ. मनोहरच तिच्या सगळ्या स्वप्नांचा चक्काचूर करतो. तेव्हा तीच त्याला विचारते, 'आता मी माझं पालापाचोळा झालेलं जिणं घेऊन कुठे जाऊ?'

'आनंद वाटुनि घे...'मधील भामिनी कायस्थ, 'हृदयस्थ' मधील पांडुरंग, 'द्रोह' मधील सूर्यकर्ण चंद्रभान, 'घोर' मधील करवी; रुक्मिणी, यांची प्रत्येकाची एक स्वतंत्र ओळख आहे. आयुष्यात येणारे विफलतेचे आणि पारंपरिक समज-गैरसमजाचे हे बळी आहेत. कर्णासारखे. 'अग्निपुरुष' कथेत कर्णाच्या वाट्याला आलेले अनाथ सूतपण हे सूर्यपुत्राचे तेज अंगी असूनही त्यावर मात करते. अजिंक्य असा वरदान लाभलेला हा वीर आतून दुभंगलेला आहे. तो सल,द्वेष आणि त्वेष कुंती-मातेसमोर उघड होतो. कुंतीच्या मनातही वेगळे शल्य आहेच. हा संवाद आंतरिक भावनाचे दर्शन घडवतो. 'रिजेन्सी' मधील रिजेन्सीचे प्रेम आणि समजूतदारपणा हा तिच्या नितळ अशा निरागसपणाला आणि वयालाही शोभून दिसतो. त्याचे एकच कारण, दोघांचे एकमेकांवर असलेले निःसीम प्रेम. तशीच एक कथा आहे 'कविता' नावाची. दोघांचेही परस्परांवर उत्कट प्रेम आहे परंतु लग्न होऊ शकत नाही, तिची जात आडवी येते म्हणून. ही एकप्रकारे तिच्यासाठी फसवणूकच. ती त्याच्यापासून दूर होते कायमची, मात्र तेच प्रेम कायम हृदयात ठेवायची जिद्द ठेवून, अविवाहित राहून!

या कथा वाचताना लक्षात येते कीक, त्या तृतीय आणि प्रथमपुरुषी निवेदनातून प्रकटलेल्या आहेत. या कथांची बांधणी बांधेसूद आणि ठेवणीतली आहे. वातावरण, परिस्थिती यांच्याशी ती एकरूप झालेली आहे. त्यामुळे त्या कथेच्या परिघात वाचकाला खिळवून ठेवण्याची किमया लेखकाने चपखलपणे सिद्ध केलेली आहे. भाषेचा डौलही तसाच कथेचा डोलारा सांभाळणाराच नव्हेतर तिला सौष्ठव बहाल करणारा आहे. हे सौष्ठव प्रत्येक कथेच्या अंगोपांगातून नजरेस येते. या कथांचा स्थळकाळ,प्रदेश वेगवेगळा असला तरी सोबतीला निसर्ग आहे. जणू निसर्गाच्या रंगात घोळलेल्या या कथा आहेत. पाऊस तर सतत कथांमधून झिरपत राहतो, व्यक्तिरेखांच्या अंतःकरणात मुरलेला वाटतो. कवितांच्या ओळीही पावसाच्या सोबत येत राहतात. विशेष म्हणजे अनेक ठिकाणी पुराणकथा, इतिहास, चरित्र यांचे दाखले कथेच्या आशयाचा परीघ विस्तारताना दिसतात. त्यावरून लेखकाचे वाचन चौफेर असल्याची प्रचीती येते. कसदार अशा कथा लेखकाने वाचकांच्या हाती दिलेल्या आहेत, असे हमखास म्हणता येईल.


पुस्तकाची मांडणी वेगळ्या पद्धतीने केलेली आहे. तिला रेखाटनांची जोड दिलेली आहे. हे रेखाटन स्त्री-पुरुष इतके ढोबळ नाही, ते आहे नरमादीचे. सत्ता आणि शोषक, अहंकार आणि विफलतेचे. अग्नितांडव आणि रक्षेचे. तेच सूत्र मुखपृष्ठावरही अवतरले आहे. फुत्कारणारा भयप्रद असा नाग फणा उभारलेला. जो प्रत्येक पुरुषाच्या वृत्तीत सतत जागा असतो. त्याच्या मस्तकावर नागमणी आहे, जो भक्ष्याचे सारे आयुष्य क्षणात उद्ध्वस्त करतो. त्याचा लाल रंग धोक्याची दिशा दाखवतो तसा कपाळावर रेखलेल्या कुंकवाचाही प्रतिनिधी ठरतो. ज्याचा तोल सांभाळण्याची जबाबदारी दोघांवरही असते, परंतु तेच भान ऐनवेळी विसरले जाते. शीर्षकाला तोलून धरावे, असे हे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी सजवले आहे.

**मूल्य २५० रुपये   सवलतीत १५० रुपये**

## पुस्तकप्रकाशन क्षणचित्रे




डॉ. कुमुद बन्सल उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार स्वीकारताना. 'सल शिक्षणाचा' पुस्तकाचे लेखक सूर्यकांत कुलकर्णी, सुदेश हिंगलासपूरकर, हस्ते सुप्रिया सुळे. बसंती रॉय, डॉ. अनिल पाटील, डॉ. वसंत काळपांडे आणि सुधीर शुक्ला



डॉ. घनश्याम बोरकर लिखित 'खेळिया' या कवितासंग्रह प्रकाशन समयी डॉ. घनश्याम बोरकर, प्रा. सोमनाथ कोमरपंत, कोकण कवी माधव बोरकर, पद्मश्री सुरेश अमोणकर आणि मान्यवर



ज्ञानराज पाटकर लिखित 'स्वल्पविराम' या पुस्तकप्रकाशन समयी डॉ. भरत शहा, झर्मुद पटेल, जतीन पंडित, लेखक ज्ञानराज पाटकर, धनश्री धारप आणि दत्ता सावंत



प्रा. डॉ. उत्तम विश्राम महाडकर आणि प्रा. डॉ. महानंद शिवाजीराव माने लिखित 'कृषिसमृद्धीतून कोकणाचा शाश्वत विकास' या पुस्तकप्रकाशन समयी सुदेश हिंगलासपूरकर, लेखक डॉ. उत्तम महाडकर, डॉ. अरुण मुरुडकर, अनुराधा गारे, धनश्री धारप आणि अरुण जोशी



विनता कुलकर्णी लिखित 'पुस्तकचोर' पुस्तकप्रकाशनसमयी अक्षय वाटवे, धनश्री धारप, डॉ. उमा कुलकर्णी, लेखिका विनता कुलकर्णी, प्रा. मिलिंद जोशी, श्याम जोशी आणि सुदेश हिंगलासपूरकर

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.